# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

## मतदान केंद्राध्यक्षांसाठी निदेश पुस्तिका

(जेथे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे वापरण्यात येतात तेथे वापरासाठी)

## सप्टेंबर - २०२५

## बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणुकीकरिता

पहिला मजला, नवीन प्रशासकीय भवन,

मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,

मुंबई - ४०० ०३२

३१५

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| प्रकरण-१ | | १ ते ६ |
| १. | प्रारंभिक | १ |
| २. | मतदान यंत्राची तोंड ओळख | २ |
| ३. | मतदानासंदर्भात कायदेशीर तरतुदी | ३ |
| ४. | कामाची व्यापक कल्पना | ३ - ५ |
| ५. | मतदान केंद्राध्यक्षांच्या महत्वाच्या कामांची यादी | ३ |
| ६. | चेक मेमो | ६ |
| ७. | खुणचिठ्ठ्या (ॲड्रेस टॅग) | ६ |
| प्रकरण-२ | मतदान पथक स्थापन करणे आणि सरावासाठी तालीम घेणे | ७ ते ८ |
| १. | मतदान पथक | ७ |
| २. | मतदान पथकाच्या इतर सदस्यांशी संपर्क | ७ |
| ३. | मतदानाची तालीम | ७ |
| ४. | टपाली मतपत्रिका आणि निवडणूक कामाशी संबंधित असल्याचे प्रमाणपत्र | ८ |
| प्रकरण-३ | **मतदान यंत्रे आणि मतदानाचे साहित्य ताब्यात घेणे** | ९ ते १० |
| १. | मतदानाचे साहित्य | ९ |
| २. | मतदान यंत्राची तपासणी | ९ |
| ३. | मतदान साहित्याची तपासणी | १० |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण-४ | **मतदान केंद्रे स्थापन करणे** | ११ ते १३ |
| १. | प्रवास | ११ |
| २. | मतदान केंद्रात आगमन | ११ |
| ३. | मतदान अधिकाऱ्याची अनुपस्थिती | ११ |
| ४. | केंद्राध्यक्षांची कामे | ११ |
| ५. | मतदान केंद्रे स्थापन करणे | ११ |
| ६. | सूचना लावणे | १३ |
| प्रकरण-५ | **मतदान अधिकाऱ्यांना कामे वाटून देणे** | १४ ते १५ |
| १. | मतदान केंद्रातील मतदान प्रक्रिया आणि मतदान अधिकाऱ्यांची कामे | १४ |
| २. | प्रथम मतदान अधिकारी | १४ |
| ३. | दुसरा मतदान अधिकारी | १४ |
| ४. | तिसरा मतदान अधिकारी | १५ |
| प्रकरण-६ | **मतदान केंद्रात प्रवेशपात्र व्यक्ती आणि केंद्रातील आसन व्यवस्था** | १६ ते १९ |
| १. | मतदान केंद्रात प्रवेशपात्र व्यक्ती | १६ |
| २. | मतदान प्रतिनिधींची (पोलिंग एजन्टस)उपस्थिती | १७ |
| ३. | मतदान प्रतिनिधींनी नियुक्तीपत्र सादर करणे | १७ |
| ४. | मतदान प्रतिनिधींसाठी प्रवेशपत्रे | १८ |
| ५. | मतदान प्रतिनिधींची आसन व्यवस्था | १८ |
| ६. | मतदान केंद्रात धुम्रपानास बंदी | १८ |
| ७. | वृत्तपत्र प्रतिनिधी आणि छायाचित्रकारांना सुविधा | १८ |

| | | |
|---|---|---|
| ८. | आयोगाने नियुक्त केलेल्या निरीक्षकांसाठी सुविधा | १८ |
| ९. | मतदान केंद्राच्या आत बिल्ले लावणे आदी | १९ |
| प्रकरण-७ | **ईव्हाएम-मतदान यंत्र-प्राथमिक माहिती** | २० ते २७ |
| १. | इलेक्ट्रानिक मतदान यंत्रांचे बॅलेट युनिट | २० - २२ |
| २. | कंट्रोल युनिट | २३ - २७ |
| प्रकरण-८ | **मतदान सुरु करण्यापूर्वी मतदान यंत्र सज्ज करणे** | २८ ते ३० |
| १. | मतदानापूर्वी प्रारंभिक तयारी | २८ |
| २. | मतदान विभागातील तयारी (बॅलेट युनिट) | २८ |
| ३. | मतदान विभाग आणि नियंत्रण विभाग परस्परांना जोडणे | २८ - ३० |
| प्रकरण-९ | **नियंत्रण विभागाची तयारी** | ३१ ते ३२ |
| १. | नियंत्रण विभाग तपासणे | ३१ |
| २. | नियंत्रण विभागाची तयारी | ३१ |
| ३. | नियंत्रण विभाग आणि मतदान विभाग जोडणे | ३२ |
| ४. | वीजप्रवाह सुरु करणे | ३२ |
| ५. | मागील कप्पा बंद करणे | ३२ |
| प्रकरण-१० | **मॉकपोल मतदान घेणे** | ३३ ते ३७ |
| १. | एकसदस्यीय प्रभाग पध्दतीचे मतदानासाठी चाचणी मतदान /अभिरुप मतदान(मॉकपोल) करावयाची कार्यपध्दती | ३३ - ३७ |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण-११ | **नियंत्रण विभाग पेपरसील व स्पेशल टॅग वापरुन बंद करणे** | ३८ ते ४० |
| १. | कंट्रोल युनिट पेपर सीलने सीलबंद करणे | ३८ |
| २. | पेपर सीलचा हिशोब ठेवणे | ३९ |
| ३. | कंट्रोल युनिट स्पेशल टॅगने सीलबंद करणे | ३९-४० |
| ४. | कंट्रोल युनिटचे रिझल्ट सेक्शन बंद करुन सीलबंद करणे | ४० |
| प्रकरण-१२ | **नियंत्रण विभाग A,B,C,D पट्टीसील वापरुन बंद करणे** | ४१ ते ४५ |
| १. | A,B,C,D पट्टीसील वापरुन मतदान यंत्र सीलबंद करणे | ४१ - ४५ |
| प्रकरण-१३ | **मतदानास सुरुवात** | ४६ ते ४७ |
| १. | मतदान यादीची चिन्हांकित प्रत | ४६ |
| २. | नमुना व्हीएम-१ मधील मतदार नोंदवही | ४६ |
| ३. | मतदान केंद्रात मतदारांच्या प्रवेशावर नियंत्रण | ४७ |
| प्रकरण-१४ | **मुक्त आणि नि:पक्षपाती निवडणुकीची खबरदारी** | ४८ |
| १. | प्रतिज्ञापत्राचे वाचन | ४८ |
| २. | नव्या मतदान यंत्राच्या वापरावेळी करावयाचे सोपस्कार वा कार्यपध्दती | ४८ |
| प्रकरण-१५ | **मतदान केंद्राभोवती निवडणूक कायदयांचा अंमल लागू करणे** | ४९ ते ५० |
| १. | नि:पक्षपातीपणा आवश्यक | ४९ |
| २. | प्रचारावर बंदी | ४९ |
| ३. | उमेदवारांचा निवडणूक मंडप (बूथ) | ४९ |
| ४. | मतदान केंद्रात वा जवळ बेबंद वर्तणूक | ४९-५० |

| | | |
|---|---|---|
| ५. | बेशिस्त व्यक्तीला मतदान केंद्रातून बाहेर काढणे | ५० |
| ६. | मतदारांना आणण्यासाठी बेकायदेशीर वाहनांचा वापर | ५० |
| ७. | मतदान केंद्रातून मतदान यंत्र हलविणे हा गुन्हा आहे | ५० |
| ८. | निवडणूक अधिकाऱ्यांनी कर्तव्यभंग केल्यास | ५० |
| ९. | मतदान केंद्राकडे अथवा परिसरात हत्यारे घेऊन जाणे | ५० |
| प्रकरण-१६ | **मतदाराची ओळख पटविणे आणि ओळखीस आव्हान दिल्यास अवलंबिण्याची कार्यपध्दत** | ५१ ते ५३ |
| १. | मतदाराच्या ओळखीची शहानिशा | ५१ |
| २. | मतदाराच्या ओळखीस आव्हान देणे | ५२ |
| ३. | आव्हानित मते | ५२ |
| ४. | संक्षिप्त चौकशी | ५२-५३ |
| ५. | आव्हान शुल्क परत करणे | ५३ |
| ६. | मतदार यादीतील मुद्रणदोष अथवा कार्यालयीन चुकांकडे कानाडोळा करा | ५३ |
| ७. | मतदाराच्या पात्रतेला आव्हान देऊ नका | ५३ |
| प्रकरण-१७ | **मतदाराला मतदान करु देण्यापूर्वी त्याच्या बोटावर न पुसणारी शाई लावणे आणि त्याची सही वा अंगठ्याचा ठसा घेणे** | ५४ ते ५७ |
| १. | मतदाराचे डाव्या हाताची तर्जनी तपासणे आणि त्यावर शाई लावणे | ५४ |
| २. | नव्याने मतदान अथवा स्थगित मतदानाच्या वेळी शाई लावण्याची पध्दत | ५५ |
| ३. | मतदाराला जर डाव्या हाताची तर्जनी नसेल तर शाई लावण्याची पध्दत | ५५ |

| | | |
|---|---|---|
| ४. | मतदाराचा मतदार नोंदवहीतील मतदार क्रमांक नोंद करणे | ५५ |
| ५. | मतदाराची सही | ५६ |
| ६. | मतदाराच्या अंगठ्याचा ठसा | ५६ |
| ७. | मतदार नोंदवहीत अंध/अशक्त अथवा कुष्ठरोग्याची सही वा अंगठयाचा ठसा घेणे | ५६ |
| ८. | मतदाराला मतदार स्लीप देणे | ५६ – ५७ |
| प्रकरण–१८ | **मतदानाची नोंद आणि मतदान सोपस्कार** | ५८ ते ६० |
| १. | मतदार नोंदवहीत मिळालेल्या अनुक्रमांकानेच मतदान करणे | ५८ |
| २. | मतदारास मतदान करण्यास परवानगी देणे | ५८ |
| ३. | मतदान पध्दत | ५९ |
| ४. | झालेले मतदान नियमितपणे तपासावे. | ५९ |
| ५. | मतदान काळात मतदान केंद्राध्यक्षाचा मतदान कक्षात (व्होटिंग कंपार्टमेंट) प्रवेश | ६० |
| प्रकरण–१९ | **मतदारानी कुणाला मतदान केले हे गुप्त ठेवावे** | ६१ |
| १. | मतदान पध्दतीचे काटेकोरपणे पालन करा | ६१ |
| २. | मतदान पध्दत वा सोपस्कार मानण्यारा नकार | ६१ |
| प्रकरण–२० | **अंध आणि अपंग व्यक्तीचे मतदान** | ६२ |
| प्रकरण–२०–अ | **मतदान न करण्याचा मतदाराचा निर्णय** | ६३ ते ६५ |
| १. | मतदान कक्षात जाण्यापूर्वी मतदान न करण्याचा निर्णय | ६३ |
| २. | मतदान कक्षात गेल्यानंतर मतदान न करण्याचा निर्णय | ६३ – ६५ |

| | | |
|---|---|---|
| प्रकरण-२१ | **निवडणूक सेवेवर असलेल्या सरकारी सेवकांचे मतदान** | ६६ |
| १. | निवडणूक सेवेवर असलेल्या सरकारी सेवकांना मतदान सुविधा | ६६ |
| २. | निवडणूक सेवा दाखला | ६६ |
| प्रकरण-२२ | **प्रदत्त (दुबार) मते** | ६७ ते ६८ |
| १. | प्रदत्त मत | ६७ |
| २. | प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेचा आराखडा | ६७ |
| ३. | प्रदत्त (दुबार) मतपत्रिकांचा हिशोब | ६७ |
| ४. | प्रदत्त (दुबार) मतपत्रिका देण्यात आलेल्या मतदारांची नोंद | ६८ |
| ५. | प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेवर मत नोंदणी | ६८ |
| प्रकरण-२३ | **मतदान यंत्र खराब होणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे अशा प्रसंगी मतदान स्थगित करणे** | ६९ ते ७१ |
| १. | मतदान केंद्र ताब्यात घेणे | ६९ - ७० |
| २. | मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या प्रसंगी मतदान यंत्र बंद करणे | ७१ |
| प्रकरण-२४ | **मतदान बंद** | ७२ ते ७३ |
| १. | मतदान केंद्रावर मतदान बंद करतेवेळी उपस्थित असलेल्या व्यक्तींचे मतदान | ७२ |
| २. | मतदान बंद | ७२ |
| ३. | मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट बंद करणे | ७२ - ७३ |
| प्रकरण-२५ | **नोंद झालेल्या मतांचा हिशोब** | ७४ |
| १. | नोंद झालेल्या मतांचा हिशोब तयार करणे | ७४ |
| २. | नोंद झालेल्या मतांच्या हिशोबाची प्रमाणित प्रत मतदान प्रतिनिधींना देणे | ७४ |

| | | |
|---|---|---|
| ३. | मतदान बंद झाल्यानंतर करावयाचे घोषणापत्र | ७४ |
| प्रकरण-२६ | मतदान बंद झाल्यावर मतदान यंत्र सीलबंद | ७५ |
| प्रकरण-२७ | **निवडणूक कागदपत्रे सीलबंद करणे** | ७६ ते ७८ |
| १. | निवडणूक कागदपत्रे लिफाफ्यात सीलबंद करणे | ७६ |
| २. | लिफाफे आणि पाकिटे यावर मोहोरा लावणे | ७६ |
| ३. | पहिले पाकिट-सांविधिक लिफाफे (Statutory Covers) | ७७ |
| ४. | दुसरे पाकिट-असांविधिक लिफाफे (Non-Statutory Covers) | ७७ |
| ५. | तिसरे पाकिट-निदेश/नियमपुस्तिका व इतर वस्तू असलेले पाकिट | ७७-७८ |
| ६. | चौथे पाकिट-इतर उरलेले साहित्य असलेले पाकिट | ७८ |
| प्रकरण-२८ | **डायरी तयार करणे आणि संग्रह केंद्रात मतदान यंत्रे आणि निवडणूक कागदपत्रे पोहोचविणे** | ७९ ते ८० |
| १. | डायरी तयार करणे | ७९ |
| २. | मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रांचे निर्वाचन अधिकाऱ्याकडे वितरण | ७९ |
| ३. | संग्रह केंद्रावर ताबा असलेल्या अधिकाऱ्यास द्यावयाच्या बारा बाबी | ८० |
| प्रकरण-२९ | **मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी यांच्यासाठी थोडक्यात मार्गदर्शन** | ८१ ते ८६ |
| जोडपत्र - १ | **महानगरपालिका क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेश, २००५ दि. ७.१.२००५** | ८७ ते ११० |
| जोडपत्र-२ | मतदान केंद्राध्यक्षांनी वेगवेगळया पातळीवर करायला हवी त्या कामाचा आराखडा ( कायदेशीर जबाबदाऱ्या ) | १११ ते ११६ |
| १. | नेमणुकीवेळी | १११ |
| २. | मतदानाचा दिवसाचा पूर्व दिन | ११२ - ११४ |

| | | |
|---|---|---|
| २.<br>३.<br>४. | मतदाना दिनी मतदान केंद्रावर पोहोचल्यावर<br>मतदान समयी<br>मतदान पूर्ण झाल्यावर | ११४<br>११४-११५<br>११५ - ११६ |
| जोडपत्र-३ | मतदान केंद्राध्यक्षांसाठी चेक मेमो | ११७ - ११८ |
| जोडपत्र-४ | जिथे इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा वापर होईल त्या मतदान केंद्रासाठी मतदान साहित्याची यादी | ११९ - १२१ |
| जोडपत्र-५ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या मतदान केंद्राचा नमुना | १२२ |
| जोडपत्र-६ | मतदानास प्रारंभ होण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्षांने करावयाचे घोषणापत्र | १२३ - १२४ |
| जोडपत्र-६अ | मागाहून दुसरे मतदान यंत्राचा वापर करताना मतदान केंद्राध्यक्षाने करावयाचे प्रतिज्ञापत्र | १२५ |
| जोडपत्र-७ | मतदान समाप्तीचे प्रतिज्ञापत्र | १२६ |
| जोडपत्र-८ | मतदान यंत्र मोहोरबंद केल्यानंतर करावयाचे प्रतिज्ञापत्र | १२७ |
| जोडपत्र-९ | अंध व अपंग मतदाराच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र | १२८ |
| जोडपत्र-१० | (अ) नमुना व्हीएम-३ (पहा परिच्छेद २१) भाग-एक -नोंदविलेल्या मतांचा हिशोब<br>(ब) नमुना व्हीएम-४ (पहा परिच्छेद २८) भाग-दोन- मतमोजणीचा निकाल | १२९ - १३०<br>१३१ - १३२ |
| जोडपत्र-११ | मतदान केंद्राध्यक्षांची डायरी | १३३ - १३५ |
| जोडपत्र-१२ | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करताना सादर करावयाच्या पुराव्याबाबतचे सुधारीत आदेश - २०२५, दि१४/०७/२०२५ | १३७ - १३९ |
| जोडपत्र-१३ | आक्षेप/हरकत घेण्यात आलेल्या मतांची यादी | १४१ |
| जोडपत्र-१४ | आक्षेप फी स्विकारण्यासंदर्भातील नमुने | १४२ |
| जोडपत्र-१५ | पोलीस ठाणे अधिकाऱ्यास पाठवावयाचे तक्रारपत्र | १४३ |

| | | |
|---|---|---|
| जोडपत्र-१६ | मतदान संपल्यानंतर बॅटरी सुरु राहून मतमोजणीच्या वेळी बॅटरी संपून निकाल दिसत नसल्यास करावयाची कार्यवाही. दि. १३ जून, २००५. | १४५ - १४६ |
| जोडपत्र-१७ | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदान केंद्र निश्चिती व पुरवावयाच्या सोयी सुविधा- दि.२६ जून, २०२५ | १४७ - १५८ |
| जोडपत्र-१८ | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदान केंद्र निश्चितीच्या निकषामधील सुधारणा - दि.२९ ऑगस्ट, २०२५ | १५९ - १६१ |
| जोडपत्र-१९ | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावरील END बटनाच्या वापराबाबत. दि.२९ डिसेंबर, २०२२ | १६३ - १६८ |
| जोडपत्र-२० | स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावरील Close बटनाच्या वापराबाबत. दि.२९ डिसेंबर, २०२२ | १६९ - १७० |
| जोडपत्र-२१ | मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणाऱ्या शाई ऐवजी मार्कर पेनच्या वापराबाबतच्या सूचना दि.१९.११.२०११ | १७१ -१७२ |
| | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरताना घ्यावयाची दक्षता | १७३ |
| | मतदान केंद्राध्यक्ष यांचेसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासंबंधी महत्त्वाच्या सूचना | १७४ |

# प्रकरण - १
## प्रारंभिक

१.१ मतदान केंद्राध्यक्ष म्हणून तुम्हाला मतदान प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजवावयाची आहे. तुमच्या अधिकाराखालील मतदान केंद्रातील मतदान प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी तुम्हाला कायदेशीर पूर्ण अधिकार आहेत. तुमच्या मतदान केंद्रात मुक्त आणि नि:पक्षपातीपणे मतदान व्हावे हे पाहणे तुमचे सर्वप्रथम कर्तव्य आहे. त्यासाठी तुम्हाला राज्य निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या सूचना आणि मार्गदर्शनाची आणि निवडणूक कायदा व प्रक्रियेची पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. त्यामुळे तुम्ही नियमानुसार आपले कर्तव्य बजावू शकाल आणि कुणाच्याही वाजवी तक्रारीला वाव राहणार नाही.

१.२ यापूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मतपेट्या व मतपत्रिका या पारंपारिक पध्दतीने घेण्यात येत होत्या. आता विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रगतीचा उपयोग करुन राज्य निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेत सुधारणा करण्याचा प्रयत्न चालविला आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार, इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड, हैद्राबाद या केंद्र सरकारच्या अंगिकृत उपक्रम असलेल्या कंपनीने इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे तयार केली आहेत. ही इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (यापुढे आपण मतदान यंत्रे असे संबोधू) फार विश्वसनीय अशी आहेत. मतपेट्या व मतपत्रिका ही सध्याची मतदान पध्दती नजरेसमोर ठेवून ही मतदान यंत्रे तयार केलेली आहेत.

१.३ महानगरपालिका निवडणुकांशी संबंधित मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे मतदान करण्याबाबत दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. त्यासंदर्भातील सविस्तर कार्यपध्दती ठरवून देणारे निवडणूक नियम तयार करण्यात आलेले आहेत. मात्र त्यात काढता येणाऱ्या मेमरीच्या अनुषंगाने तरतुदी नाहीत. राज्य निवडणूक आयोगाने भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ अ (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४ (४) अन्वये राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन महानगरपालिकांच्या बाबतीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राव्दारे मतदान करण्याबाबतचे आदेश क्रमांक - रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५, दिनांक ७ जानेवारी, २००५ रोजी **(जोडपत्र - १)** पारित केले असून, त्यांच्या प्रती सर्व संबंधितांना पाठविण्यात आल्या आहेत. तसेच सदर आदेश या निदेश पुस्तिकेतही देण्यात आले आहेत.

१.४ मतदान यंत्रे वापरात येणाऱ्या मतदान केंद्रातील तुम्ही केंद्राध्यक्ष आहात. त्यासाठी तुम्हाला मतदान यंत्राव्दारे मतदान प्रक्रियेसंदर्भातील कायदे व नियम यांची माहिती असणे आवश्यक आहे. मतदान केंद्रात मतदान करण्यासंदर्भातील प्रत्येक टप्प्याची तुम्हाला माहिती तर हवीच शिवाय मतदान यंत्राच्या वापरासंदर्भातही माहिती हवी. कायदा वा नियमाच्या वापरात थोडी जरी चूक झाली किंवा मतदान यंत्राच्या वापरासंदर्भात अपुरे ज्ञान असले तर

तुमच्या मतदान केंद्रातील मतदानात गोंधळ निर्माण होईल. राज्य निवडणूक आयोगाने विकसित केलेले मतदान यंत्र लोकसभा / विधानसभा निवडणुकांकरिता वापरण्यात येणाऱ्या मतदान यंत्रांपेक्षा वेगळे असल्यामुळे याचे योग्य प्रशिक्षण घेणे अत्यावश्यक आहे.

## २. मतदान यंत्राची तोंड ओळख :-

२.१ मतदान यंत्राचे दोन भाग आहेत. **एक नियंत्रण विभाग (कंट्रोल युनिट) आणि दुसरा मतदान विभाग (बॅलेट युनिट).** हे दोन्ही विभाग परस्परांशी जोडलेले आहेत. जेव्हा मतदान यंत्र सुरु करण्यात येते त्यावेळी त्याच्या केबलचे एक टोक मतदान विभागाशी जोडलेले असते.

२.२ मतदान विभाग १५ उमेदवारांच्या मतदानाची नोंद करु शकतो. मतदान विभागावर मतपत्रिका, मतदानासंदर्भात माहिती, अनुक्रमांक, उमेदवाराचे नाव आणि त्याने घेतलेले निवडणूक चिन्ह याची माहिती दिसते. प्रत्येक उमेदवाराच्या पुढे त्याचे निवडणूक चिन्ह दर्शविलेले असते. त्यापुढे असलेले बटण दाबून मतदार आपल्या मतदानाची नोंद करु शकतो. या बटणाच्या बाजूलाच दिवा आहे. तो जेव्हा तुम्ही मत नोंदविण्यासाठी बटण दाबता तेव्हा हा लाल रंगाचा दिवा पेटतो. त्याचा अर्थ तुमच्या मतदानाची नोंद झाली असा आहे.

राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २९ डिसेंबर, २०२२ च्या आदेशान्वये **(जोडपत्र-१९)** मतदान यंत्रावरील END बटणाचा वापर कशा प्रकारे करण्यात यावा याबाबत सविस्तर आदेश काढलेले आहेत. त्यानुसार जे मतदार NOTA बटणाचा वापर करण्यास नकार देतील अशा मतदारांना END बटणाचा वापर करून मतदान प्रक्रिया पूर्ण करता येईल. जर मतदारांनी NOTA व END या दोन्ही बटणांचा वापर करण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांना सदर आदेशात दिलेली कार्यपध्दती वापरून END बटण दाबून, मतदान प्रक्रिया पुढे नेता येईल.

**जेव्हा भारत निवडणूक आयोगाची मतदान यंत्रे वापरण्यात येतील त्यावेळी स्वतंत्र पुरवणीद्वारे निर्देश देण्यात येतील.**

२.३ चार मतदान विभाग एकत्र आणले तर त्याद्वारे ५७ उमेदवारांच्या मतदानाची नोंद करता येईल आणि त्यावर एका जागेवरुनच नियंत्रण ठेवता येईल. नियंत्रण विभागाच्या वरील भागात उमेदवाराचा क्रमांक, एकूण मते, प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते आदी यंत्रातील माहिती दर्शविली जाईल. सुलभ संदर्भासाठी या विभागास दर्शक विभाग अथवा डिस्प्लेईंग युनिट म्हटले आहे. या दर्शक विभागाच्या खाली यंत्र ज्यावर चालते ती बॅटरी ठेवण्याची जागा असेल. त्याच्या शेजारी असलेल्या विभागात बटण व काढता येणारी मेमरी आहे. एका विशिष्ट निवडणुकीसाठी उमेदवारांची संख्या निश्चित करुन यंत्र मतदानास सज्ज करण्यासाठी या बटणाचा उपयोग करावा. या बटनास ''कॅन्डसेट" बटण म्हणतात. या बटणावर काढता येणारी मेमरी खोचून लावण्यात आलेली असते. मतमोजणीनंतर सदर मेमरी उपस्थित मतमोजणी प्रतिनिधींसमोर काढून सील करावयाची आहे. या दोन विभागांसह संपूर्ण नियंत्रण विभागास ''कॅन्डसेट सेक्शन" म्हणतात. या कॅन्डसेट सेक्शनच्या बाजूला निकाल अथवा रिझल्ट सेक्शन आहे. या विभागात १) मतदान करण्याचा "क्लोज'' बटण २) निकालाचे दोन बटण असतील. एक बटण मतदान निकालासाठी असेल आणि ३) ''क्लीअर'' बटण ज्यावेळी यंत्रात नोंद करण्यात आलेली माहिती नको असेल तेव्हा पुसून टाकण्यासाठी आहे. 'नियंत्रण विभागाच्या' अगदी

खालील भागात दोन बटण आहेत. एकावर बॅलट असे लिहिले असून ते दाबल्यावर मतदान विभाग मतदान नोंदण्यास सज्ज होतो. तर दुसरे 'टोटल' लिहिलेले बटण दाबल्यावर त्यावेळेपर्यंत करण्यात आलेल्या मतदानाची संख्या कळेल. ( परंतु उमेदवारनिहाय मतदान संख्या कळणार नाही ) नियंत्रण विभागाच्या या विभागास 'वोट सेक्शन' असे म्हणतात. या यंत्रातील सूक्ष्म संगणक बॅटरीवर चालतो आणि तो कुठेही कोणत्याही परिस्थितीत चालविता येतो. त्यात ढवळाढवळ वा हस्तक्षेप करता येत नाही. तो अचूक असून हाताळण्यास सोपा आहे. मतदान यंत्राचे हे दोन्ही भाग दोन वेगवेगळया पेट्यांतून पुरविण्यात येतात. आणि या पेट्या हाताळण्यास सोप्या असतात. मतदान यंत्रात नोंदणी झालेली मतदानाची माहिती यंत्राची बॅटरी काढली तरी शाबूत राहते.

२.४ हे मतदानाचे यंत्र आजच्या मतदान पध्दतीस सोईस्कर असे आहे. बदल आहे तो केवळ मतदारांनी उमेदवाराच्या नावापुढे आणि निशाणीपुढे असलेले बटण दाबावे. पारंपारिक पध्दतीत मतदार फुली किंवा स्वस्तिक निशाणी असलेला स्टॅम्पचा ठसा उमेदवाराच्या नावावर उमटवितो. मतदानाची गुप्तता आणि मतदानात ढवळाढवळ टाळण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी या मतदान यंत्रात घेण्यात आली आहे. या मतदान यंत्राद्वारे मतदान करण्यास अडचण येत नाही. मतदानाची गतीही जलद असते. मतमोजणी आणि निकाल जाहीर करणेही सोपे आहे. मतदान झाल्यानंतर केवळ निकालाच्या भागाचे बटण दाबल्यानंतर निकाल हाती येतो.

## ३. मतदानासंदर्भात कायदेशीर तरतुदी :-

मतदान केंद्राध्यक्ष म्हणून तुमच्यावर येणाऱ्या कायदेशीर जबाबदाऱ्या योग्यप्रकारे समजावून घ्याव्यात. त्या (जोडपत्र-२) मध्ये पुनर्मुद्रित करण्यात आल्या आहेत.

## ४. कामाची व्यापक कल्पना :-

४.१ मतदान केंद्राध्यक्ष म्हणून काम करताना तुम्हाला मदत व्हावी म्हणून ही निदेश पुस्तिका तयार करण्यात आली आहे. तथापि, ती सर्वतया परिपूर्ण आहे असे समजू नये. जेथे जेथे आवश्यकता भासेल तेथे तुम्ही कायदेशीर संदर्भ पहावा. हे कायदेशीर संदर्भ **(जोडपत्र-१)** मध्ये उद्धृत करण्यात आले आहेत.

**४.२ या पुस्तिकेतील विविध भागांत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु तुमच्या कामाच्या काही महत्वपूर्ण व ठळक गोष्टी मार्गदर्शनासाठी खाली देण्यात येत आहेत:-**

१. मतदान यंत्राद्वारे घेण्यात येणाऱ्या मतदानाचे नियम आणि प्रक्रियेसंदर्भात तुम्ही पूर्ण माहिती करुन घ्या.
२. मतदान यंत्राच्या कार्याबद्दल, त्याच्या विविध बटनाची कार्ये आणि ती कशी वापरावी याची माहिती करुन घ्या.

३. तुमच्या मतदान पथकातील प्रत्येक सदस्याची ओळख करुन घ्या आणि केंद्राध्यक्ष म्हणून तुमची नियुक्ती झाल्यापासून तुम्ही त्यांच्याशी संपर्क ठेवा.
४. निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या सर्व सूचना तुम्ही तुमच्यापाशी सदैव ठेवा.
५. तुमच्या मतदान केंद्राचे ठिकाण आणि तेथे पोहचणे व परतीच्या मार्गाची पूर्ण माहिती करुन घ्या.
६. सर्व प्रशिक्षण वर्ग व प्रात्यक्षिकास उपस्थित रहा.
७. मतदानाचे साहित्य घेताना खात्री करा की तुम्हाला सर्व साहित्य मिळाले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मतदान यंत्र (मतदान व नियंत्रण विभाग), प्रदत्त मतपत्रिका (टेंडर्ड बॅलट पेपर्स), मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१), चिन्हांकित मतदार यादी, कागदी मोहरा(पेपर सील), वैधानिक फॉर्म, सिलींग वॅक्स आणि मतदारांच्या बोटांना लावायची शाई / पक्क्या शाईचे मार्कर पेन
८. मतदार केंद्रात आल्यानंतर केंद्रात गुप्त मतदानासाठी कशी रचना करावयाची याचा आढावा घ्या. मतदारांची रांग कोठे असावी, मतदान चालू असताना बाह्य हस्तक्षेपापासून संरक्षण व्हावे म्हणून कोणती खबरदारी घ्यावी याचाही विचार करा.
९. मतदान सुरु होण्यापूर्वी मतदान यंत्राची चाचणी घ्या आणि तेथे उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना मतदान यंत्रात मतदानाची नोंदणी झालेली नाही याची खातरजमा करा. मतदान यंत्र पूर्णपणे दुरुस्त आहे व मतदानास सज्ज आहे याचीही प्रतिनिधींना खात्री पटवा. त्यासाठी प्रत्येक उमेदवाराच्या नावावर नमुना चाचणी मतदान करुन दाखवा आणि शेवटी निकाल जाहीर करुन दाखवा.
१०. असे नमुना मतदान चाचणी कार्य पूर्ण झाल्यानंतर त्याचा निकाल यंत्रातून पुसून टाका. नंतर मतदान यंत्राचा नियंत्रण विभाग पेपरसील लावून बंद करा.
११. निवडणूक आयोगाने ठरविलेल्या वेळेनुसार मतदान सुरु करा. मतदान सुरु होण्यापूर्वी उमेदवार किंवा मतदान प्रतिनिधी आणि मतदान अधिकाऱ्यांना मतदानासंदर्भात गुप्तता ठेवण्याचा इशारा द्या आणि संबंधित अधिनियमातील तरतुदीसंदर्भात त्यांना सावध करा.
१२. मतदानास सुरुवात करण्यापूर्वी तुम्ही विहित नमुन्यातील घोषणापत्र द्या की, मतदान यंत्राचे प्रात्यक्षिक घेतले. तसेच उमेदवार वा मतदान प्रतिनिधींना मतदार यादी व मतदार नोंदवही दाखविली. त्यासंदर्भात घोषणापत्रावर त्यांची सही घ्या.
१३. मतदारांच्या ओळखीची पहिल्यांदा मतदान अधिकाऱ्याने खातरजमा करावी. मतदाराने आणलेली ओळखीची अनधिकृत चिठ्ठी सर्रासपणे स्वीकारु नये.
१४. मतदाराची मतदार यादीनुसार ओळख पटल्यानंतर त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाईचे निशाण करा.
१५. मतदाराच्या तर्जनीवरील शाई पूर्ण वाळली आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी मतदार मतदान केंद्राबाहेर पडण्यापूर्वी ती खूण पुन्हा तपासा.
१६. मतदाराची ओळख पटल्यानंतर चिन्हांकित मतदार यादीत त्याचे नांव अधोरेखित करा. महिला मतदार असेल तर टीक ( ✓ ) मार्कही करा.
१७. चिन्हांकित मतदार यादीतील मतदाराचा अनुक्रमांक मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) नोंद करा.

१८. मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा घ्या आणि नंतरच त्याला मतदान करु द्या. जर तो सही किंवा अंगठ्याचा ठसा देण्यास राजी नसेल तर त्याला मतदान करण्यास परवानगी देऊ नका.

१९. मतदाराने मतदार नोंदवहीत सही केली अथवा अंगठ्याचा ठसा केला की त्याला मतदार पत्र (विहित नमुन्यातील) (मतदार स्लीप) द्या. त्यात मतदार नोंदवहीतील त्याचा अनुक्रमांक लिहून द्या. मतदार स्लीपचा नमुना प्रकरण १७, परिच्छेद ८.१ मध्ये दिला आहे.

२०. मतदार स्लीपनुसार मतदान यंत्राद्वारे मतदान करण्यास परवानगी द्या. तसे करताना मतदार नोंदवहीतील अनुक्रमांकाचे काटेकोरपणे पालन करा.

२१. राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २९ डिसेंबर, २०२२ च्या **(जोडपत्र-१९)** आदेशान्वये मतदान यंत्रावरील END बटणाचा वापर कशा प्रकारे करण्यात यावा याबाबत सविस्तर आदेश काढलेले आहेत. त्यानुसार जे मतदार NOTA बटणाचा वापर करण्यास नकार देतील अशा मतदारांना *END* बटणाचा वापर करून मतदान प्रक्रिया पूर्ण करता येईल. जर मतदारांनी *NOTA* व *END* या दोन्ही बटणांचा वापर करण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांना सदर आदेशात दिलेली कार्यपध्दती वापरून *END* बटण दाबून, मतदान प्रक्रिया पुढे नेता येईल.

२२. विशेष घटनांची तुम्ही मतदान केंद्राध्यक्षाच्या रोजनिशीत नोंद करा.

२३. मतदान शांततेने आणि सुरळीत पार पडावे म्हणून मतदान प्रक्रियेवर तुम्हाला नियंत्रण ठेवायला हवे. त्यासाठी तुम्ही शिस्तबध्दता ठेवावी आणि नि:पक्षपाती दृष्टीकोन ठेवावा.

२४. निवडणूक आयोगाने निश्चित करुन दिलेल्या वेळेतच मतदान बंद करावे. काही कारणाने मतदान उशिरा सुरु झालेले असले तरी बंद मात्र वेळीच केले पाहिजे. परंतु मतदानाच्या वेळेत रांगेत उभ्या असलेल्या सर्व मतदारांना मतदान करु द्यावे. मग मतदानाची वेळ संपलेली असली तरी चालेल. पण एक मात्र खात्री करुन घ्या की मतदानाची वेळ संपल्यानंतर कुणीही नवा मतदार रांगेत उभा राहणार नाही. त्यासाठी रांगेत उभ्या असलेल्या मतदाराना तुम्ही चिठ्ठया द्या. या चिठ्ठया रांगेत शेवटी उभ्या असलेल्या मतदारापासून देण्यास सुरवात करा.

२५. मतदान बंद झाल्यानंतर नमुना व्हीएम-३ मध्ये मतदानाच्या नोंदीचा ताळेबंद द्यावा. या ताळेबंदाची अधिकृत प्रत उपस्थित असलेल्या प्रत्येक उमेदवारास किंवा मतदान प्रतिनिधीला द्यावी. अशी प्रत दिल्याचे प्रतिज्ञापत्र तुम्ही आयोगाने दिलेल्या विहित नमुन्यात द्यावे.

२६. मतदान बंद झाल्यानंतर मतदान यंत्र आणि मतदानाचे इतर साहित्य निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार व्यवस्थित सीलबंद करावे. उपस्थित असलेले उमेदवार अथवा मतदान प्रतिनिधींनाही त्यांची इच्छा असल्यास मतदान यंत्र आणि मतदान कागदपत्रे सीलबंद करताना त्यासंदर्भातील सूचनांचे काळजीपूर्वक पालन करावे.

२७. मतदान यंत्र आणि मतदानाची संबंधित कागदपत्रे योग्यप्रकारे सीलबंद करुन ती जमा करणाऱ्या अधिकाऱ्याकडे सुपूर्द करणे आणि त्या संबंधीची पोचपावती घेणे ही तुमची व्यक्तिगत जबाबदारी आहे.

५. मतदानाच्या विविध प्रक्रिया काळात तुमच्या जबाबदारीसंदर्भात पाच वेगवेगळया गटात जबाबदारीची विभागणी केली असून ती **जोडपत्र - २** मध्ये देण्यात आली आहे.

६. **चेक मेमो :-**

निवडणुकीसंदर्भातील विविध वैधानिक आवश्यकतांची तुम्ही पूर्तता केली आहे किंवा नाही याची खातरजमा करण्यासाठी निवडणूक आयोगाने तुमच्यासाठी 'चेक मेमो' तयार केला आहे. तो चेक मेमो **जोडपत्र - ३** मध्ये देण्यात आला आहे. या चेक मेमोचे तुम्ही काटेकोरपणे पालन करावे.

७. **खुणचिठ्ठ्या (ॲड्रेस टॅग) :-**

मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटला हिरव्या रंगाचे ॲड्रेस टॅग वापरण्यात येतात. तर बॅलेट युनिटला पांढऱ्या रंगाचे ॲड्रेस टॅग वापरण्यात येतात. त्यांचा नमूना खालीलप्रमाणे आहे.

**कंट्रोल युनिटचा हिरव्या रंगाचा ॲड्रेस टॅग**

--------------------महानगरपालिका
सार्वत्रिक/पोट निवडणूक सन ------------
(तालुका--------------जि-------------------)
प्रभाग क्रमांक------------------- मतदान केंद्र क्रमांक--------------
कंट्रोल युनिट अनुक्रमांक----------------------
मतदानाचा दिनांक -------------------------

**बॅलेट युनिटचा पांढऱ्या रंगाचा ॲड्रेस टॅग**

--------------------महानगरपालिका
सार्वत्रिक/पोट निवडणूक सन ------------
(तालुका-------------जि.-----------------)
प्रभाग क्रमांक- ------------------- मतदान केंद्र क्रमांक----------------
बॅलेट युनिट अनुक्रमांक------------------------
मतदानाचा दिनांक ---------------------------

याव्यतिरिक्त कंट्रोल युनिट सील करण्यासाठी स्पेशल टॅग, पेपरसील व पट्टीसील यांचा वापर करण्यात येतो.

## प्रकरण - २

## मतदान पथक स्थापन करणे आणि सरावासाठी तालीम घेणे

**१. मतदान पथक :-** महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी तुमच्या मतदान पथकात तुम्ही आणि तीन मतदान अधिकाऱ्यांचा समावेश असेल. मतदान केंद्रात ८०० ते ९०० च्या आसपास मतदार असतील (बृहन्मुंबई महानगरपालिकेकरीता ११०० ते १२००) **(जोडपत्र-१८)**. जर त्यापेक्षा जास्त मतदार असतील तर तुमच्या मदतीसाठी अतिरिक्त मतदान अधिकाऱ्याची निवडणूक निर्णय अधिकारी नेमणूक करतील. मतदान पथक स्थापन करताना निवडणूक निर्णय अधिकारी एका मतदान अधिकाऱ्यास मतदान केंद्राध्यक्षाचे कार्य करण्याची परवानगी देईल. तुम्ही मतदान केंद्रातून अपरिहार्य कारणास्तव गैरहजर राहणार असाल तेव्हा तो तुमचे काम पाहील.

**२. मतदान पथकाच्या इतर सदस्यांशी संपर्क :-** तुमच्या मतदान पथकातील इतर सदस्य कोण आहेत त्याची माहिती मिळवा. तुमच्या अधिकाराखाली काम करणाऱ्या सर्व मतदान अधिकाऱ्याचे निवासी पत्ते तुम्ही जवळ ठेवायला हवेत. त्यांना तालमीचे वेळी भेटून तुम्ही त्यांना त्यांचे काम समजावून द्यायला हवे. जर सांघिक कामाची पध्दत अवलंबिली नाही तर तुमचे काम कठीण होईल.

३. मतदानाची तालीम :-

३.१ शक्य होईल तेवढ्या मतदानाच्या तालीम वा प्रात्यक्षिकास उपस्थित रहा. मतदान यंत्राचे काम समजून घेण्यासाठी त्याची आवश्यकता आहे. तसेच मतदान केंद्रातील प्रक्रिया व कायद्याच्या तरतुदी जाणून घेण्यासाठीही अशा तालीम आवश्यक आहेत.

३.२ तुमच्या गैरहजेरीत मतदान केंद्राध्यक्ष म्हणून काम करण्यास परवानगी दिलेल्या मतदान अधिकाऱ्यास तालमीच्यावेळी सोबत घेऊन जा. तुम्ही मतदान यंत्र प्रत्यक्ष हाताळा केवळ प्रात्यक्षिक बघून चालणार नाही. तुम्ही दोघांनी सील लावणे, पत्त्याचे टॅग लावणे आवश्यक आहे.

३.३ नमुना व्हीएम-३ मध्ये कागदी मोहर आणि नोंदणी झालेल्या मतांचा हिशोब करणे तुम्ही समजावून घेणे आवश्यक आहे.

३.४ यापूर्वी जरी तुम्ही मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी म्हणून काम केलेले असले तरी तुम्ही या तालमी किंवा प्रात्यक्षिकांना उपस्थित रहावे. कारण तुम्हाला मतदान यंत्रावर काम करण्याचा अनुभव नसेल.

त्याचप्रमाणे निवडणुकीचे नियम व कायदे वेळोवेळी बदलतात. त्याचीही तुम्हाला माहिती होणे आवश्यक आहे. कोणत्याही कायद्याची वा नियमांची अद्ययावत माहिती ठेवणे ही सर्वात चांगली गोष्ट आहे.

## ४. टपाली मतपत्रिका आणि निवडणूक कामाशी संबंधित असल्याचे प्रमाणपत्र :-

४.१ तुम्ही आणि तुमचे मतदान अधिकारी तुम्ही नियुक्त झालेल्या मतदान केंद्रातील किंवा दुसऱ्या मतदान केंद्रातील मतदाते असाल याची जाणीव ठेवून निवडणूक निर्णय अधिकारी तुम्हाला मतदान केंद्राध्यक्ष नियुक्तीचे आदेश देतील आणि त्याबरोबरच पुरेसे विहित नमुन्यातील अर्ज पाठवतील. हे अर्ज तुम्हाला व तुमच्या मतदान अधिकाऱ्यांना टपालाद्वारे मतदान करण्यास व निवडणूक कामावर नियुक्त असल्याचे प्रमाणपत्र मिळविण्यास उपयोगात येतील. जर तुम्ही किंवा तुमच्या पथकातील कुणीही त्याच मतदार संघातील मतदार असाल तर तुम्ही विहित नमुन्यात निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे अर्ज करुन निवडणूक कामावर नियुक्त असल्याचे प्रमाणपत्र मिळवा. आणि जर तुम्हाला नियुक्त केलेल्या मतदान केंद्राच्या मतदार संघाचे तुम्ही मतदार नसाल तर विहित नमुन्यात अर्ज करुन टपालाद्वारे मतदान करण्यासाठी मतपत्रिका मिळवा. दोन्ही परिस्थितीत तुम्ही, तुम्हाला पाठविलेल्या नियुक्ती आदेशाची नकलप्रत परत पाठविताना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना पाठवा अन्यथा तुम्हाला निवडणूक कामावर नियुक्त असल्याचे प्रमाणपत्र मिळण्यास व टपालाद्वारे मतपत्रिका मिळण्यास उशीर होईल व तुम्हाला मतमोजणीपूर्वी मतदान करणे कठीण जाईल. निवडणूक कामावर असलेल्या व्यक्तिकडून टपालाद्वारे मतदान करण्यासाठी करावयाचा अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास वेळीच करावयास हवा. म्हणजे निवडणूक निर्णय अधिकारी तुम्हाला मतदानाच्या आदल्या दिवशी अथवा मतदार संघाच्या मतदानाच्या पहिल्या दिवशी मतदान करण्यास परवानगी देईल.

४.२ तालीम आणि प्रात्यक्षिकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदार यादीची नकलप्रत निरीक्षणासाठी तालीम वा प्रात्यक्षिक केंद्रात उपलब्ध करुन देईल. त्यामुळे टपालाद्वारे मतदान करण्यासाठी किंवा निवडणूक कामावर असल्याचे प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज भरण्यास आवश्यक ती माहिती तुम्हाला उपलब्ध होईल.

४.३ राज्य निवडणूक आयोगाकडील टपाली मतपत्रिका आदेशामधील तरतुदीनुसार टपालाद्वारे मतदान करणाऱ्या निवडणूक कर्मचाऱ्यांनी सदर आदेशातील तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. जेणेकरुन त्यांना निवडणूक कर्तव्यार्थ नेमलेल्या मतदान केंद्रावर अथवा टपालाद्वारे मतदान करणे शक्य होईल.

## प्रकरण - ३

## मतदान यंत्रे आणि मतदानाचे साहित्य ताब्यात घेणे

१. **मतदानाचे साहित्य :-**

१. मतदानाच्या पहिल्या दिवशी अथवा मतदान केंद्राचा ताबा घेण्यासाठी जाताना तुम्हाला मतदानाचे आवश्यक ते सर्व साहित्य देण्यात येईल. या साहित्याबद्दलची यादी **परिशिष्ट - ४** मध्ये देण्यात आली आहे. हे सर्व साहित्य तुम्हाला मिळाले आहे याची खात्री करुन घ्या.

२. **मतदान यंत्राची तपासणी :-**

**पुढील गोष्टींची विशेष चाचणी करा :-**

१. तुम्हाला देण्यात आलेल्या मतदान यंत्राचे (१) नियंत्रण विभाग आणि (२) मतदान विभाग तुमच्या मतदान केंद्रासाठी देण्यात आलेल्या मतदान यंत्राचेच आहेत याची खात्री करा. ही खातरजमा करण्यासाठी यंत्राच्या या पृष्ठभागावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने लावलेली पत्त्याची खूणचिठ्ठी (टॅग) पहावी.

२. नियंत्रण विभागाचा कॅन्डसेट सेक्शन योग्यप्रकारे सीलबंद आहे की नाही व त्यावर खूणचिठ्ठी लावली आहे की नाही हे पहावे.

३. कॅन्डसेट सेक्शनमधील बॅटरी चालू आहे की नाही याचीही खात्री करा. त्यासाठी यंत्राच्या मागे असलेला वीजेचा स्वीच सुरु करुन पहा. नंतर तो स्वीच बंद करा.

४. तुम्हाला आवश्यक तेवढे मतदान विभाग देण्यात आले आहे की नाही याची खात्री करा आणि मतपत्रिका स्क्रीन खाली कागद घालण्यात आला आहे की नाही याचीही काळजी घ्या. तुमच्या प्रभागात किती उमेदवार आहेत त्यांच्या संख्येनुसार तुम्हाला 'मतदान विभाग' (युनिट) पुरविण्यात येतील.

५. वर म्हटल्याप्रमाणे मतपत्रिका आणि स्लाईड स्वीच योग्य प्रकारे आहे तसेच मतदान युनिटमध्ये ठेवण्यात आलेली मतपत्रिका आणि उमेदवाराचे नाव आणि त्याची निशाणी समोरासमोर आहे की नाही याची तसेच त्याच्यासमोरील दिवा आणि बटणही समोरासमोर आहे की नाही याची खात्री करा.

६. जेवढे स्पर्धक उमेदवार असतील तेवढेच बटण मतदान युनिटवर असायला हवेत. बाकी बटण झाकले (मास्क) जातील अशी व्यवस्था करावी. शेवटच्या बॅलेट युनिटवरील END बटण सुरु (UNMASK) राहील. मात्र त्यावर काळी कॅप लावून ठेवावी. मतदान यंत्रावरील END बटणाचा वापर कशा प्रकारे करण्यात यावा याबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २९ डिसेंबर, २०२२ च्या **(जोडपत्र-१९)** आदेशानुसार सविस्तर आदेश काढलेले आहेत. त्यानुसार जे मतदार NOTA बटणाचा वापर करण्यास नकार देतील अशा मतदारांना *END* बटणाचा वापर करून मतदान प्रक्रिया पूर्ण करता येईल. जर मतदारांनी *NOTA* व *END* या दोन्ही

बटणांचा वापर करण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांना सदर आदेशात दिलेली कार्यपध्दती वापरून *END* बटण दाबून, मतदान प्रक्रिया पुढे नेता येईल.

७. प्रत्येक मतदान युनिट उजवीकडे वरच्या बाजूला आणि उजवीकडे खालच्या बाजूला सीलबंद आहेत का पहावे. त्यावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचा सील आणि पत्ता असलेली खूणचिठ्ठी (टॅग) आहे की नाही हेही पहावे.

३. **मतदान साहित्याची तपासणी :-**

खालील बाबी देखील तपासा.

१) तुम्हाला देण्यात आलेल्या दोन छोट्या बाटलीत पुरेशी मतदानाची शाई आहे की नाही याची खातरजमा करा. न मिटणाऱ्या शाईचे मार्कर पेन देण्यात आले असतील तर ते सीलबंद असतात तसेच त्यावर एक्सपायरी डेट छापलेली असते ती तपासा. त्यामधील शाई सुकलेली नाही हे प्रत्यक्ष वापर करून तपासा.

२) मतदार यादीचा तुमचा भाग संपूर्ण आहे आणि त्याच्या सर्व प्रती एकसारख्या आहेत हे पहा.

अ) मतदार यादीचा जो भाग तुम्हाला आला आहे तो तुमच्या मतदान केंद्राशी संबंधित आहे आणि जोडयाद्याही व्यवस्थित आहेत की नाही हे पहा.

ब) जोडयाद्यांत नावे गाळणे, शब्द शुध्दीकरण आणि इतर चुकांची केलेली दुरुस्ती तीनही नकलप्रतीवर केलेल्या आहेत किंवा काय याची खात्री पटवा.

क) ज्यावर नोंदी करण्यात येणार आहे त्या गतदार यादीच्या प्रत्येक पानावर हाताने अनुक्रमांक (१ आकड्याने सुरुवात करुन) घातलेले आहे की नाही हे पहा.

ड) मतदारांच्या छापील अनुक्रमांकात खाडाखोड वा दुरुस्ती केलेली नाही आणि नवीन क्रमांक घालण्यात आलेले नाहीत याची खात्री करा.

इ) तुम्हाला देण्यात आलेल्या प्रदत्त मतपत्रिका (टेंडर्ड बॅलट पेपर) तुमच्या मतदान केंद्राशी संबंधित प्रभागाचेच आहेत आणि त्यात कोणत्याही त्रुटी नाहीत याची खात्री करा. तुम्हाला पुरविण्यात आलेल्या तपशीलाशी प्रदत्त मतपत्रिकांचे अनुक्रमांक जुळतात वा नाही याची खात्री करा.

४. मतदान यंत्रे वा मतदानाच्या साहित्यात काही त्रुटी आढळल्या तर त्याची माहिती लगेच हे साहित्य व यंत्रे पुरविणाऱ्या अधिकाऱ्यास अथवा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास द्या.

५. मतदान यंत्रावर केंद्र क्रमांक दर्शविण्याकरीता खूणचिठ्ठी अथवा कागदी स्टीकरचा वापर करता येईल. मात्र कोणत्याही परिस्थितीत मार्कर पेन इ. चा वापर करू नये व मतदान यंत्र / मतदान यंत्राची बॅग खराब होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

## प्रकरण - ४

## मतदान केंद्रे स्थापन करणे

### १. प्रवास

तुमच्या मतदान केंद्रात पोहोचण्यासाठीचा मार्ग, साधन आणि वेळेचा निश्चित आराखडा याची माहिती करुन घ्या. प्रवास मार्ग, साधन आणि वेळेचा सविस्तर तपशील तुम्हाला आगाऊ देण्यात येईल.

### २. मतदान केंद्रात आगमन

मतदान सुरु होण्यापूर्वी कमीत कमी ७५ मिनिटे अगोदर मतदान केंद्रात पोहचा.

### ३. मतदान अधिकाऱ्याची अनुपस्थिती

जर तुमच्या मतदान केंद्रातील मतदान अधिकारी अचानक अनुपस्थित राहिला तर त्याच्या जागी नवा मतदान अधिकारी नेमण्याचा तुम्हाला अधिकार आहे. नंतर तुम्ही त्याच्या नियुक्तीची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळवा. अशी नेमणूक करताना उमेदवाराचा सक्रिय पाठीराखा अथवा उमेदवाराचा सक्रिय विरोधक व्यक्तीची नेमणूक करु नका.

### ४. केंद्राध्यक्षांची कामे

४.१ आजारपण किंवा अपरिहार्य कारणास्तव तुम्हाला मतदान केंद्रात गैरहजर रहावे लागले तर निर्वाचन अधिकाऱ्याने पूर्वीच परवानगी दिलेल्या मतदान अधिकाऱ्यास तुमची जागा घ्यावी लागेल. त्याला मतदान केंद्राध्यक्षांचे सर्व अधिकार असतील व त्याच्या सर्व जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील.

४.२ तुमच्या मतदान केंद्रातील कोणत्याही मतदान अधिकाऱ्यास तुमचे एखादे कार्य तुम्ही देऊ शकता. परंतु असे कार्य दुसऱ्या मतदान अधिकाऱ्यास दिले म्हणून तुमची जबाबदारी संपत नाही. केंद्राध्यक्ष म्हणून केंद्रात सुरळीत मतदान घेणे ही सर्वस्वी तुमची जबाबदारी आहे.

### ५. मतदान केंद्रे स्थापन करणे

५.१ जेथे तुमची नियुक्ती केली आहे त्या मतदान केंद्राच्या इमारतीकडे पोहोचल्यानंतर इमारतीची तपासणी करा. जर मतदान केंद्र स्थापन करण्यात आले असेल तर मतदान केंद्राची तपासणी करा. तीन मतदान अधिकारी असलेल्या मतदान पथक आणि मतदान केंद्राचा आराखडा (एका निवडणुकीसाठी) **जोडपत्र-५** मध्ये दाखविण्यात आला आहे. त्यानुसार मतदान केंद्राची रचना करा. आवश्यक वाटल्यास रचनेत किरकोळ फेरफार तुम्हाला करता येतील. परंतु तसे करताना खालील मुद्दे लक्षात असू द्या.

अ) मतदान केंद्राच्या बाहेर उभे राहण्यासाठी मतदारांना पुरेशी जागा उपलब्ध होईल.

ब) शक्यतो महिला आणि पुरुषांसाठी वेगवेगळया रांगेची व्यवस्था करा.

क) मतदारांना मतदान केंद्रात येण्यासाठी आणि बाहेर जाण्यासाठी वेगवेगळी जागा ठेवा. जर दरवाजा एकच असेल तर शक्य झाल्यास मध्ये दोरी बांधून येण्या-जाण्याचा मार्ग निश्चित करा.

ड) मतदारांना मतदान केंद्रात येण्या-जाण्यासाठी सहजता असली पाहिजे. मतदान केंद्रात गर्दी-गोंधळ असू नये.

इ) मतदान प्रतिनिधींना बसण्याची अशी व्यवस्था केलेली असावी की त्यांना मतदान केंद्रात शिरणाऱ्या मतदाराचा चेहरा स्पष्ट दिसावा. म्हणजे आवश्यकता असेल तर मतदाराच्या ओळखीबद्दल आव्हान देणे त्यांना शक्य होईल. तसेच मतदान यंत्राचा नियंत्रण भाग मतदान केंद्राध्यक्षाकडे असतो. मतदाराने मतदान विभागात मतदान करुन बाहेर पडेपर्यंतच्या सर्व हालचालीचा मतदान प्रतिनिधींना अंदाज घेता येईल. परंतु मतदार कुणाला मतदान करतो हे दिसेल अशा ठिकाणी मात्र त्यांची बसण्याची व्यवस्था करु नका.

प) मतदान अधिकाऱ्यांची बसण्याची जागेची अशाप्रकारे व्यवस्था करा की, त्यांनाही मतदाराने कोणते बटण दाबून मतदान केले हे दिसणार नाही.

फ) मतदान केंद्राला एकच दरवाजा असेल तर दरवाजाच्यामध्ये शक्य झाल्यास दोरखंड वा बांबू बांधून त्याचे दोन भाग करा व एका भागातून मतदान केंद्रात येण्यास व दुसऱ्या भागातून बाहेर पडण्याची व्यवस्था करा. मतदान विभागात पुरेशी प्रकाशाची व्यवस्था करा.

ब) राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५ दि.२६/०६/२०२५ **(जोडपत्र-१७)** अन्वये ( मुद्दा क्र.५ (v) ) दिलेल्या आदेशानुसार वृध्द/दिव्यांग व्यक्तींना मतदान केंद्रावर जाणे सुकर व्हावे म्हणून रॅम्पची सुविधा असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी तसेच व्हिलचेअरची देखील सुविधा असावी.

६० वर्षावरील नागरिक / अपंग / दिव्यांग / गरोदर स्त्रिया / तान्ह्यामुलासह असणाऱ्या स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करु द्यावे ( मुद्दा क्र.५ (xi) ).

५.२ जर तुमच्या मतदान केंद्रात बऱ्याच बुरखाधारी महिला येणार असतील तर त्यांची ओळख पटविण्यासाठी आणि त्यांच्या तर्जनीवर मतदान शाई लावण्यासाठी महिला मतदान अधिकाऱ्याची व्यवस्था करा. तसेच या महिलांसाठी वेगळा विभाग ठेवण्याचीही व्यवस्था करा.

५.३ जर एकाच इमारतीत एकापेक्षा अधिक मतदान केंद्रे असतील तर मतदारांचा गोंधळ उडू नये म्हणून प्रत्येक मतदान केंद्रासमोर त्या त्या मतदान केंद्राच्या मतदारांना रांगेत उभे राहण्यासाठी पुरेशी जागा आहे किंवा काय याची खात्री करा.

५.४ जर मतदान केंद्र खाजगी इमारतीत असेल तर ती इमारत आणि तिच्या भोवतीच्या १०० मीटर परीघातील क्षेत्र तुमच्या अधिकाराखाली असेल. प्रेक्षक किंवा इमारतीच्या मालकाशी संबंधित कुणाही व्यक्तिला मग ते हत्यारबंद असो वा नसो त्यांना मतदान केंद्रात वा त्याच्या १०० मीटर्स परिघात राहण्यास परवानगी देऊ नका. मतदान केंद्रातील व केंद्राभोवतीच्या १०० मीटर परिघातील सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी तुमच्या नियंत्रणाखालील पोलिसांची असेल.

२५

५.५ निवडणुकीवर परिणाम करु शकतील असे राजकीय नेत्यांचे फोटो आणि घोषणा लावण्यात येणार नाही याची खबरदारी घ्या आणि तसे फोटो वा घोषणा पूर्वीच तेथे असतील तर त्या मतदान संपेपर्यंत काढून टाकण्याची अथवा झाकण्याची व्यवस्था करा.

५.६ मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रात स्वयंपाकासाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी आगीचा वापर करु देऊ नका.

## ६. सूचना लावणे

६.१ प्रत्येक मतदान केंद्राबाहेर ठळकपणे पुढील सूचना लावा.

- अ) मतदानाचे क्षेत्र किंवा मतदान केंद्रात कोणत्या मतदारांना मतदान करता येईल. याबद्दल सूचना लावा.
- ब) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी तसेच जेथे शक्य होईल तेथे प्रत्येक उमेदवाराचे नाव आणि त्याची निशाणीही लावा.

६.२ सूचना, स्पर्धक उमेदवारांची यादी ज्या भाषेत असेल त्याच भाषेत असावी आणि नावाचा अनुक्रमांकही या यादीप्रमाणेच असावा.

## प्रकरण - ५

## मतदान अधिकाऱ्यांना कामे वाटून देणे

### १. मतदान केंद्रातील मतदान प्रक्रिया आणि मतदान अधिकाऱ्यांची कामे

तुमच्या मतदान केंद्रातील मतदान सुरळीत व कार्यक्षमपणे पार पडावे म्हणून मतदाता तुमच्या केंद्रात आल्यापासून तो मतदान करुन बाहेर पडेपर्यंतच्या सर्व मतदान सोपस्काराची तुम्हाला पूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. अशा मतदानाची प्रक्रिया आणि मतदान अधिकाऱ्याने पार पाडावयाची कार्ये संबंधित भागात चर्चिण्यात आली आहेत. तथापि, मतदान अधिकाऱ्यांनी करावयाची कार्ये ढोबळरित्या पुढीलप्रमाणे असतील.

(अ) एक मतदान केंद्राध्यक्ष तीन मतदान अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या मतदान पथकाच्या एका निवडणुकीसाठी मतदान अधिकाऱ्याची कार्ये.

### २. प्रथम मतदान अधिकारी

प्रथम मतदान अधिकाऱ्याकडे चिन्हांकित मतदार यादी असेल आणि मतदाराची ओळख पटविण्याची त्याची जबाबदारी असेल. मतदान केंद्रात शिरल्यानंतर मतदार प्रथम मतदान अधिकाऱ्याकडे जाईल. मतदाराची तो ओळख पटवील. (राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/का-५,दि. १४/०७/२०२५ च्या आदेशामधील **(जोडपत्र-१२)** पुरावे विचारात घेणे.)

### ३. दुसरा मतदान अधिकारी

३.१ दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे मतदानाची शाई असेल. तो मतदाराच्या डाव्या हाताची तर्जनी पाहील आणि त्यावर शाईची निशाणी नाही ना याची खातरजमा करील आणि नंतर त्यावर न मिटणाऱ्या शाईच्या मार्कर पेनने चिन्ह करील. त्याकरिता मार्कर पेन दाबून वापरावा तसेच मार्कर पेनचा वापर निशाणीसाठी डाव्या हाताच्या तर्जनीवर तीन-चार वेळा घासून करावा. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे निदेश पत्र क्र.रानिआ/मनपा/२०१०/प्र.क्र.१०/का-५ दि.१९/११/२०११ **(जोडपत्र -२१)** कृपया पहावे.

३.२ दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे नमुना व्हीएम-१ मध्ये मतदार यादी असेल. तो नोंदवहीत ओळख पटविलेल्या व मतदान केलेल्या मतदारांची नोंद ठेवील व मतदाराला मतदान करु देण्यापूर्वी त्याची नोंदवहीवर सही अथवा अंगठ्याचा ठसा घेण्याची जबाबदारीही या दुसऱ्या मतदान अधिकाऱ्यावर राहील. मतदाराचा तपशील मतदार नोंदवहीत नोंद केल्यानंतर मतदाराला 'वोटर्स स्लीप' देण्याचे कामही हा अधिकारी करील.

## ४. तिसरा मतदान अधिकारी

४.१ मतदान यंत्राच्या नियंत्रण विभागाची जबाबदारी तिसऱ्या मतदान अधिकाऱ्यावर राहील. मतदान केंद्राध्यक्ष ज्या टेबलावर बसेल त्याच टेबलावर हा मतदान अधिकारीही असेल. त्यामुळे मतदान केंद्राध्यक्षाला मतदान प्रक्रिया आणि नियंत्रण विभागावरही बारीक नजर ठेवता येईल. दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने मतदाराला दिलेली 'वोटर्स स्लीप' पाहूनच तिसरा मतदान अधिकारी मतदाराला अनुक्रमांकाने मतदान विभागाकडे जाऊ देईल. तसेच मतदान विभागात ठेवण्यात आलेले मतदान युनिट नियंत्रण विभागातील योग्य ते बटण दाबून कार्यरत (सुरु) करील. मतदान करु देण्यापूर्वी हा अधिकारी मतदाराच्या तर्जनीवरील शाईचे चिन्हही तपासेल.

४.२ ज्या मतदान केंद्रात मतदारांची संख्या कमी आहे तेथे तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याचे काम केंद्राध्यक्षच करील. त्यामुळे मतदान पथकावरील खर्च कमी होण्यास मदत होईल.

## प्रकरण - ६

## मतदान केंद्रात प्रवेशपात्र व्यक्ती आणि केंद्रातील आसन व्यवस्था

### १. मतदान केंद्रात प्रवेशपात्र व्यक्ती

१.१ तुमच्या मतदान केंद्रात मतदान करणाऱ्या मतदाराव्यतिरिक्त पुढील व्यक्तींना मतदान केंद्रात प्रवेश असेल.

(अ) मतदान अधिकारी
(ब) एकावेळी एक उमेदवार, त्याचा निवडणूक प्रतिनिधी व एक प्रतिनिधी
(क) राज्य निवडणूक आयोगाने परवानगी दिलेली व्यक्ती
(ड) निवडणूक कामावरील सरकारी सेवक
(इ) राज्य निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले निरीक्षक
(ई) मतदारासोबत येणारे बालक/मूल
(प) मदतीविना चालू न शकणाऱ्या अंध व अपंग मतदारासोबत येणारी व्यक्ती
(फ) तुम्ही मतदाराची ओळख पटविण्यासाठी अथवा मतदानाच्या कामात तुम्हाला मदत करण्यासाठी तुम्ही मतदान केंद्रात प्रवेश दिलेली व्यक्ती

१.२ निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांना निवडणूक निर्णय अधिकारी त्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्र देईल. आवश्यकता भासल्यास असे ओळखपत्र सादर करण्यास तुम्ही उमेदवाराला सांगू शकता. त्याचप्रमाणे उमेदवाराच्या निवडणूक प्रतिनिधींनाही तुम्ही त्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्र जे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्यांना दिलेले असेल ते सादर करण्यास सांगू शकता.

१.३ निवडणुकीसंदर्भात कामावरील सरकारी नोकर ही संज्ञा सर्वसाधारणपणे पोलिस अधिकाऱ्यास लागू होत नाही. गणवेषातील किंवा साध्या वेषातील पोलिसांना मतदान केंद्राच्या आत येण्यास परवानगी देऊ नये. परंतु कायदा व सुव्यवस्था अथवा अशाच दुसऱ्या कारणासाठी तुम्ही त्यांना आत बोलविण्याचा निर्णय घेऊ शकता. कारण मतदान केंद्रातील पोलीस उपस्थितीला उमेदवार अथवा राजकीय पक्ष आक्षेप घेऊ शकतील आणि आपल्या प्रतिनिधींना पोलीस शक्तीचा अनावश्यक धाक दाखविला अशी तक्रार करु शकतील.

१.४ तसेच एखाद्या मतदाराच्या किंवा उमेदवाराच्या किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधीच्या सोबत सुरक्षा कर्मचाऱ्यांनाही मतदान केंद्रात प्रवेश देऊ नका.

१.५ निवडणुकीसंदर्भात कामावरील लोकसेवक ही व्याख्या राज्य व केंद्र सरकारचे मंत्री, उपमंत्री आणि राज्यमंत्र्यांना लागू होत नाही आणि त्यासाठी आयोगाच्या सूचनेनुसार त्यांची निवडणूक प्रतिनिधी वा मतदान प्रतिनिधी म्हणून नेमणूक करता येत नाही. कारण त्यांच्यासोबत सुरक्षा रक्षक असतात आणि त्यांना मतदान केंद्रात प्रवेश देता येत नाही. खासदार, आमदार व

अन्य लोकप्रतिनिधी यांना देखील मतदान केंद्रात ते संबंधित केंद्रावरील मतदार नसल्यास प्रवेश करता येणार नाही.

१.६ मतदान केंद्रातील प्रवेशावर नियंत्रण ठेवा नाहीतर सुरळीत व शिस्तबध्द मतदान घेण्यात अडथळे निर्माण होऊ शकतील. एकावेळी तीन ते चार मतदारांनाच मतदान केंद्रात घ्या.

१.७ जर कुणा व्यक्तीबद्दल तुम्हाला वाजवी संशय असेल आणि मतदान केंद्रातील त्यांच्या उपस्थितीबद्दल शंका घेण्यासारखी परिस्थिती असेल तर त्याच्याकडे मतदान केंद्रात येण्याचे अधिकृत पत्र असले तरी आवश्यक असेल तर तुम्ही त्याची झडती घेऊ शकता.

१.८ तुमचे कर्तव्य बजावताना तुम्ही केवळ निवडणूक आयोगाच्या सूचनांचे पालन करण्यातच बांधिल आहात. तुम्ही तुमच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या किंवा मंत्र्यासह राजकीय नेत्यांच्या सूचना ऐकू नका की त्यांच्यावर अनुग्रह करु नका. त्यांनी मतदान केंद्रात प्रवेशासाठी तुमच्याकडे मागणी केली तरी तुम्ही तशी परवानगी त्यांना देऊ नका. केवळ निवडणूक आयोगाचे अधिकृत पत्र त्यांच्याकडे असेल तरच परवानगी द्या.

१.९ मतदाराची ओळख पटविण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या कागदपत्रांपैकी एक कागदपत्र मतदाराजवळ असणे अनिवार्य आहे. **(जोडपत्र-१२)**

## २. मतदान प्रतिनिधींची (पोलिंग एजंटस) उपस्थिती

२.१ उमेदवाराच्या मतदान प्रतिनिधींना मतदान सुरु होण्यापूर्वी आणि मतदानाची तुम्ही व्यवस्था करीत असताना उपस्थित राहण्यास सांगावे. मतदान सुरु होण्यापूर्वी कमीत कमी एक तास आधी त्यांना उपस्थित रहाण्यास सांगावे. जर कुणी उशीरा आले तर तुम्ही मतदानाची जी प्रारंभिक व्यवस्था व प्रक्रिया केली असेल ती पुन्हापासून करण्याची गरज नाही.

२.२ मतदान प्रतिनिधी नेमण्यासाठी कायद्याने कोणतीही वेळ निश्चित केलेली नाही. म्हणून मतदान प्रतिनिधी जर मतदान केंद्रात उशीरा पोचले तर त्यांना मतदान केंद्रातील पुढील कामकाजात भाग घेण्यास परवानगी द्यावी.

## ३. मतदान प्रतिनिधींनी नियुक्तीपत्र सादर करणे

३.१ प्रत्येक मतदान प्रतिनिधींनी त्याच्या उमेदवाराने अथवा निवडणूक प्रतिनिधीने त्याची नियुक्ती केल्याचे पत्र सादर करावे. नियुक्तीपत्र तुमच्या मतदान केंद्राचेच आहे की नाही हे तपासा. नंतर मतदान प्रतिनिधीने आवश्यक ती कागदपत्रे तयार करावी आणि तुमच्यासमोर प्रतिज्ञापत्रावर सही करुन ते तुम्हाला सादर करावे. नंतरच त्याला मतदान केंद्रात प्रवेश द्यावा. अशी सर्व प्रतिज्ञापत्रे तुम्ही राखून ठेवावी आणि मतदान संपल्यानंतर ती इतर कागदपत्रांसह लखोट्यात घालून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठवावी.

३.२ मतदान प्रतिनिधीने सादर केलेल्या नियुक्तीपत्राबद्दल काही शंका असेल तर तुम्हाला निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सहीच्या नमुन्याशी दिलेल्या नियुक्तीपत्रातील सही पडताळून पहावी.

## ४. मतदान प्रतिनिधींसाठी प्रवेशपत्रे

प्रत्येक मतदान केंद्रात उमेदवार एक मतदान प्रतिनिधी आणि एकच बदली मतदान प्रतिनिधी नियुक्त करु शकतो. पण प्रत्येक वेळी केवळ एकाच मतदान प्रतिनिधीला मतदान केंद्रात प्रवेश मिळेल. मतदान प्रतिनिधींना मतदान केंद्रात आत - बाहेर येण्याजाण्यास सुलभता व्हावी म्हणून त्यांना प्रवेशपत्रे द्या.

## ५. मतदान प्रतिनिधींची आसन व्यवस्था

मतदार यादीची चिन्हांकित प्रत ज्या मतदान अधिकाऱ्याकडे असेल त्याच्या मागे मतदान प्रतिनिधींची बसण्याची सोय करा. जर मतदान केंद्रातील दार आदी अंतर्गत व्यवस्थेमुळे अशी व्यवस्था करता येत नसेल तर मतदान प्रतिनिधींची सदर मतदान अधिकाऱ्याच्या समोर बसण्याची व्यवस्था करा. त्यांची आसन व्यवस्था अशी असावी की त्यांना मतदाराचा चेहरा पहाता यावा आणि मतदाराच्या ओळखीबद्दल काही संशय असेल तर त्याबद्‌दल आव्हान त्यांना देता येईल. मतदान केंद्रात येथून तेथून फिरण्यास त्यांना परवानगी देऊ नका.

## ६. मतदान केंद्रात धुम्रपानास बंदी

मतदान केंद्रात धुम्रपान करण्यास तुम्ही बंदी घालावी. जर मतदान प्रतिनिधीला धुम्रपान करणे अत्यावश्यक असेल तर मतदान प्रक्रियेत अडथळा न आणता त्याने बाहेर जाऊन धुम्रपान करावे.

## ७. वृत्तपत्र प्रतिनिधी आणि छायाचित्रकारांना सुविधा

७.१ मतदान केंद्राबाहेर रांगेत उभ्या असलेल्या मतदारांची छायाचित्रे छायाचित्रकारांना घेता येतील. मात्र त्यांनी शांततापूर्ण व शिस्तबध्द मतदान व्यवस्थेत बाधा पोचवू नये.

७.२ मतदार नसलेल्या कुणाही व्यक्तीस मतदान केंद्रात प्रवेश देण्यास निवडणूक निर्णय अधिकारी परवानगी देऊ शकत नाही. आयोगाचे अधिकृत प्रवेशपत्र असल्याशिवाय कुणाही व्यक्तीला मतदान केंद्रात प्रवेश देऊ नका मग तो राज्य सरकारचा अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेचा प्रसिध्दी अधिकारी असला तरी. तसेच कोणत्याही परिस्थितीत मतदार प्रत्यक्ष मतदान करताना छायाचित्र काढू देऊ नका.

## ८. आयोगाने नियुक्त केलेल्या निवडणूक निरीक्षकांसाठी (समन्वयक) सुविधा

८.१ राज्य निवडणूक आयोग अलिकडे काही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी आपले निवडणूक निरीक्षक (समन्वयक) पाठवित आहे. त्यांची नियुक्ती ही वैध आहे.

८.२ मतदानाच्या दिवशी सदर निरीक्षक (समन्वयक) तुमच्या मतदान केंद्रास भेट देऊ शकतात. कदाचित तुमच्या मतदार संघातील दौरा ते तुमच्या मतदान केंद्राच्या भेटीनेच सुरु करतील. तुम्ही मतदान केंद्र स्थापन करतानाही ते उपस्थित असतील. तुमच्या मतदान केंद्रात ते आले तर त्यांचा योग्य आदर राखा आणि आयोगाला अहवाल पाठविण्यासाठी त्यांना आवश्यक असलेली माहिती तुम्ही त्यांना पुरवा. ते तुम्हाला कोणतीही सूचना वा मार्गदर्शन न करता तुमच्या मतदान केंद्रातील मतदान पाहतील. परंतु तुमच्या मतदान केंद्रातील मतदारांना सुविधा पुरविण्याच्या संदर्भात अथवा सुरळीत मतदानासंदर्भात जर त्यांनी काही सूचना केल्या तर त्याकडे योग्य लक्ष पुरवा. जर तुम्हाला मतदान केंद्रात काही विशिष्ट अडचण आली किंवा तुम्हाला तसे वाटू लागले तर तुम्ही ती या निवडणूक निरीक्षकांच्या / समन्वयकांच्या नजरेत आणा. कदाचित तुम्हाला ते त्या संदर्भात मदत करु शकतील किंवा त्या समस्या वा अडचणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याच्या वा संबंधित अधिकाऱ्याच्या नजरेत आणतील.

८.३ निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पुरविलेले बिल्ले या निवडणूक निरीक्षकांनी / समन्वयकांनी लावलेले असतील. तसेच त्यांना दिलेली अधिकारपत्रे वा नियुक्तीपत्रे त्यांच्याकडे असतील.

९. मतदान केंद्राच्या आत बिल्ले लावणे आदी

९.१ मतदान केंद्रात किंवा केंद्राच्या १०० मीटर अंतर्गत परिसरात कुणालाही उमेदवाराचे वा राजकीय पुढाऱ्याचे नाव, निशाणी असलेले बिल्ले वा छायाचित्र लावण्यास देऊ नका.

९.२ मतदान प्रतिनिधी ते ज्या उमेदवाराचे प्रतिनिधी आहेत त्याचे नांव असलेले बिल्ले लावू शकतात.

## प्रकरण - ७
## ईव्हीएम- मतदान यंत्र- प्राथमिक माहिती

१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचे बॅलेट युनिट आणि कंट्रोल युनिट असे दोन भाग असून त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

- **बॅलेट युनिट** Ballot Unit Front side




Fig.3 Ballot Unit

- बॅलेट युनिटचा आतील भाग




Fig.5 Inside View of Ballot Unit

BU Cable & Connector




Fig.4 9 Pin male connector of Interconnecting Cable

बॅलेट युनिटमध्ये एकूण १५ उमेदवारांची मतपत्रिका अंतर्भूत करण्याची सोय असून १६ वे बटण END असे आहे.

बॅलेट युनिटच्या वरच्या बाजूस हिरव्या रंगाचा Ready लॅम्प असून मतदानासाठी सज्ज असताना सदरचा Ready लॅम्प ON राहतो. तसेच मत नोंदविल्यानंतर तो OFF होतो. बॅलेट युनिटच्या वरच्या बाजूस उजवीकडे स्लाईड स्वीच असून १,२,३,४ अशा त-हेने सदरचा स्लाईड स्वीच वापरण्यात येणाऱ्या बॅलेट युनिटच्या संख्येनिहाय set करावा लागतो. उदा. १५ उमेदवार संख्येपर्यंत एकच बॅलेट युनिट वापरणे आवश्यक असल्याने अर्थातच सदरचा स्लाईड स्वीच '१' या स्थानावर ठेवणे आवश्यक ठरते. मात्र ज्यावेळी उमेदवारांची संख्या १५ पेक्षा जास्त मात्र ३० पर्यंत असल्यास पहिल्या बॅलेट युनिटला दुसरे बॅलेट युनिट जोडावे लागेल आणि अशावेळी पहिल्या बॅलेट युनिटचा स्लाईड स्वीच '१' वर तर दुसऱ्या बॅलेट युनिटचा स्लाईड स्वीच '२' या स्थानावर set करणे आवश्यक आहे.

बॅलेट युनिटच्या दर्शनी भागावर काचेची दर्शकपट्टी असून त्यास आतील बाजूने उघडून १५ संख्येपर्यंत निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची मतपत्रिका बसविण्याची सोय असून मतपत्रिकेवरील उमेदवारांच्या निवडणूक चिन्हासमोरच मतदानाचे बटण आहे. मतपत्रिकेवरील

उमेदवाराचे निवडणूक चिन्ह आणि त्याचे मतदानाचे बटण यामध्ये  अशा आकाराचा लाल रंगाचा ॲरोलॅम्प असून मत नोंदविताना उमेदवाराच्या समोरील मतदानाचे बटण दाबल्यानंतर सदरचा ॲरोलॅम्प ON होऊन मत नोंदविले जाताच OFF होतो.

उमेदवारांची नावे व चिन्हे असलेली मतपत्रिका काचेच्या दर्शनी भागावर बसविल्यानंतर सदरच्या भागास आतील बाजूने मोहोरबंद करण्याची सुविधा आहे. सदरचा कप्पा बंद केल्यानंतर यंत्राच्या वरील व खालील दोन्ही बाजूस बाहेरुन देखील मोहोरबंद करण्यासाठी क्लॅम्पची सोय केलेली आहे. तसेच सदरचे बॅलेट युनिट कंट्रोल युनिटला जोडण्यासाठी वरच्या बाजूस केबल असून 'Top' अक्षरे लिहिलेला B.U. कनेक्टर आहे. बॅलेट युनिटच्या मागील बाजूस एक स्वतंत्र सॉकेट ठेवलेले असून त्याचा वापर एका बॅलेट युनिटला दुसरे बॅलेट युनिट जोडण्यासाठी केला जातो.

राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २९/१२/२०२२ च्या सुधारीत आदेशानुसार (जोडपत्र-१९) शेवटच्या बॅलेट युनिटवरील शेवटचे लाल रंगाचे END बटण सुरु (unmasked) राहील. तर शेवटचे बॅलेट युनिट वगळता अगोदरच्या बॅलेट युनिटवरील हे लाल रंगाचे बटण आच्छादीत (masked) असणे जरूरीचे आहे.


Masked End Button



Unmasked End Button

## ➢ कंट्रोल युनिट

कंट्रोल युनिटचा दर्शनी भाग




Fig. 6 Front view of Control Unit

कंट्रोल युनिटचे महत्त्वाचे पाच भाग व त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

### १) डिस्प्ले सेक्शन :-

नवीन प्रकारच्या कंट्रोल युनिटवर डिस्प्ले सेक्शनची रचना काहीशी वेगळी असून यापूर्वी वापरात असलेल्या EVM कंट्रोल युनिटवरील डिस्प्ले सेक्शनवरील माहितीपेक्षा अधिक माहिती नवीन प्रकारच्या EVM कंट्रोल युनिटवरून आपल्याला प्राप्त होते. याची रचना खालीलप्रमाणे आहे :-




Fig.13 View of Display Section

कंट्रोल युनिटच्या डिस्प्ले सेक्शनच्या डाव्या बाजूस हिरव्या रंगाचा ON लॅम्प दिलेला असून संपूर्ण मतदान प्रक्रियेत तो ON राहतो. डिस्प्ले सेक्शनच्या उजव्या बाजूस लाल रंगाचा BUSY लॅम्प असून ज्या ज्या वेळी मतदानासाठी बॅलेट बटण दाबले जाईल त्या त्या वेळी सदरचा लॅम्प ON होतो. अर्थात त्याचवेळी बॅलेट युनिटवरचा Ready लॅम्प देखील ON होतो. मतदाराने मत नोंदविल्यानंतर आपोआप सदरचा लॅम्प बंद होतो.

वर नमूद केलेल्या ON आणि BUSY लॅम्पच्या मध्यभागी प्रत्येकी १२ डिजिटच्या एकाखाली एक अशा दोन ओळींमध्ये एकूण २४ डिजिटच्या दर्शकपट्टीवर वेळोवेळी विविध प्रकारची माहिती दिसत असून त्याबाबतचा सविस्तर तपशील या पुस्तिकेत पुढे दिला आहे.

**२) मेमरी चीप ( DMM ) व कॅन्डसेट सेक्शन ( Cand.Set ) :-**

डिस्प्ले सेक्शनच्या खाली एक स्वतंत्र कप्पा असून तो उघडला असता डाव्या बाजूस बॅटरी (Powarpack) बसविण्याची व्यवस्था आहे. तसेच बॅटरी बसविण्याच्या कप्प्याच्या उजव्या बाजूस स्वतंत्र असा छोटा कप्पा असून तो उघडला असता वरील बाजूस मेमरीचीप (DMM) बसविण्याचे सॉकेट दिले आहे व त्याच्याखाली काळ्या रंगाचे Cand.Set हे बटण दिले आहे. ज्याच्या सहाय्याने व बॅलेट युनिटवरील उमेदवारांच्या बटनांच्या सहाय्याने उमेदवारांच्या संख्येइतपत Cand.Set केले जाते. त्याबाबत सविस्तर तपशील Cand.Set करण्याच्या प्रक्रियेच्या टप्प्यात दिला आहे.



Fig. 8A Detachable Memory Module and its placement.



Fig. 8 View of Candidate Set Section

## ३) रिझल्ट सेक्शन :-

बॅटरी सेक्शनच्या खालील बाजूस रिझल्ट सेक्शन असून मुख्य कंपार्टमेन्ट उघडला असता काळा रंगाने 'Close' हे बटण दृष्टीस पडेल, या कंपार्टमेंटच्या झाकणावर close बटनांच्यावर कॅप बसविली आहे. मतदानासाठी यंत्र सज्ज करतांना याच बटनाचे भोवताली केंद्राध्यक्षास स्पेशल अड्रेस टॅग लावावा लागतो. याच कंपार्टमेन्टच्या उजव्या बाजूस स्वतंत्र छोटा कंपार्टमेंट असून तो उघडला असता मधल्या छोट्या भागात पिवळ्या रंगाची एका खाली एक अशी अनुक्रमे Result आणि Print अशी दोन बटने आहेत. तसेच अगदी उजवीकडच्या स्वतंत्र कप्प्यात पांढऱ्या रंगाचे Clear हे बटण आहे. केंद्राध्यक्षास मतदान यंत्र मतदानासाठी तयार करतांना कागदी मोहोरही या कप्प्यात असलेल्या Result आणि Print या बटनावर असलेल्या कप्प्यातील खिडक्यांमध्ये बसवावयाची असते.



Fig. 9 View of Result Section




Fig. 10 View of Inner Compartment of Result Section

## ४) बॅलेट सेक्शन :-

रिझल्ट सेक्शनच्या खालच्या बाजूस उजवीकडे मोठ्या आकाराचे Ballot हे बटण असून त्याच्या डावीकडे Total हे बटण आहे. तसेच या दोन बटनांमध्ये Beep ची व्यवस्था केल्याचे दिसून येईल. मतदानासाठी प्रत्येकवेळी Ballot हे बटण दाबणे आवश्यक असून Ballot हे बटण दाबताच कंट्रोल युनिटवरील लाल रंगाचा Busy लॅम्प ON होईल व त्याचवेळी बॅलेट युनिटवरील Ready लॅम्प ON होईल. मत नोंदविल्यानंतर Beep आवाजासह बॅलेट युनिटयरील लाल रंगाचा Arrow लॅम्प आणि हिरव्या रंगाचा Ready लॅम्प off होतील, मात्र कंट्रोल युनिटवरील लाल रंगाचा Busy lamp १० ते १२ सेकंदाच्या अवधीनंतर off होईल. ही क्रिया प्रत्येक मतदाराच्या मतदानाच्या वेळी करावी लागेल. संपूर्ण मतदानाच्या काळात ठराविक अंतराने झालेल्या एकुण मतांची नोंद Total बटण दाबून पाहता येईल. त्यासाठी Busy लॅम्प ON नसतांनाच Total हे बटण दाबून सदरची माहिती प्राप्त होऊ शकते.




Fig. 11 View of Ballot Section

३८

५) ON/OFF स्वीच सेक्शन :-

कंट्रोल युनिटच्या मागील, वरच्या बाजूस स्वतंत्र कप्पा असून सदरचा कप्पा उघडल्यावर डाव्या बाजूस बॅलेट युनिटची केवल कंट्रोल युनिटला जोडण्यासाठी बी.यु.कनेक्टर सॉकेट असून प्रस्तुत कप्प्याच्या मध्यभागी स्टीलचे ON/OFF स्वीच दिले आहे.



Fig.12 View of Rear Compartment

## प्रकरण - ८

## मतदान सुरु करण्यापूर्वी मतदान यंत्र सज्ज करणे

### १. मतदानापूर्वी प्रारंभिक तयारी

१.१ मतदान केंद्रात मतदान यंत्र कार्यरत करण्यापूर्वी निर्वाचन अधिकारी पातळीवर करण्यात आलेल्या तयारी व्यतिरिक्त आणखी काही तयारी मतदान केंद्रात करणे आवश्यक आहे. ही तयारी मतदान केंद्राध्यक्षांनी उमेदवार अथवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधींच्या समक्ष प्रत्यक्ष मतदान सुरु होण्यापूर्वी करायला हवी.

१.२ मतदान सुरु करण्याच्या निश्चित वेळेआधी एक तास ही प्रारंभिक तयारी तुम्ही सुरु करायला हवी. जर कुणी मतदान प्रतिनिधी यावेळेस उपस्थित नसेल तर तुम्ही तयारी थांबवू नये किंवा मतदान प्रतिनिधी उशीरा आला तर केलेली तयारी पुन्हा पासून करण्याची आवश्यकता नाही.

### २. मतदान विभागातील तयारी (बॅलेट युनिट)

२.१ मतदान यंत्राचा मतदान विभाग निर्वाचन अधिकारी पातळीवर सर्वदृष्ट्या सज्ज केलेला असतो. मतदान केंद्रात जर कोणती गोष्ट करावयाची असते ती म्हणजे या मतदान विभागाची केबल नियंत्रण विभागास जोडावी (कंट्रोल युनिट) .

२.२ मतदान यंत्राचा आणि मतदानाच्या इतर साहित्याचा ताबा घेताना तुम्ही तपासणी केली असणार. या तपासणीनुसार तुम्हाला पुरेसे मतदान विभाग (बॅलेट युनिट) देण्यात आले आहेत का, त्यावर मतपत्रिका योग्यप्रकारे चिकटविण्यात आल्या आहेत का, प्रत्येक युनिटचा स्लाईड स्वीच आवश्यक त्या ठिकाणी स्थिर करण्यात आला का, मतदान विभाग सील करण्यात आला आहे का, पत्त्याची खूण चिठ्ठी उजव्या बाजूला वर आणि उजव्या बाजूला खाली लावण्यात आली आहे का याची खात्री करा.

### ३. मतदान विभाग आणि नियंत्रण विभाग परस्परांना जोडणे

३.१ जेथे स्पर्धक उमेदवार १५ पेक्षा अधिक असतील तेथे 'मतदान विभाग' एकापेक्षा अधिक म्हणजे स्पर्धक उमेदवारांच्या संख्येनुसार अरातील. एकापेक्षा अधिक मतदान विभाग असतील तर ते एकमेकांना जोडले पाहिजेत आणि केवळ पहिला मतदान विभाग (बॅलेट युनिट) नियंत्रण विभागाशी जोडायला हवा.

एकापेक्षा अधिक असलेले मतदान विभाग परस्परांना असे जोडले पाहिजेत की, दुसरा मतदान विभाग पहिल्या क्रमांकाच्या मतदान विभागाशी जोडावा. जेथे तीन मतदान विभाग वापरण्यात येणार आहेत, तेथे तिसऱ्या क्रमांकाचा मतदान विभाग दुसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभाग जोडावा तर दुसरा मतदान विभाग पहिल्या क्रमांकाच्या मतदान विभागाला जोडावा. जेथे चार मतदान विभाग वापरण्यात येणार असतील तेथे चौथ्या क्रमांकाचा मतदान विभाग तिसऱ्या

-69

क्रमांकाच्या मतदान विभागाशी जोडण्यात यावा. तिसऱ्या क्रमांकाचा दुसऱ्या क्रमांकाशी आणि दुसऱ्या क्रमांकाचा पहिल्या क्रमांकाशी जोडण्यात यावा.

३.३ हे मतदान विभाग परस्परांना जोडण्यासाठी मतदान विभागाच्या अगदी खालच्या भागात असलेल्या कंपार्टमेंटमध्ये 'सॉकेट' आहेत. दुसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभागाचा परस्परांना जोडणाऱ्या केबलचा 'जोड' (कनेक्टर) पहिल्या मतदान विभागाच्या सॉकेटमध्ये बसवावा. त्याचप्रमाणे तिसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभागाचा 'जोड' (कनेक्टर) दोन क्रमांकाच्या मतदान विभागाच्या सॉकेटमध्ये लावावा. त्याचप्रमाणे चौथ्या क्रमांकाच्या मतदान विभागाचा 'जोड' (कनेक्टर) तिसऱ्या क्रमांकाच्या मतदान विभागाच्या सॉकेटमध्ये जोडावा.

३.४ वर म्हटल्याप्रमाणे केवळ पहिला मतदान विभागच नियंत्रण विभागाला जोडण्यात यावा. त्यासाठी नियंत्रण विभागाच्या मागील भागातील कप्प्यात सॉकेटची जागा आहे.

३.५ नियंत्रण विभागाच्या मागील भागातील कप्प्यात वीजेचा स्वीच आहे आणि जेव्हा हा स्वीच तुम्ही ऑन कराल त्यावेळी मतदान यंत्रातील बॅटरी काम करु लागेल. तसेच नियंत्रण विभाग आणि मतदान विभागास विद्युत पुरवठा सुरु होईल.

टीप:

१. जेव्हा एकापेक्षा अधिक मतदान विभाग वापरणार असाल तेव्हा वरील उतारा ३.२ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्यांचे क्रम लावा. चुकीचा क्रम लावल्यास मतदान यंत्र काम करणार नाही आणि नियंत्रण विभागाचे कोणतेही बटण दाबल्यास नियंत्रण विभागाच्या दर्शनी काचेवर एलई (चुकीची जोडणी) दर्शविणारी खूण दिसेल. मतदान विभाग योग्यप्रकारे सांधल्यानंतरच ही खूण अदृश्य होईल.

२. बॅलेट युनिटच्या केबलच्या दुसऱ्या टोकाच्या कनेक्टरमध्ये अनेक पिन असतात. हा कनेक्टर दुसऱ्या बॅलेट युनिटच्या अथवा कंट्रोल युनिटच्या सॉकेटमध्ये योग्यरितीने बसतो. हा कनेक्टर बसविताना योग्य पोझिशनमध्ये बसविणे आवश्यक आहे. ही पोझिशन ओळखणे फार सोपे असून, याकरिता कनेक्टरवर TOP अशी अक्षरे लिहिण्यात आली आहेत. ही अक्षरे कंट्रोल युनिट / बॅलट युनिटच्या बाजूला येतील अशाप्रकारे BU Connector अशी अक्षरे लिहिलेल्या सॉकेटमध्ये खोचून बसवावा. पिनची संख्या व कनेक्टरचा आकार पाहूनदेखील कनेक्टर कशाप्रकारे सॉकेटमध्ये बसविणे आवश्यक आहे हे समजू शकेल. या कनेक्टरच्या पिन अत्यंत नाजूक असून, या कनेक्टर सॉकेटमध्ये बसविताना जास्त ताकद वापरल्यास सदर पिनला इजा होऊ शकेल किंवा त्या वाकू शकतील. यास्तव कनेक्टर सॉकेटमध्ये बसविताना ते योग्य रितीने बसविणे आवश्यक आहे. त्याची खालची व वरची बाजू नीट पाहून जुळणारी योग्य बाजू सॉकेटमध्ये बसविली पाहिजे. कनेक्टर योग्य रितीने बसविल्यास मतदान यंत्र योग्यरितीने काम करील हे ध्यानात घ्यावे.

३. एका कंट्रोल युनिटशी अथवा बॅलेट युनिटशी जोडलेला कनेक्टर वेगळा करावयाचा असल्यास कनेक्टरच्या दोन्ही बाजूस असलेले लॅचेस दाबून त्यानंतर कनेक्टर बाहेर ओढावा.

४. मतदान विभाग आणि नियंत्रण विभाग जोडण्यासाठी चांगला सराव असायला हवा. नाहीतर मतदान यंत्राला नुकसान पोचू शकेल. ही बाब लक्षात ठेवून तुम्ही स्वत:च मतदान विभाग आणि नियंत्रण विभाग परस्परांना सांधावे.

## प्रकरण - ९

## नियंत्रण विभागाची तयारी

### १. नियंत्रण विभाग तपासणे

१.१ मतदान केंद्रात जाण्यापूर्वी मतदान यंत्राच्या नियंत्रण विभागाचा ताबा घेण्यापूर्वी नियंत्रण विभाग तपासा.

१.२ नियंत्रण विभागाचा 'कॅन्डसेट सेक्शन' योग्यप्रकारे सीलबंद केला आहे का आणि त्यावर पत्त्याची खूणचिठ्ठी लावली आहे का हे तुम्ही तपासले असेल. तसेच या विभागातील 'बॅटरी' पूर्णपणे चालू आहे का हेही तुम्ही पाहिले असेलच.

### २. नियंत्रण विभागाची (कंट्रोल युनिटची) तयारी

२.१ मतदान केंद्रात नियंत्रण विभागाचा वापर सुरु करण्यापूर्वी निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्यात बॅटरी बसविणे आणि स्पर्धक उमेदवारांची संख्या दर्शविण्याच्या तयारी बरोबरच मतदान केंद्रात पुढील काही तयारीही करणे आवश्यक आहे.

२.२ मतदान केंद्राध्यक्षानी नियंत्रण विभागासाठी करावयाची तयारी पुढीलप्रमाणे :-

१) नियंत्रण विभाग मतदान विभागाशी जोडणे जेथे एकापेक्षा अधिक मतदान विभाग वापरणार असतील तेथे पहिल्या मतदान विभागाशी दुसरा, दुसऱ्याशी तिसरा व तिसऱ्याशी चौथा मतदान विभाग स्लाईड स्वीचचा क्रम पाहून जोडणे.

२) वीजेचे बटण 'ऑन' (सुरु) करणे.

३) वरील १ व २ मधील कामे केल्यानंतर मागील कप्पा बंद करणे.

४) प्रकरण-१० मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे चाचणी मतदान (मॉक पोल) घेणे.

५) चाचणी मतदान घेतल्यानंतर मतदान यंत्रावरील चाचणी मतदानाचे आकडे पुसणे आणि ते 'शून्य' अवस्थेत आणणे. (प्रकरण - १० मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे)

६) 'निकाल विभाग' सुरक्षित करण्यासाठी त्यावर पेपरसील लावावा (प्रकरण-११ प्रमाणे) आणि

७) क्लोज बटनाभोवती तुम्हास पुरविण्यात आलेला स्पेशल ॲड्रेस टॅग मार्फत निकाल विभाग सीलबंद करा.

८) निकाल विभागाच्या बाहेरील कवच बंद करणे आणि त्यावर A,B,C,D सील लावणे (प्रकरण - १२ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे)

## ३. नियंत्रण विभाग आणि मतदान विभाग जोडणे

तुम्ही मतदान विभागाची परस्परांना जोडणारी केबल नियंत्रण विभागाच्या मागील भागात असलेल्या सॉकेटच्या कप्प्यात बसवावी. जेथे एकापेक्षा अधिक मतदान विभाग असतील तेथे पहिल्या मतदान विभागास जोडावी. नियंत्रण विभाग मतदान विभागास जोडताना काळजी घ्यावी.

## ४. वीजप्रवाह सुरु करणे

मतदान यंत्र वीजेवर चालते. त्यासाठी यंत्राच्या कॅन्डसेट सेक्शनमध्ये बॅटरी बसविलेली असते. ही बॅटरी निवडणूक निर्णय अधिकारी बसवितात. ही बॅटरी सुरु करण्यासाठी नियंत्रण विभागाच्या मागील भागात असलेल्या कप्प्यात स्वीच आहे. नियंत्रण विभाग आणि मतदान विभाग परस्परांना जोडल्यानंतर हा स्वीच 'ऑन' केल्यानंतर नियंत्रण विभागातून 'बीप' असा आवाज येईल. तसेच नियंत्रण विभागाच्या डिस्प्ले सेक्शनवरील दिवा हिरव्या रंगात पेटेल.

## ५. मागील कप्पा बंद करणे

नंतर तुम्ही मागील कप्पा बंद करा. हा मागील कप्पा सीलबंद करु नये. कारण मतदान पूर्ण झाल्यानंतर वीज प्रवाह बंद करण्यासाठी मतदान विभाग वेगळा करण्यासाठी तो तुम्हाला पुन्हा उघडावा लागेल.

## प्रकरण - १०
## मॉकपोल

### एकसदस्यीय प्रभाग पध्दतीचे मतदानासाठी चाचणी मतदान / अभिरूप मतदान (मॉकपोल) करावयाची कार्यपध्दती

१) एकसदस्यीय प्रभाग पध्दतीतील मतदानासाठी मतदानाच्या दिवशी प्रत्यक्ष मतदान सुरू होण्यापूर्वी एक तास अगोदर मतदान केंद्राध्यक्षाने मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या उमेदवारांच्या मतदान प्रतिनिधी समक्ष अभिरूप मतदान / चाचणी मतदान (मॉकपोल) करणे अनिवार्य आहे. मतदान प्रतिनिधी निर्धारित केलेल्या वेळेत मॉकपोलच्या वेळी उपस्थित नसतील तरी देखील मतदान केंद्राध्यक्षाने मतदान केंद्रावर नियुक्त अन्य मतदान अधिकाऱ्यांसह मॉकपोल करणे बंधनकारक आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) सर्वप्रथम बॅलेट युनिट बी यु कनेक्टरच्या सहाय्याने कनेक्टरची Top ही अक्षरे कंट्रोल युनिटच्या आतील बाजूस राहतील अशारितीने मागील बाजूने कंट्रोल युनिटला जोडा.




२) ON/OFF स्वीच On करा. तद्नंतर खालील सूचना क्रमाक्रमाने दर्शकपट्टीवर येतील (सुलभ आकलनासाठी या ठिकाणी आपण प्रभाग क्र. १०३ मतदान केंद्र क्र. ५ करिता एका जागेसाठी होणाऱ्या मतदानाच्या मॉकपोलचे उदाहरण घेत आहोत)

| | |
|---|---|
| WARD NO. - 103<br>BOOTH NO. - 5 | NUMBER OF<br>BALLOTS - 1 |
| BALLOT 1 | CANDS 6<br>SEATS 1 |

(३) निर्देशपट्टीवर येणारे वरीलप्रमाणे निर्देश येणे पूर्णतः बंद झाल्यावर कंट्रोल युनिटवरील Ballot हे बटण दाबा.

४) Ballot बटण दाबल्यानंतर कंट्रोल युनिटवरील लाल रंगाचा Busy लॅम्प On होईल व त्याचवेळी बॅलेट युनिटवरील हिरव्या रंगाचा Ready लॅम्प On होईल.

५) आता बॅलेट युनिटवरील पहिल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांपैकी पहिल्या उमेदवारासमोरील मतदानाचे बटण दाबा. त्यामुळे पहिल्या जागेसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक चिन्हाच्या उजव्या बाजूस असलेला लाल रंगाचा ॲरोलॅम्प ON होईल आणि त्याचवेळी 'Beep' आवाजासह केलेल्या मतदानाची नोंद कंट्रोल युनिटमध्ये त्याचवेळी होईल आणि बॅलेट युनिटवरील हिरव्या रंगाच्या Ready लॅम्प व लाल रंगाचा ॲरोलॅम्प Off होईल. मात्र मतनोंदणी झाल्यानंतर कंट्रोल युनिटवरील लाल रंगाचा Busy लॅम्प हा १० ते १२ सेकंदाच्या अवधीनंतर OFF होऊन तद्नंतर पुढील मतदानासाठी कंट्रोल युनिट सज्ज होईल.

६) महत्वाची बाब म्हणजे या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घेणे अत्यंत जरूरीचे आहे, ती म्हणजे एकसदस्यीय प्रभाग पध्दतीत बॅलेट युनिटवर बसविलेल्या मतपत्रिकेवरील किमान एका उमेदवारास मतदान करणे आवश्यक आहे. त्यामुळे जोपर्यंत प्रत्येक उमेदवारास किमान एक-एक मत नोंदवत नाही, तोपर्यंत त्या उमेदवारांच्या बटणांची तपासणी होणार नाही. प्रत्येक मतपत्रिकेवर जितकी मते द्यावयाची आहेत तितकी मते न दिल्यास त्या मतांची नोंद कंट्रोल युनिटमध्ये होऊ शकणार नाही. जर अशा अपूर्ण मतदानाची नोंद पूर्ण करावयाची असेल तर END बटणाचा वापर करावा लागेल.

त्यानुसार एखाद्यावेळी एखाद्या मतदारास मतदान कक्षात गेल्यानंतर नोटासह कोणत्याही उमेदवारास मतदान करावयाचे नसल्यास मतनोंदणी होण्यासाठी त्याला शेवटच्या Ballot Unit वरील END या बटणाचा वापर करावा लागेल, त्यासाठी अशावेळी END या बटणाच्या वरील काळी कॅप काढून END हे बटण दाबण्यास सांगावे. नंतर पुन्हा END बटणावरील काळी कॅप बसवून ठेवावी. ही बाब मॉकपोलच्या वेळी उपस्थित मतदान प्रतिनिधींना

निदर्शनास आणून द्यावी. यासंदर्भात जोडपत्रातील राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २९ डिसेंबर, २०२२ च्या आदेशाचे अवलोकन करावे. **(जोडपत्र-१९)**



१०) वर नमूद केल्यानुसार मॉकपोलसाठी मतदान नोंदवून झाल्यानंतर Result सेक्शन मधील Close हे बटण दाबावे. म्हणजे खालीलप्रमाणे सूचना निर्देशकपट्टीवर क्रमाक्रमाने दिसतील. (या उदाहरणात मॉकपोलच्यावेळी ९ मतदारांनी मतदान केल्याचे गृहित धरले आहे.)

| | |
|---|---|
| CLOSING | NUMBER OF BALLOTS - 1 |
| DTE 29-01-23<br>TIME 07-05-52 | TOTAL VOTERS<br>9 |
| SL NO – P14275<br>DMM – P14275 | POLL<br>CLOSED |

११) Closing बाबतचे सर्व निर्देश दर्शक पट्टीवर येण्याचे थांबल्यानंतर आता मॉकपोलमध्ये प्रत्येक उमेदवारास नोंदविलेल्या मतानुसार Result दर्शविणे आवश्यक असल्याने Result-I हे बटण दाबा. म्हणजे खालीलप्रमाणे निर्देश प्राप्त होऊन मॉकपोलमध्ये केलेल्या मतदानाचा Result दर्शकपट्टीवर क्रमाक्रमाने दिसून येईल.

| | |
|---|---|
| SL NO – P14275<br>DMM – P14275 | DTE 29-01-23<br>TIME 07-05-52 |
| POLL RESULT<br>PDT-29-01-23 | PST 07-01-21<br>PET 07-04-53 |

| | |
|---|---|
| NUMBER OF<br>BALLOTS 1 | TOTAL VOTERS<br>9 |
| BALLOT 1<br>VOTES 9 | CANDS 6<br>SEATS 1 |
| CANDIDATE – 01<br>VOTES - 2 | CANDIDATE – 02<br>VOTES - 1 |
| CANDIDATE – 03<br>VOTES - 1 | CANDIDATE – 04<br>VOTES - 1 |
| CANDIDATE – 05<br>VOTES - 1 | CANDIDATE – 06<br>VOTES - 1 |

( मॉकपोलच्यावेळी २ मते कमी दिली असून त्या ठिकाणी END बटण दाबून मतदान पूर्ण केले आहे. त्यामुळे मतांची बेरीज ९ ऐवजी ७ येत आहे. )

१२) Result दिसण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता आपल्याला प्रत्यक्ष मतदानासाठी मतदान यंत्र तयार करावयाचे असल्याने मॉकपोलमध्ये नोंदविलेली मते Clear करणे जरुरीचे असल्याने Result सेक्शनमधील पांढऱ्या रंगाचे Clear हे बटण दाबा. म्हणजेच एकाच वेळी Beep आवाजासह खालील सूचना दर्शकपट्टीवर येईल.

DELETING
POLLED VOTES

Beep आवाज थांबल्यावर प्रस्तुत सूचना निर्देशपट्टीवर दिसण्याचे बंद होईल आणि तद्नंतर पुढीलप्रमाणे सूचना क्रमाक्रमाने दर्शकपट्टीवर दिसू लागतील.

| | |
|---|---|
| NUMBER OF<br>BALLOTS 1 | TOTAL VOTERS<br>0 |
| BALLOT 1<br>VOTES 0 | CANDS 6<br>SEATS 1 |

| | |
|---|---|
| CANDIDATE – 01<br>VOTES - 0 | CANDIDATE – 02<br>VOTES - 0 |
| CANDIDATE – 03<br>VOTES - 0 | CANDIDATE – 04<br>VOTES - 0 |
| CANDIDATE – 05<br>VOTES - 0 | CANDIDATE – 06<br>VOTES - 0 |
| END | |

दर्शकपट्टीवर सर्व निर्देश येण्याचे बंद झाल्यानंतर आपले कंट्रोल युनिट मागील बाजूने स्वीच Off करा व नंतर प्रत्यक्ष मतदानासाठी कंट्रोल युनिट सीलबंद करा.

Control Unit सीलबंद करण्याची प्रक्रिया या पुस्तिकेत प्रकरण क्र.११ मध्ये दिली आहे..

प्रकरण - ११

## नियंत्रण विभाग पेपरसील व स्पेशल टॅग वापरून बंद करणे

### १. कंट्रोल युनिट पेपरसीलने सीलबंद करणे

(१) मतदान यंत्र सील करण्याकरीता सुरुवात करण्यापूर्वी ते मागून बंद (Off) करणे अत्यावश्यक आहे. मतदान यंत्र मागून बंद केल्यानंतर सीलींग करण्यास सुरुवात करावी व सील पूर्ण झाल्याशिवाय यंत्र सुरु (On) करु नये. पारंपारिक मतदान पध्दतीमध्ये जेथे मतपत्रिका व मतपेटया वापरल्या जात होत्या तेव्हा मतपेटया आयोगाने विहित केलेल्या पेपरसीलद्वारे सीलबंद करण्यात येत असत. अशाच प्रकारची कार्यपध्दती मतदान यंत्राबाबत देखील विहित केली आहे. त्यासाठी कंट्रोल युनिटमध्ये खाली नमूद केल्यानुसार आयोगाने विहित केलेले पेपर सील वापरुन ते सीलबंद करावयाचे आहे.

(२) कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या आतल्या कप्प्याच्या झाकणाच्या आतल्या बाजूस पेपरसील घालण्यासाठी एक चौकट ठेवलेली आहे. इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि. या कंपनीने तयार केलेल्या मतदान यंत्राच्या बाबतीत एक पेपर सील वापरण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर सील अशा प्रकारे घट्ट बसवावयाचे आहे, जेणेकरुन त्याचा वरील भाग दिसू शकेल. पेपरसीलचा वरचा भाग दुमडल्यानंतर त्यावरील अनुक्रमांक वरील बाजूस येईल.




(रिझल्ट सेक्शनच्या आतील कप्प्यास असलेल्या खाचेमध्ये पेपरसील व आधारासाठी पुठठा दिलेला असल्यास तो वर दर्शविल्याप्रमाणे घालावा जेणेकरुन रिझल्ट सेक्शनचे दोन्ही कप्पे बंद केल्यावर त्यामधून वरील बाजूने बाहेर येणारा पेपरसीलचा भाग पट्टीसीलच्या दिशेने दुमडल्यावर अनुक्रमांक वरच्या बाजूला दिसेल.)

(३) वर नमूद केल्याप्रमाणे पेपर सील आपल्या जागी घट्ट बसून राहावे व ते विहित जागेवरुन हलू नये यासाठी एका पातळ पुठ्ठ्याचा आधार पेपर सीलला द्यावा. जेणेकरून पेपर सील आपल्या जागेवरुन हलणार नाही, याची खात्री करण्यासाठी ते एका बाजूने हळूच ओढून ते घट्ट बसल्याची खात्री करताना ते सील खराब होणार नाही, याची दक्षता घ्यावी व पेपर सील खराब झाल्यास त्वरित दुसरे पेपरसील वापरण्यात यावे.

(४) पेपरसील घट्ट बसविल्यानंतर कंट्रोल युनिटच्या आतल्या कप्प्याचे झाकण घट्ट दाबून बंद करावे. सदर झाकण अशा रीतीने बंद करावे की पेपर सीलच्या दोन्ही बाजूची टोके आतल्या कप्प्याच्या बाहेर राहतील. त्यानंतर पेपर सीलच्या पांढऱ्या बाजूवर मतदान केंद्राध्यक्षांनी पेपरसीलच्या अनुक्रमांकाखाली आपली पूर्ण स्वाक्षरी करावी. मतदान केंद्रात उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी जर पेपरसीलवर स्वाक्षरी करु इच्छित असतील तर त्यांनाही तशी अनुमती द्यावी. मतदान केंद्राध्यक्षांनी मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या त्यांच्या नेमणूक पत्रावरील स्वाक्षऱ्यांशी जुळतात किंवा कसे, याची खात्री करावी.

**२. पेपर सीलचा हिशेब ठेवणे:-** मतदान केंद्रावर मतदान केंद्राध्यक्षास पुरविण्यात आलेल्या पेपरसीलचा हिशेब त्याने ठेवणे आवश्यक आहे. सदर हिशेब नमुना व्हीएम-३ मध्ये ठेवणे आवश्यक आहे. मतदान केंद्राध्यक्ष, उमेदवार अथवा त्यांचे मतदान प्रतिनिधी यांना पेपरसीलवरील अनुक्रमांक लिहून घेण्याची अनुमती देईल.

### ३. कंट्रोल युनिट स्पेशल टॅगने सीलबंद करणे

(१) पेपरसील घट्ट बसविल्यानंतर व आतल्या कप्प्याचे झाकण घट्ट दाबून बंद केल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांनी आतल्या झाकणाच्या डाव्या बाजूस ठेवलेल्या दोन छिद्रांमधून एक दोरा ओवून तो स्पेशल सील वापरून सीलबंद करावा. स्पेशल टॅग लावताना त्याचा धक्का “Close” बटणाला लागणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. (जर हा स्पेशल टॅग लावताना “Close” बटण दाबलेले राहीले तर मतदान सुरू करताना "Ballot" बटण दाबल्यावर "no" असा मेसेज येईल.) स्पेशल टॅग हा विशिष्ट आकाराचा असून त्याच्या खाचेमध्ये "Close" बटण येईल याची खात्री करून तो लावावा जेणेकरून सायंकाळी ५.३० वाजता मतदान संपल्यावर “Close”

बटणावरील कॅप काढून ते दाबणे सहज शक्य होईल. याकरीता स्पेशल टॅग एका विशिष्ट आकाराचा बनविण्यात आला आहे. याला असलेल्या खाचेमुळे मतदान संपल्यावर रिझल्ट सेक्शन बंद असतानादेखील Close बटण दाबणे शक्य होते. या टॅगवर मतदान केंद्राध्यक्ष, इच्छुक मतदान प्रतिनिधी यांनी स्वाक्षऱ्या कराव्यात व विभेदक चिन्ह मारावे.



४. कंट्रोल युनिटचे रिझल्ट सेक्शन बंद करून सीलबंद करणे

(१) कंट्रोल युनिटच्या रिझल्ट सेक्शनच्या आतला कप्पा बंद करून तो सीलबंद केल्यानंतर रिझल्ट सेक्शनच्यावरील झाकण बंद करावे. स्पेशल टॅग बंद केल्यानंतर रिझल्ट सेक्शनच्या वरील झाकण बंद करावे. असे करताना आतील पेपरसील व्यवस्थितपणे (न फाटता) दोन्ही बाजूने झाकणाच्या वर राहतील याची काळजी घ्यावी.

(२) वरील झाकण बंद केल्यानंतर रिझल्ट सेक्शन पुढीलप्रमाणे सीलबंद करावे.

(अ) वरील झाकणाच्या डाव्या बाजूस पुरविण्यात आलेल्या दोन छिद्रांमधून दोरा ओवावा.

(ब) दोऱ्याची गाठ मारून त्यास मतदान केंद्राध्यक्षाचे सील लावावे. आणि, पत्त्याची खूणचिठ्ठी दोऱ्याच्या टोकास बांधावी. ज्याप्रमाणे कॅन्ड सेट सेक्शनमध्ये निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या स्तरावर पत्त्याची खूणचिठ्ठीवर बांधलेली असेल त्याच धर्तीवर ही खूणचिठ्ठी असेल. या पत्त्याच्या खुणीचिठ्ठीवर उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास त्यांना स्वाक्षरी करण्याची अनुमती द्यावी.

## प्रकरण - १२

## नियंत्रण विभाग A, B, C, D पट्टीसील वापरुन बंद करणे

**१) ABCD पट्टीसील वापरुन मतदान यंत्र सीलबंद करणे:** रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो, त्याला ABCD अक्षरे असलेली पट्टीसील वापरुन कंट्रोल युनिट सील करावे, पट्टीसील हे क्लोज बटनाच्या खालून येईल याची काळजी घेऊन ते डावीकडून नियंत्रण युनिटच्याभोवती गुंडाळून सील करावयाचे आहे.

**टप्पा क्र.१:-** रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो, तो खालीलप्रमाणे दुमडावा.




**टप्पा क्र. २ :-** त्यानंतर ABCD अक्षरे असलेली पट्टीसील वापरून कंट्रोल युनिट सील करावे. असे करताना 'A' भाग रिझल्ट सेक्शनच्या कप्प्याच्या खालील बाजूने पेपरसीलचा जो भाग बाहेर येतो. तेथे खालीलप्रमाणे ठेवावा.




(निकाल विभागाच्या बाह्य दरवाजाच्या आतील बाजूने बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेच्या आतील पट्टीच्या तळाजवळ पूर्वीच डिंक लावलेला “A” भाग येईल. अशाप्रकारे पट्टी मोहोर (सील) ठेवा. “A” वरील मेन कागदावर काढा.)

टप्पा क्र. ३ :- त्यावर पेपरसीलचा खालील भाग खालील दर्शविल्याप्रमाणे दुमडून चिकटवावा.




(या डिंक लावलेल्या भागावर गुलाबी कागदी मोहोरेची आतील घडी दाबा आणि चिटकवा)

टप्पा क्र. ४ :- त्यानंतर “B” भाग उलट दुमडून पेपरसीलवर चिटकवावा.




(पूर्वीच डिंक लावलेल्या “B” भागावरील मेणाचा कागद काढा आणि हा डिंक लावलेला भाग गुलाबी कागदी मोहोरेच्या बाहेरील घडीवर दाबा)

टप्पा क्र. ५ :- त्यानंतर “C” भागावर पेपरसीलची वरील पट्टी चिटकवावी.






(गुलाबी कागदी मोहोरेवर “B” भाग चिटकवल्यावर “C”  हा भाग सर्वात वर येईल. “C” भागावरील मेणकागद काढा. बाह्य दरवाजाच्या सर्वात वरच्या भागापासून बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेला दाबा. जेणेकरुन गुलाबी कागदी मोहोर “C” भागावर घट्टपणे चिटकवली जाईल.)

टप्पा क्र. ६ :- त्यानंतर पट्टीसील मतदान यंत्राभोवती गोल फिरवून “D” भाग जेथे “A” “B” “C” चिटकविलेले आहेत, त्या ठिकाणी आणून चिटकवावा.









(पट्टी मोहोर (सील) क्लोज (बंद) बटनाच्या खालून येईल याची काळजी घेऊन पट्टीसीलचा उर्वरित भाग डावीकडून नियंत्रण युनिटच्या भोवताली गुंडाळा. पट्टीसीलचे दुसरे टोक, कंट्रोल युनिटच्या उजव्या बाजूस बाह्य दरवाजाच्या सर्वात वरच्या भागात जेथे पूर्वीच डिंक लावलेले "A" "B" "C" भाग चिटकवलेले आहेत, तेथे आणा, पूर्वीच डिंक लावलेल्या "D" भागावरील आवरण असलेला मेणकागद काढा आणि दरवाजाच्या सर्वात वरच्या भागातून बाहेर आलेल्या गुलाबी कागदी मोहोरेवर तो भाग घट्टपणे दाबा. पूर्वीच डिंक लावलेला "D" भाग क्लोज बंद बटनाच्या खाली पट्टीसीलवर चिकटतो. हा चिकटणारा "D" चा भाग पट्टीसीलवर घट्टपणे दाबा.)

## प्रकरण - १३

## मतदानास सुरुवात

१. मतदानास निश्चित केलेल्या वेळीच मतदानास सुरुवात करा. त्यापूर्वी तुमची प्रारंभिक तयारी पूर्ण झाली पाहिजे. जर दुर्दैवाने प्रारंभिक तयारी पूर्ण झाली नाही तर मतदान सुरु करण्याच्या निश्चितवेळी तीन-चार मतदारांना मतदान केंद्रात घ्या आणि मतदान अधिकाऱ्याला त्यांची ओळख आदी माहिती गोळा करु द्या आणि या काळात तुमची प्रारंभिक तयारी पूर्ण करा. मात्र शक्य तो असे प्रसंग टाळा. समजा काही अपरिहार्य कारणास्तव तुम्हाला मतदानाच्या निश्चित वेळेस मतदान सुरु करता आले नाही तर मतदान बंद करण्याची वेळ वाढवू नका. प्रकरण - २४ मध्ये स्पष्ट केलेल्या बाबतीतच अपवाद केला जाईल.

२. ज्या मतदान अधिकाऱ्यावर मतदारांच्या बोटांना शाई लावण्याची जबाबदारी असेल त्याला पक्क्या शाईचे मार्कर पेन पुरविण्यात येईल. त्याच्या सहाय्याने मतदाराच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर पक्क्या शाईची खूण करण्यास सांगावी.

### मतदार यादीची चिन्हांकित प्रत

३. मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान प्रतिनिधी आणि तेथे उपस्थित सर्वांची खात्री पटवा की मतदार यादीची जी प्रत चिन्हांकित मतदार यादी म्हणून वापरण्यात येणार आहे त्यावर कुठल्याही प्रकारची खूण वा नोंदी नाहीत. असल्या तर त्या केवळ 'इडीसी' (म्हणजे निवडणूक कामावर असल्याचे प्रमाणपत्र) आणि 'पीबी' (म्हणजे टपालाद्वारे मतदानपत्रिका दिल्याची खूण) या दोनच खुणा असतील. राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५ दि. २६ जून,२०२५ **(जोडपत्र-१७)** अन्वये ( मुद्दा क्र.५ (vi) ) जर अपंग मतदारांचे नाव वरच्या मजल्यावरील मतदान केंद्राच्या मतदार यादीत असेल तर तेथून कमी करून तळमजल्यावरील मतदान केंद्राशी जोडून संबंधित मतदार यादीमध्ये पुरवणी म्हणून जोडण्यात यावे.

### नमुना व्हीएम-१ मधील मतदार नोंदवही

४. मतदान प्रतिनिधी आणि मतदान केंद्रात उपस्थित इतरांना हेही दाखवा आणि त्यांची खात्री पटवा की, मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मतदाराच्या नावापुढे कोणत्याही प्रकारची खूण अथवा नोंद केलेली नाही. याच मतदार नोंदवहीत प्रत्येक मतदाराला मतदान करण्यास परवानगी देण्यापूर्वी आपली सही अथवा अंगठ्याचा ठसा उमटवायचा असतो.

मतदान केंद्रात मतदारांच्या प्रवेशावर नियंत्रण

५. महिला आणि पुरुष मतदारांसाठी वेगवेगळी रांग करा. रांगेवर नियंत्रण ठेवणाऱ्या व्यक्तीने तुमच्या निर्देशानुसार एकावेळी केवळ तीन ते चार मतदारच मतदान केंद्रात सोडावे. इतरांना रांगेत राहण्याची सूचना करावी. अशक्त किंवा लेकुरवाळया (हातात मूल असलेल्या) महिलांना रांगेतून पुढे येऊ द्यावे. रांग सोडताना एकदा महिला आणि एकदा पुरुषांना आत सोडावे. महिला किंवा पुरुषांसाठी एकापेक्षा अधिक रांगा करु देऊ नका.

६. राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२५/ प्र.क्र.३/का-५ दि. २६ जून,२०२५ अन्वये शक्य असेल तेथे स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा ठेवाव्यात. जेथे शक्य नसेल तेथे रांगेतील एका पुरुषामागे दोन स्त्रिया याप्रमाणे मतदान करु द्यावे. आवश्यकतेनुसार स्वतंत्र रांगांकरीता कमी खर्चाचे पार्टीशन तयार करुन घ्यावे. मतदान केंद्रावर मतदारांना माहिती देणारे फलक योग्य ठिकाणी लावावेत. उदा. मतदान केंद्राचा मार्ग दर्शविणारा दिशादर्शक नकाशा, मतदान केंद्रावरील सोयींबद्दलची (मतदार सहाय्य केंद्र, शौचालय व पाणी व्यवस्था इ.) माहिती दर्शविणारे फलक.

## प्रकरण - १४

## मुक्त आणि नि:पक्षपाती निवडणुकीची खबरदारी

### प्रतिज्ञापत्राचे वाचन

मतदान यंत्र, मतदार यादीची चिन्हांकित प्रत, या संदर्भात मागील प्रकरणात दिलेल्या सूचनांचे तुम्ही काटेकोरपणे पालन केलेले असावे. मुक्त आणि नि:पक्षपातीपणे निवडणूक घेण्यासाठी या सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे. त्या संदर्भात मतदानास प्रारंभ करण्यापूर्वी **जोडपत्र-६** मध्ये दिलेल्या प्रतिज्ञापत्राचे तुम्ही वाचन करुन दाखवावे. प्रतिज्ञापत्राचे मोठया आवाजात वाचन करावे आणि त्यावर आपली सही करावी. तसेच तेथे उपस्थित असलेले आणि सही व आपला शिक्का उमटविण्यास राजी असलेल्या मतदान प्रतिनिधीची त्यावर सही घ्यावी. प्रतिज्ञापत्रावर आपली सही करण्यास नकार देणाऱ्या मतदान प्रतिनिधीची नांवे तुम्ही नोंद करुन ठेवावी.

### मतदान यंत्र नादुरुस्त झाल्यावर नव्या मतदान यंत्राच्या वापरावेळी करावयाचे सोपस्कार वा कार्यपध्दती

मतदान चालू असताना जर अशी परिस्थिती आली की तुम्हाला नवे मतदान यंत्र वापरात घेणे आवश्यक आहे तर तुम्हाला **जोडपत्र -६अ** मधील प्रतिज्ञापत्राचे पुन्हा वाचन करावे लागेल. (मतदान संपल्यानंतर तुम्हाला पुन्हा **जोडपत्र - ७** च्या प्रतिज्ञापत्राची नोंद करावी लागेल) हे प्रतिज्ञापत्र वेगळ्या लिफाफ्यात घालून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे झालेले मतदान आणि नमुना व्हीएम-३ मध्ये कागदी मोहरांचा हिशोब आदी आवश्यक कागदपत्रांसह सुपूर्द करावे.

# प्रकरण - १५

## मतदान केंद्राभोवती निवडणूक कायद्यांचा अंमल लागू करणे

### १. नि:पक्षपातीपणा आवश्यक

मतदान काळात शांततेचा भंग होऊ नये म्हणून तुमचे कौशल्य, शिस्तबध्दपणा आणि सर्वात महत्वाचे म्हणजे नि:पक्षपातीपणा अत्यंत महत्त्वाचा आहे. सर्व पक्ष आणि उमेदवारांना सारखाच न्याय द्या. कोणाताही वादाचा मुद्दा सोडविताना न्यायोचित व नि:पक्षपातीपणे निर्णय घ्या. तुम्ही किंवा तुमच्या मतदान केंद्रातील कुणाही मतदान अधिकाऱ्याने अशी कृती करु नये की इतरांना असे वाटेल की तुम्ही एका विशिष्ट उमेदवाराकडेच झुकते माप देत आहात.

### २. प्रचारावर बंदी

मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसरात मतदानाच्या दिवशी प्रचार करणे हा गुन्हा आहे. जी व्यक्ती असा प्रचार करील तिला पोलीस वॉरंटशिवाय अटक करु शकतील.

### ३. उमेदवारांचा निवडणूक मंडप (बूथ)

मुक्त, नि:पक्षपाती आणि सुरळीत निवडणूक घेण्यासाठी उमेदवाराच्या निवडणूक बूथचा अनेक प्रकारे अडथळा निर्माण होत असल्याने निवडणूक आयोगाने उमेदवारांचे निवडणूक बूथ उभारण्यास परवानगी देऊ नये अशी सूचना दिली आहे. असे बूथ उभारल्याने पक्षा-पक्षात आणि त्याच्या कार्यकर्त्यांत वादावादी होते आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. तथापि, उमेदवार आपल्या प्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांसाठी एक टेबल आणि दोन खुर्च्या घालून देऊ शकतो. मतदारांना अनधिकृत ओळखपत्र देण्यासाठी या व्यवस्थेचा उपयोग होतो. परंतु असे टेबल मतदान केंद्रापासून १०० मीटर अंतरावर असावे. प्रतिनिधी वा कार्यकर्त्यांचे ऊन आणि पावसापासून रक्षण करण्यासाठी या टेबलावर छत्री अथवा ताडपत्री घालता येईल. या टेबलाभोवती गर्दी होऊ देऊ नये. जर या सूचनांचे उल्लंघन झाल्याचे तुम्हाला दिसले तर त्याची माहिती तुम्ही विभाग न्यायदंडाधिकाऱ्यास अथवा मतदान केंद्राभोवती कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी असलेल्या इतर अधिकाऱ्यांना द्या म्हणजे तुमच्या मतदान केंद्राभोवती कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ते आवश्यक उपाय योजतील.

### ४. मतदान केंद्रात वा जवळ बेबंद वर्तणूक

जर कुणी व्यक्ती बेबंद वृत्तीने वागत असल्यास त्या व्यक्तिला पोलिसांकरवी अटक करु शकता व त्याच्यावर आयपीसीमधील संबंधित कलमाखाली खटला भरु शकता. पोलिसांना त्या व्यक्तिला अटक करण्याची व त्याची बेबंद वर्तणूक थांबविण्यास पुरेसा बळाचा वापर करण्याचा अधिकार आहे. परंतु त्यापूर्वी त्या व्यक्तिला पोलिसांनी ताकीद द्यावी व समजावण्याचा प्रयत्न करावा. जर मेगाफोन अथवा लाऊडस्पिकरचा मतदान प्रक्रियेत अडथळा येत असेल तर तुम्ही त्याचा वापर थांबविण्याचा आदेश द्या. त्यासाठी १०० मीटर अंतराची मर्यादा लागू नाही. तुमच्या

मतदान कामात अडथळा निर्माण होत असल्याचे तुम्हाला जाणवले तर कितीही अंतरावरील हा अडथळा तुम्ही दूर करुन घेऊ शकता.

५. **बेशिस्त व्यक्तीला मतदान केंद्रातून बाहेर काढणे**

मतदान काळात जर कुणी व्यक्ती तुमचा कायदेशीर आदेश मानत नाही किंवा गैरवर्तणूक करीत असेल तर पोलिस अधिकाऱ्याच्या वा तुम्ही अधिकार दिलेल्या कुणाही व्यक्तीमार्फत त्या व्यक्तीला मतदान केंद्राबाहेर काढू शकता.

६. **मतदारांना आणण्यासाठी बेकायदेशीर वाहनांचा वापर**

६.१ मतदाराच्या बेकायदेशीर वाहतुकीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. जर तुमच्याकडे यासंदर्भात कुणी तक्रार केली तर तुम्ही त्याला दोषीविरुध्द खटला भरण्याचा सल्ला द्या किंवा योग्य त्या न्यायालयात दोषीविरुध्द निवडणूक याचिका दाखल करण्यास सांगा. तुमच्याकडे दाखल केलेली कोणतीही तक्रार अशा तक्रारींची दखल घेण्याचे कार्यक्षेत्र असलेल्या विभागीय न्यायदंडाधिकारी अथवा इतर अधिकाऱ्याकडे पाठवा. त्या तक्रारीवर तुमचे मत व तुम्हाला त्यासंदर्भात असलेल्या माहितीचा शेरा द्या.

६.२ मतदानाच्या दिवशी गाड्यांच्या वाहतुकीसंदर्भात निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचना व मार्गदर्शनांचे पालन करा.

७. **मतदान केंद्रातून मतदान यंत्र हलविणे हा गुन्हा आहे**

कोणत्याही निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीने गैरमार्गाने अथवा अनधिकृतपणे मतदान केंद्रातून मतदान यंत्र हलविणे अथवा हलविण्याचा प्रयत्न करणे हा गुन्हा असून संबंधित व्यक्तीवर आयपीसी अंतर्गत कारवाई होऊ शकते.

८. **निवडणूक अधिकाऱ्यांनी कर्तव्यभंग केल्यास**

जर मतदान केंद्राध्यक्षाने अथवा मतदान अधिकाऱ्याने पुरेशा कारणाविना कर्तव्यभंग केल्यास तो निवडणूक कायद्याचा भंग ठरेल व कर्तव्यात कसूर करणे या गुन्ह्यासाठी त्याच्यावर कारवाई होऊ शकते.

९. **मतदान केंद्राकडे अथवा परिसरात हत्यारे घेऊन जाणे**

अनधिकृत व्यक्तींनी मतदानाच्या दिवशी शस्त्र कायदा १९५९ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सशस्त्र होऊन मतदान केंद्राच्या परिसरात फिरणे हा गुन्हा असून जी व्यक्ती या तरतुदींचा भंग करील ती दोन वर्षेपर्यंत कारावास किंवा दंड किंवा कारावासासह दंडास पात्र ठरेल. हा गुन्हा दखलपात्र असेल.

# प्रकरण - १६

## मतदाराची ओळख पटविणे आणि ओळखीस आव्हान दिल्यास अवलंबिण्याची कार्यपध्दत

### १. मतदाराच्या ओळखीची शहानिशा

१.१ प्रकरण - ५ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे मतदार मतदान केंद्रात शिरल्यानंतर थेट पहिल्या मतदान अधिकाऱ्यांकडे जाईल. हा अधिकारी चिन्हांकित मतदार यादी हाताळील आणि मतदाराची ओळख पटविण्याची त्याच्यावर जबाबदारी असेल. मतदान अधिकारी मतदाराची मतदार यादीनुसार ओळख पटविल.

१.२ सर्वसाधारणपणे प्रत्येक मतदार उमेदवार अथवा त्याच्या प्रतिनिधीने दिलेले अनधिकृत ओळखचिट्ठी घेऊन येतो. ही ओळखचिट्ठी पांढऱ्या कागदावर असते आणि त्यावर मतदाराचे नाव, त्याचा मतदार यादीतील अनुक्रमांक, मतदार यादीचा भाग क्रमांक आणि मतदान केंद्राचे नाव व क्रमांक असतो. या ओळखचिट्ठीवर उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव किंवा त्यांना देण्यात आलेले निवडणूक चिन्ह असू नये. एखाद्या उमेदवाराने वा त्याच्या पक्षाने असे ओळखपत्र जारी केले तर ही बाब उमेदवाराच्या मतदान केंद्रातील मतदान प्रतिनिधींच्या लक्षात आणावी आणि असे प्रकार ताबडतोब थांबविण्यास सांगावे.

१.३ राज्य निवडणूक आयोगाने मतदाराची ओळख पटविण्यासंदर्भात कोणकोणत्या कागदपत्रांचा उपयोग पुरावा म्हणून होऊ शकेल याविषयी क्रमांक-रानिआ/मनपा-२००९/प्र.क्र.१६/ का-५, दिनांक- १४/०७/२०२५ अन्वये आदेश दिले आहेत. **(जोडपत्र-१२)** त्यापैकी कोणताही एक पुरावा ओळख पटविण्यासाठी मतदाराने सोबत आणणे अनिवार्य आहे.

१.४ पहिल्या मतदान अधिकाऱ्याने केवळ ओळखचिट्ठी पत्रावरील मतदार यादीचा अनुक्रमांक मोठ्याने वाचावा. नंतर संबंधित मतदारास आपले नाव मोठ्याने सांगण्यास सांगावे. आवश्यकता भासल्यास ओळखचिट्ठी पत्रावरील इतर माहितीही त्याला सांगण्यास सांगावी. म्हणजे ओळखचिट्ठी घेऊन आलेली व्यक्ती ही तीच आहे का याची पक्की खात्री पटेल. जर मतदार आपली ओळख पूर्णपणे पटवू शकला नाही तर त्याला मतदान केंद्राध्यक्षाकडे जाण्यास सांगावे. मतदान केंद्राध्यक्ष आपल्या परीने त्या मतदाराच्या ओळखीबद्दल समाधान करुन घेईल. जर मतदार भोंदू आढळल्यास त्याला पोलिसांच्या स्वाधीन करण्यास मतदान केंद्राध्यक्षाने मागे-पुढे पाहू नये.

१.५ जर तुमच्या मतदान केंद्रात मतदान करण्यासाठी मोठ्या प्रमाणात 'बुरखाधारी ' महिला येणार असतील तर त्यांची ओळख पटविण्यासाठी प्रकरण - ४ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे वेगळा कक्ष आणि महिला मतदान अधिकाऱ्यांची नेमणूक करावी.

१.६ सर्वसाधारणपणे मतदान केंद्रात मतदान करण्यास येणारा मतदार हा खरा मतदार असतो असे गृहित धरले जाते. परंतु गृहित धरण्याच्या विश्वासाला तडा जाऊ शकतो. मतदाराचे मतदान यादीतील वय आणि प्रत्यक्ष दिसणाऱ्या मतदाराचे वय यात फरक आढळला किंवा इतर कोणत्याही सभोवतालच्या परिस्थितीवरुन संशय आला तर मतदान अधिकाऱ्याने आपले पूर्ण समाधान करुन घ्यावे आणि मतदाराची खरी ओळख पटवावी. केवळ अनधिकृत ओळखपत्र खरे मानून मतदाराची ओळख पटवू नये. जर संशय आल्यास मतदान केंद्राध्यक्षाच्या नजरेस ही बाब आणावी.

## २. मतदाराच्या ओळखीस आव्हान देणे

ज्या व्यक्तीचे नाव मतदार यादीत आहे, त्याला मतदान करण्याचा अधिकार आहे. मात्र उमेदवार अथवा त्याच्या प्रतिनिधीने मतदाराच्या ओळखीस आव्हान दिले नाही आणि तुम्हाला तो मतदार बनावट असल्याची खात्री पटली नाही, तर तो ओळखचिठ्ठी घेऊन आलेला मतदार हा खरा मतदार आहे असे गृहीत धरावे. परंतु एखाद्या मतदाराच्या ओळखीबद्दल आव्हान देण्यात आले आहे आणि तुम्हाला बाह्य परिस्थितीवरुन ती व्यक्ती बनावट मतदार दिसली तर तुम्ही संक्षिप्त चौकशी करुन निर्णय घ्यावा.

## ३. आव्हानित मते

(१) एखाद्या मतदान प्रतिनिधीने मतदाराच्या ओळखीस आव्हान दिल्यास संबंधित प्रतिनिधी कडून महानगरपालिकेच्या बाबतीत रोख रु.२०/-(रुपये वीस) इतकी अनामत रक्कम ठेवून घ्यावी. (यासंदर्भातील पावतीचा **नमुना जोडपत्र-१४**) मतदाराची चौकशी केल्यानंतर सदर मतदार खरा असल्याचे निष्पन्न झाल्यास सदर मतदारास मतदान करु द्यावे. तथापि, मतदार खरा नसल्याचे निष्पन्न झाल्यास व तो बोगस असल्याचे निदर्शनास आल्यास त्यास पोलिसांच्या स्वाधीन करावे व त्याबाबतची लेखी तक्रार पोलिसात दयावी. सदर तक्रारीची पोलिसांनी गंभीर दखल घेऊन गुन्हेगाराविरुध्द गुन्हा शाबित होईल, याद्दष्टीने आवश्यक ती सर्व कार्यवाही करावी.

(२) मतदान केंद्राध्यक्षांनी आव्हानित मतांची यादी महानगरपालिका नियमातील नमुना- १४ (नियम क्र. ४३) नुसार ठेवावी. **(जोडपत्र-१३)**

## ४. संक्षिप्त चौकशी

मतदाराच्या ओळखीसंदर्भात आव्हाने देणाऱ्याला तो खरा मतदार नाही याबद्दल पुरावा देण्यास सांगा. जर आव्हान देणारा प्रथमदर्शनी पुरावा देण्यास असमर्थ ठरल्यास त्याचे आव्हान अमान्य करा आणि ज्या व्यक्तिच्या ओळखीबद्दल आव्हान देण्यात आले आहे त्याला मतदान करु द्या. जर आव्हान देणारा प्रथमदर्शनी पुरावा सादर करु शकला तर त्या व्यक्तिला बोलावून त्याच्याविरुध्दचा आक्षेप फेटाळणारा पुरावा सादर करण्यास त्याला सांगा, जर तो योग्य पुरावा

सादर करु शकला तर त्याला मतदान करु द्या. जर पुरावा सादर करु शकला नाही तर त्याच्याविरुध्द दिलेले आव्हान मान्य करा. चौकशीच्या काळात तुम्ही ग्राम अधिकारी, बनावट म्हणून संशय असलेल्या मतदाराच्या शेजारच्या मतदाराकडे त्याच्या खरे-खोटेपणाबद्दल चौकशी करा. पुरावा घेताना तुम्ही आव्हान दिलेल्या व्यक्तीकडून किंवा पुरावा देणाऱ्या इतर व्यक्तीकडून शपथेवर पुरावा घ्या. जर आव्हान खरे ठरले तर बनावट मतदारास पोलिसांच्या स्वाधीन करा व तुमची त्याच्याविरुध्दची तक्रार पोलिसाला द्या. ही तक्रार तुमचे मतदान केंद्र असलेल्या भागातील पोलिस ठाणे अधिकाऱ्याला द्या. (जोडपत्र-१५)

### ५. आव्हान शुल्क परत करणे

आव्हान केलेल्या व्यक्तिला त्याने भरलेले महानगरपालिकेच्या बाबतीत रु. २०/- इतके आव्हान शुल्क परत करण्यासंदर्भात संबंधित मतदार खरा आहे किंवा कसे याविषयी चौकशी केल्यानंतर जर मतदान केंद्राध्यक्षास संबंधित मतदार खरा नसल्याचे निदर्शनास आल्यास त्यास मतदान करु देणार नाही. तथापि, मतदाराच्या खरेपणाविषयी घेण्यात आलेले आव्हान चांगल्या उद्देशाने केलेले नाही व नाहक केले आहे असे आढळून आल्यास आव्हान शुल्क जप्त करण्यात यावे व महानगरपालिका अथवा नगर परिषदेकडे भरणा करण्यात यावे.

### ६. मतदार यादीतील मुद्रणदोष अथवा कार्यालयीन चुकांकडे कानाडोळा करा

काही वेळा मतदार यादीत नोंदविलेली मतदाराची माहिति चुकीची छापलेली असते तर काही वेळा मतदाराचे वयासंदर्भातील माहिती कालबाह्य ठरलेली असते. अशा वेळी त्याकडे तुम्ही कानाडोळा करावा. तथापि, मतदार यादीत नोंदविलेल्या इतर माहितीच्या आधारे तुम्ही मतदाराच्या ओळखीसंदर्भात खात्री करुन घ्या.

### ७. मतदाराच्या पात्रतेला आव्हान देऊ नका

तुमचे समाधान होईल अशाप्रकारे मतदाराची ओळख पटली तर त्याला मतदान करण्याचा हक्क आहे, अशा मतदाराच्या पात्रतेबद्दल मतदान केंद्रात शंका उपस्थित करता येणार नाही. उदाहरणार्थ मतदार १८ वर्षाचा आहे का वा तो संबंधित मतदार संघातील रहिवासी आहे का याबद्दल तुम्हाला चौकशी करता येणार नाही.

# मतदाराला मतदान करु देण्यापूर्वी त्याच्या बोटावर न पुसणारी शाई लावणे आणि त्याची सही वा अंगठ्याचा ठसा घेणे

## १. मतदाराचे डाव्या हाताची तर्जनी तपासणे आणि त्यावर शाई लावणे

१.१ मतदाराची पहिल्या मतदान अधिकाऱ्याने ओळख पटविली आणि त्या मतदाराबद्दल कुणीही आव्हान दिले नाही तर दुसरा मतदार अधिकारी त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर मतदानाची शाई प्रकरण ५ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे दिलेल्या काडीने / मार्करपेनचा वापर करुन लावेल. जर एखाद्या मतदाराने शाई लावून घेण्यास नकार दिला किंवा त्याच्या डाव्या हाताच्या तर्जनीवर शाईची खूण असेल किंवा शाईची खूण पुसण्याचा त्याने प्रयत्न केला तर त्याला मतदान करु देऊ नका. (शाई लावताना मार्कर पेन दाबून वापरावा तसेच मार्कर पेनचा वापर निशाणीसाठी डाव्या हाताच्या तर्जनीवर तीन-चार वेळा घासून करावा. याबाबत राज्य निवडणूक आयोगाचे निदेश पत्र क्र.रानिआ/मनपा/२०१०/प्र.क्र.१०/का-५ दि.१९/११/२०११ (जोडपत्र २१) कृपया पहावे.)

जर मतदाराने मतदानाची शाई लागू नये म्हणून तर्जनीवर तेलकट पदार्थ लावला असेल तर तो तेलकट अथवा 'ग्रीस' चा पदार्थ मतदान अधिकाऱ्याने कापडाच्या तुकड्याने अथवा चिंधीने पुसावा आणि त्यानंतरच मतदानाची शाई त्याच्या तर्जनीवर लावावी.

१.३ पूर्वी मतदाराची सही किंवा अंगठ्याचा शिक्का घेतल्यानंतर मतदानाची शाई त्याच्या तर्जनीवर लावण्यात येई. परंतु निवडणूक आयोगाच्या नव्या सूचनेनुसार मतदानाची शाई मतदाराच्या बोटावर लावल्यानंतर त्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा घ्यावा. त्यामुळे सदर मतदार सही करणे आणि त्यानंतर मतदान करेपर्यंत बराच कालावधी जाईल. आणि दरम्यानच्या काळात त्याच्या बोटावरील मतदानाची शाई पूर्णपणे वाळेल आणि शाईचा ठळक ठसा बोटावर बनेल.

१.४ मतदार मतदान विभागात जाण्यापूर्वी नियंत्रण विभागाचा प्रमुख असलेल्या मतदान अधिकाऱ्याने अथवा मतदान केंद्र प्रमुखाने मतदाराच्या बोटावरील शाई पुन्हा एकदा तपासावी. जर मतदाराने शाई पुसली किंवा त्याच्या बोटावरील शाई अस्पष्ट असेल तर त्याच्या बोटावर पुन्हा शाई लावावी. सर्वसाधारणपणे हे काम मतदान पथकाबरोबर असलेल्या 'ड' वर्गीय कर्मचाऱ्याकडे सोपवावे. तो मतदार मतदान विभागात जाण्यापूर्वी व मतदान करुन मतदान केंद्राबाहेर पडण्यापूर्वी मतदाराच्या बोटावरील शाई तपासेल.

१.५ प्रत्येक मतदान केंद्रावर नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची संख्या वेगवेगळी असण्याची शक्यता असल्यामुळे वर नमूद केलेली कामे सोपविण्याचे अथवा त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार मतदान केंद्राध्यक्ष यांना राहतील.

## २. नव्याने मतदान अथवा स्थगित मतदानाच्या वेळी शाई लावण्याची पध्दत

नव्याने मतदान घेण्यात आले किंवा स्थगित मतदान पुन्हा घेण्यात आले तर पहिल्या मतदानाच्यावेळी मतदाराच्या बोटावर लावलेल्या मतदानाच्या शाईकडे दुर्लक्ष करावे आणि नवी शाई मतदाराच्या डाव्या हाताच्या मधल्या बोटावर नख आणि नखाला धरुन असलेल्या त्वचेच्या कडेवर लांब खूण करुन लावावी. म्हणजे शाईची ठळक खूण दिसून येईल.

## ३. मतदाराला जर डाव्या हाताची तर्जनी नसेल तर शाई लावण्याची पध्दत

जर मतदाराला डाव्या हाताची तर्जनी नसेल तर त्याच्या डाव्या हाताच्या कोणत्याही बोटावर शाई लावावी. जर डाव्या हाताला बोटेच नसतील तर शाई त्याच्या उजव्या हाताच्या तर्जनीवर लावावी आणि जर त्याला उजव्या हाताची तर्जनी नसेल तर तर्जनीपासून नंतरच्या कोणत्याही बोटावर शाई लावावी. जर त्याच्या डाव्या अथवा उजव्या हाताची बोटेच नसतील तर मतदानाची शाई त्याच्या डाव्या अथवा उजव्या हाताच्या थोटकावर लावावी.

## ४. मतदाराचा मतदार नोंदवहीतील मतदार क्रमांक नोंद करणे

४.१ मागील उताऱ्यात दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने मतदाराच्या बोटावर शाई लावल्यानंतर त्याने मतदाराची नोंद मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मध्ये करावी आणि त्यावर मतदाराची सही अथवा अंगठ्याचा ठसा घ्यावा.

४.२ ही नोंद दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने मतदार नोंदवहीत पुढील पध्दतीने करावी.

१) पहिल्या रकान्यात दुसरा मतदान अधिकारी मतदाराचा अनुक्रमांक लिहिल. सुरुवात १ क्रमांकाने करील. नोंदवहीच्या (रजिस्टर) प्रत्येक पानावर (पाठपोठ) २० अनुक्रमांक लिहिता येतील. मतदान सुरु होण्यापूर्वी सदर मतदान अधिकाऱ्याने नोंदवहीच्या काही पानावर असे अनुक्रमांक आगाऊ लिहून ठेवावे.

२) दोन क्रमांकांच्या रकान्यात मतदान अधिकारी मतदाराचा यादीतील अनुक्रमांक लिहिल. उदाहरणार्थ मतदानासाठी मतदान केंद्रात प्रथम आलेल्या मतदाराचा चिन्हांकित मतदार यादीतील अनुक्रमांक २५६ असेल तर दुसरा मतदान अधिकारी नोंदवहीतील पहिल्या रकान्यात १ अनुक्रमांक लिहिल आणि दुसऱ्या रकान्यात २५६ हा अनुक्रमांक लिहिल. त्याचप्रमाणे दुसऱ्या मतदाराचा मतदार यादीतील क्रमांक १३८ असेल तर दुसरा मतदान अधिकारी मतदार नोंदवहीत पहिल्या रकान्यात २ क्रमांक लिहिल आणि दुसऱ्या रकान्यात १३८ हा मतदार यादीचा अनुक्रमांक लिहिल त्याचप्रकारे पुढील मतदारांची नोंद करीत जावे.

४.३ वरील दोन रकान्यात योग्य ती माहिती भरल्यानंतर दुसऱ्या मतदान अधिकाऱ्याने संबंधित मतदारांची ३ क्रमांकाच्या रकान्यात सही अथवा अंगठ्याचा ठसा घ्यावा.

## ५. मतदाराची सही

मतदाराने मतदार नोंदवहीत सही करताना ती पूर्ण नांव, मधले नांव आणि आडनांव अथवा आडनांव व पहिल्या नावाची आद्याक्षरे. जर साक्षर मतदाराने कोणतीही खूण केली आणि ती खूण म्हणजे आपली सही मानावी असे सांगितले तर तसे मानू नये. त्याला त्याचे पूर्ण नांव लिहिण्यास सांगावे. कारण साक्षर मतदाराने आपल्या पूर्ण नावाची सही करणे म्हणजे मतदार नोंदवहीतील त्याची नोंद प्रमाणित करणे असे मानले जाते. जर त्याने आपले पूर्ण नांव लिहिण्याचे नाकारले तर त्याला अंगठ्याचा ठसा उमटविण्यास सांगावे. जर अंगठ्याचा ठसाही उमटविण्यास त्याने नकार दिल्यास त्याला वरील चार उताऱ्यातील स्पष्टीकरणानुसार मतदान करु देऊ नका.

## ६. मतदाराच्या अंगठ्याचा ठसा

६.१ जर मतदार सही करण्यास असमर्थ असल्यास मतदार नोंदवहीत त्याच्या अंगठ्याचा ठसा घ्यावा. मतदाराच्या अंगठ्याचा ठसा मतदान केंद्राध्यक्ष अथवा इतर कोणत्याही मतदान अधिकाऱ्याने मतदार नोंदवहीत तो प्रमाणित करण्याची गरज नसते.

६.२ मतदार नोंदवहीतील अंगठ्याचा ठसा हा स्पष्ट असा असावा. अंगठ्याचा ठसा ठळक असावा म्हणून स्टॅम्प पॅडमधील शाई मतदाराच्या अंगठ्यावर चांगली बसेल अशी लावावी. त्याचप्रमाणे ठसा अगदी गडद उठू नये म्हणून स्टॅम्प पॅडमध्ये अंगठा अगदी खोलवर बुडवू नये.

६.३ मतदाराच्या अंगठ्याचा ठसा घेतल्यानंतर त्याचा अंगठा ओल्या कापडाच्या तुकड्याने पुसावा.

## ७. मतदार नोंदवहीत अंध/अशक्त अथवा कुष्ठरोग्याची सही वा अंगठ्याचा ठसा घेणे

अंध अथवा कुष्ठरोग झालेल्या मतदाराच्या अंगठ्याचा ठसा मतदार नोंदवहीत घ्यावा. जर अशा मतदारा पैकी कुणी साक्षर असेल तर त्याला अंगठ्याच्या ठशाऐवजी सही करु द्यावी. जर अशक्त मतदार अंगठ्याचा ठसा वा सही करु शकत नसल्यास त्याच्या जोडीदारास मतदान नोंदवहीत सही वा अंगठ्याचा ठसा उमटू द्यावा.

## ८. मतदाराला मतदार स्लीप देणे

८.१ मतदाराच्या तर्जनीवर शाईची खूण केल्यानंतर त्याची सही वा अंगठ्याचा ठसा मतदार नोंदवहीत पहिला मतदान अधिकारी घेईल. तर दुसरा मतदान अधिकारी खालील नमुन्यात मतदार स्लीप तयार करील.

| मतदार स्लीप |
|---|
| मतदाराचा अनुक्रमांक (मतदान नोंदवहीच्या रकाना १ प्रमाणे)........................................ |
| मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक ............................................................ |
| मतदान अधिकाऱ्याची संक्षिप्त सही....................................................................... |

८.२ या मतदार स्लीप निवडणूक निर्णय अधिकारी पोस्ट कार्डाच्या निम्म्या आकाराएवढी छापून घेईल आणि तुम्हाला मतदानाच्या साहित्याबरोबर पुरविल. १०० स्लीपचे एक बंडल किंवा ५० स्लीपचे एक बंडल याप्रकारे तुमच्या केंद्रातील मतदारांच्या संख्येनुसार देण्यात येतील.

८.३ वरील ८.१ उताऱ्यानुसार तयार करण्यात आलेली मतदार स्लीप दुसरा मतदान अधिकारी मतदाराला देईल. ही स्लीप घेऊन मतदाराला मतदान यंत्राच्या नियंत्रण विभागाचा ताबा असलेल्या तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे वा मतदान केंद्राध्यक्षाकडे जाण्यास सांगावे.

## प्रकरण - १८
## मतदानाची नोंद आणि मतदान सोपस्कार

### १. मतदार नोंदवहीत मिळालेल्या अनुक्रमांकानेच मतदान करणे

१.१ मतदान यंत्राचा नियंत्रण विभाग प्रमुख म्हणून मतदार "मतदार स्लीप" घेऊन तुमच्याकडे किंवा तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याकडे येईल. ही मतदार स्लीप पाहून त्याला मतदान करु द्यावे.

१.२ मतदाराने मतदान यंत्रावर मतदान करताना त्यांना मतदार नोंदवहीत मिळालेल्या अनुक्रमांकानेच मतदान करावे. त्यासाठी नियंत्रण विभागाचे प्रमुख असलेल्या मतदान अधिकाऱ्याने मतदारांना त्यांच्या मतदान स्लीपवरील अनुक्रमांकानुसार मतदान कक्षात पाठवावे.

१.३ काही अपवादात्मक परिस्थितीत अथवा काही अपरिहार्य कारणास्तव वा आकस्मिक कारणाने जर अनुक्रमांकाने मतदान करण्याची पध्दत तोडावी लागली तर त्याबद्दल योग्य ती नोंद म्हणजे मतदाराने वास्तवत: कोणत्या अनुक्रमांकावर मतदान केले ते त्याच्या अनुक्रमांकाच्या शेऱ्याच्या रकान्यात योग्य ती नोंद करावी. त्याचप्रमाणे ज्या मतदाराचा अनुक्रमांक गेला त्याच्या अनुक्रमांकापुढेही योग्य ती नोंद करावी.

### २. मतदारास मतदान करण्यास परवानगी देणे

२.१ मतदार मतदार स्लीप घेऊन तुमच्याकडे किंवा नियंत्रण विभागाचा प्रमुख असलेल्या तिसऱ्या मतदान अधिकाऱ्यांकडे येईल तेव्हा त्याच्याकडून मतदार स्लीप घेऊन त्याला मतदान करु द्यावे.

२.२ मतदारांकडून परत घेतलेल्या सर्व मतदार स्लीप काळजीपूर्वक जपून ठेवाव्यात आणि मतदानाच्या शेवटी त्या एका लिफाफ्यात बंद कराव्यात. त्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी खास लिफाफा देईल. तो प्रकरण-२७ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सील करावा.

२.३ मतदाराकडून मतदार स्लीप घेतल्यानंतर त्याच्या तर्जनीचे बोट तुम्ही किंवा या तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याने (नियंत्रण विभाग प्रमुख) तपासावे. तर्जनीवर लावण्यात आलेली मतदानाची शाई पुसली गेलेली असेल किंवा अंधुक झालेली असेल तर त्यावर पुन्हा शाईची ठळक खूण करावी. (हे काम नंतर तुमच्या मतदान पथकात असलेल्या "ड" वर्गाच्या कर्मचाऱ्यास मतदार मतदान करुन मतदान कक्षाबाहेर आल्यावर व मतदान केंद्रातून बाहेर पडण्यापूर्वी करण्यास सांगावे)

२.४ नंतर मतदाराला मतदान करण्यासाठी मतदान कक्षात पाठवावे.

३. मतदान पध्दत

३.१ मतदाराला मतदान करता यावे म्हणून नियंत्रण विभागावरील बॅलट बटण तुम्ही किंवा तिसऱ्या मतदान अधिकाऱ्याने दाबावे. त्यामुळे मतदान कक्षात ठेवण्यात आलेले मतदान युनिट मत नोंदणीसाठी सज्ज होईल. ज्यावेळी बॅलट बटण दाबण्यात येईल, यावेळी नियंत्रण विभागातील बिझी दिवा लाल पेटेल आणि त्याचबरोबर मतदान कक्षातील प्रत्येक मतदान युनिटवरील रेडी हिरवा दिवा पेटेल.

३.२ मतदार मतदान युनिटवर उमेदवाराच्या नाव व निशाणीपुढे असलेला कॅन्डीडेट बटण दाबून आपल्या मताची नोंद करील. ज्यावेळी मतदार बटण दाबील त्यावेळी उमेदवाराच्या नाव आणि निशाणी पुढे असलेला दिवा लाल पेटेल आणि मतदान युनिटवरील हिरवा दिवा बंद होईल. त्याचप्रमाणे नियंत्रण विभागातून बीप असा आवाज येईल आणि काही क्षणातच नियंत्रण विभागातील बीप आवाज व बिझी लाल दिवा बंद होईल.

३.३ ही दृक आणि श्राव्य खूण मतदाराचे मत नोंदविण्यात आल्याची आहे. त्याचबरोबर मतदाराने मतदान कक्षातून बाहेर येऊन मतदान केंद्राबाहेर पडावे.

३.४ पुढील प्रत्येक मतदारास मतदान करण्यास परवानगी दिल्यानंतर ही पध्दत वापरावी. एक लक्षात ठेवा की एकावेळी एकच मतदार मतदान कक्षात जाईल. तसेच पहिला मतदार मतदान कक्षातून बाहेर पडल्यानंतरच नियंत्रण कक्षातील बॅलट बटण (मतदान बटण) दाबावे.

३.५ राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २९ डिसेंबर, २०२२ च्या **(जोडपत्र-१९)** आदेशान्वये मतदान यंत्रावरील END बटणाचा वापर कशा प्रकारे करण्यात यावा याबाबत सविस्तर आदेश काढलेले आहेत. त्यानुसार जे मतदार NOTA बटणाचा वापर करण्यास नकार देतील अशा मतदारांना END बटणाचा वापर करून मतदान प्रक्रिया पूर्ण करता येईल. जर मतदारांनी NOTA व END या दोन्ही बटणांचा वापर करण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांना सदर आदेशात दिलेली कार्यपध्दती वापरून END बटण दाबून, मतदान प्रक्रिया पुढे नेता येईल.

४. झालेले मतदान नियमितपणे तपासावे.

४.१ एका विशिष्ट वेळेपर्यंत झालेले मतदान तपासायचे असल्यास टोटल बटण दाबावे. म्हणजे त्यावेळेपावेतो झालेले मतदान कळेल. ही तपासणी नियमितपणे करावी आणि मतदार नोंदवहीत सही वा अंगठा लावलेल्या मतदारांची संख्या मतदान यंत्रात नोंद झालेल्या मतांशी जुळते का हे जाणून घेणे.

४.२ काही असले तरी मतदान केंद्राध्यक्षानी प्रत्येक दोन तासानंतर झालेले मतदान तपासावे आणि त्याची नोंद आपल्या रोजनिशीत (डायरी) करावी.

४.३ जेव्हा बिझी दिवा चालू नसेल तेव्हाच टोटल बटण दाबावे म्हणजे एका मतदाराने आपले मत नोंदविल्यानंतर आणि दुसऱ्या मतदारास मतदानाची परवानगी देण्यापूर्वी टोटल बटण दाबावे.

५. मतदान काळात मतदान केंद्राध्यक्षाचा मतदान कक्षात (वोटिंग कंपार्टमेंट) प्रवेश.

५.१ काही वेळा मतदान केंद्राध्यक्षास असा संशय येऊ शकतो की, मतदान कक्षात ठेवण्यात आलेले बॅलेट युनिट योग्यप्रकारे काम करीत नाही किवा मतदान कक्षात गेलेला मतदार बॅलेट युनिट मध्ये ढवळाढवळ वा हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न करीत आहे किंवा मतदार आवश्यकतेपेक्षा अधिक काळ मतदान कक्षात रेंगाळला तर मतदान केंद्राध्यक्षास नियम १९ तसेच इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या नियम १६ खाली मतदान कक्षात प्रवेश करण्याचा अधिकार आहे आणि बॅलेट युनिटकडे कुणी ढवळाढवळ करु नये आणि मतदान सुरळीतपणे पार पडावे म्हणून आवश्यक ती पावले उचलण्याचाही अधिकार आहे.

५.२ जेव्हा जेव्हा मतदान केंद्राध्यक्ष मतदान कक्षात प्रवेश करील तेव्हा तेथे उपस्थित असलेले मतदान प्रतिनिधी त्यांच्यासोबत मतदान कक्षात येण्यास इच्छुक असतील तर त्याने या मतदान प्रतिनिधींना परवानगी द्यावी.

०२

## प्रकरण - १९

## मतदारांनी कुणाला मतदान केले हे गुप्त ठेवावे

### १. मतदान पध्दतीचे काटेकोरपणे पालन करा

प्रत्येक मतदाराने मतदान केंद्राच्या आत मतदानासंदर्भात संपूर्ण गुप्तता पाळावी. त्याने प्रकरण १७ मध्ये नमूद केलेल्या मतदान पध्दतीचे काटेकोरपणे पालन करावे.

### २. मतदान पध्दत वा सोपस्कार मानण्यास नकार

२.१ मतदान केंद्राध्यक्षानी इशारा देऊनही एखादा मतदार मतदान पध्दतीचे पालन करण्यास नकार देत असेल तर मतदान केंद्राध्यक्षानी अथवा मतदान केंद्राध्यक्षांच्या आदेशाने मतदान अधिकाऱ्याने अशा मतदारास मतदान करण्यास परवानगी देऊ नये. ही कृती इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या नियम १५ (६) नियमाखाली योग्य ठरेल. जर मतदाराला मतदार स्लीप दिलेली असेल तर ती त्याच्याकडून परत घ्यावी आणि रद्द करावी.

२.२ मतदान प्रक्रियेचे पालन न करणाऱ्या ज्या मतदारास मतदान करु दिले नाही, त्याची माहिती शेऱ्याच्या स्वरुपात मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) सदर मतदाराच्या नावापुढे मतदान केंद्राध्यक्षानी करावी. त्या शेऱ्याच्या पुढे मतदान केंद्राध्यक्षानी आपली पूर्ण सही करावी. या घटनेमुळे सदर मतदाराच्या नोंदवहीतील रकाना १ मधील अनुक्रमांकात बदल करण्याची गरज नाही. तसेच नंतर येणाऱ्या मतदाराच्या अनुक्रमांकातही बदल करण्याची गरज नाही.

## प्रकरण - २०

## अंध आणि अपंग व्यक्तीचे मतदान

१.१ जर तुम्हाला पटले की अंधत्वामुळे किंवा शारिरीक अपंगत्वामुळे एखादा मतदार उमेदवाराची निवडणूक निशाणी, जी मतदान युनिटवर आहे, ओळखू शकत नाही किंवा योग्य बटण दाबून आपल्या निवडीच्या उमेदवारास मतदान करु शकत नाही तर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या परिच्छेद १६ नुसार तुम्ही त्याला १८ वर्षापेक्षा कमी नसलेला सहायक घेण्यास परवानगी द्या आणि त्याला मतदान कक्षात जाऊन मतदाराच्या इच्छेनुसार मतदान करु द्या.

१.२ एका मतदान केंद्रावर एकाच दिवशी एका सहाय्यकास एकपेक्षा अधिकवेळा सहाय्यक म्हणून मतदान करु देऊ नका.

१.३ कुणाही व्यक्तीला "सहाय्यक" म्हणून मतदान करु देण्यापूर्वी त्याला घोषित करायला लावा की तो मतदाराच्या वतीने करणार असलेले मतदान गुप्त ठेवील. तसेच त्यांनी त्यादिवशी दुसऱ्या कुठल्याही मतदाराचा सहाय्यक म्हणून मत नोंदणी केलेली नाही. हे प्रकटीकरण तुम्ही विहित नमुन्यात घ्या.

१.४ तुम्ही अशा मतदानाची नोंद नमुना व्हीएम-५ यात ठेवा.

१.५ राज्य निवडणूक आयोगाने क्र. रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५ दि.२६ जून, २०२५ अन्वये स्वतंत्र मतदान केंद्र / रॅम्पची सुविधा देण्याबाबत आदेश दिले आहेत **(जोडपत्र-१७)** ( मुद्दा क्र. ५ (vi) ) त्यानुसार मतदाराने अपंग असल्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी यांना कळविले असल्यास व त्यास अनुसरून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी अपंग मतदारांची तळमजल्यावर सोय केली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीतून कापून (काट मारुन) संबंधित मतदान केंद्राच्या यादीमध्ये पुरवणी म्हणून समाविष्ट केली असतील. त्यानुसार त्यांना मतदान करू द्यावे.

प्रकरण - २० - अ

## मतदान न करण्याचा मतदाराचा निर्णय

### १. मतदान कक्षात जाण्यापूर्वी मतदान न करण्याचा निर्णय-

१.१ मतदाराचा मतदार यादी क्रमांक मतदार नोंदवहीत नमुना व्हीएम-१ मध्ये नोंद केल्यानंतर आणि मतदाराने या नोंदवहीत आपली सही किंवा अंगठयाचा ठसा उमटविल्यानंतर मतदान कक्षात जाण्यापूर्वी जर त्याने मतदान न करण्याचा निर्णय घेतल्यास त्याला मतदान करण्यास जबरदस्ती करु नका.

१.२ मतदाराने मतदान न करण्याचा घेतलेला निर्णय मात्र तुम्ही मतदार नोंदवहीत त्या मतदाराच्या शेऱ्याच्या रकान्यात नोंद करुन ठेवा. त्या शेऱ्याखाली तुम्ही तुमची पूर्ण सही करावी.

१.३ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या परिच्छेद १७ व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत सदर शेऱ्याखाली त्या मतदाराची सहीही घ्यावी.

१.४ या कारणासाठी मतदाराच्या अनुक्रमांकात अथवा मतदार नोंदवहीत पहिल्या रकान्यात पुढील मतदारांच्या अनुक्रमांकात बदल करण्याची गरज नाही.

१.५ जर एखाद्या मतदाराने मतदान कक्षात जाण्यापूर्वीच मतदानास नकार दिला तर अशा मतदाराच्या मतदार नोंदवहीतील (व्हीएम-१) नोंदीसमोर अभिप्राय या रकान्यात मतदानास नकार दिल्याची नोंद घ्यावी. याठिकाणी नोंदविलेल्या मतांच्या हिशोबामध्ये (व्हीएम-३) अनुक्रमांक ३ येथे अशा मतदारांची संख्या नमूद करण्यात येईल.

### २. मतदान कक्षात गेल्यानंतर मतदान न करण्याचा निर्णय-

बॅलेट युनिटवरील END बटणाचा वापर कसा करावा याबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २९ डिसेंबर, २०२२ च्या आदेशान्वये **(जोडपत्र-१९ )** सुधारित सूचना जारी केल्या आहेत. त्यानुसार मतदाराने आपले मतदान पूर्ण न केल्यास अथवा मतदान कक्षात गेल्यानंतर मतदान पूर्ण करण्याची त्याची इच्छा नसल्यास खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

१. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पुढील निवडणुकांमध्ये जेथे राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्राचा वापर होत असेल, तेथे शेवटच्या बॅलेट युनिटवरील (एकापेक्षा अधिक बॅलेट युनीट वापरले जात असल्यास) **"END" बटण सुरु असते.** मात्र

त्यावर **काळी मास्कींग कॅप** लावून ठेवलेली असते. सदरचे "END" **बटण** दाबण्यासाठी काळी मास्कींग कॅप काढून बटण दाबता येते. (ज्या ठिकाणी कंट्रोल युनिटला एकापेक्षा जास्त बॅलेट युनिट जौडल्या जातील, त्या ठिकाणी शेवटचे बॅलेट युनिट वगळता अगोदरच्या बॅलेट युनिटवरील "END" **बटण पांढऱ्या मास्कींग टॅबने बंद** असते जेणेकरुन "END" **बटण दाबता येणार नाही.**)

२. जर एखादा मतदार आपले मतदान पूर्ण न करता मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर मतदान अधिकारी / मतदान केंद्राध्यक्ष यांना कंट्रोल युनिटवरील लाल दिवा न विझल्यामुळे तसेच बिप साऊंड न आल्यामुळे मतदाराने, मतदान पूर्ण केलेले नाही ही गोष्ट लक्षात येईल.

३. अशा परिस्थितीत मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देऊन पसंतीच्या उमेदवाराला मत देऊन अथवा 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटण दाबून मतदान पूर्ण करण्याबाबत विनंती करावी. जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात जाऊन त्यानुसार मतदान केल्यास, त्याठिकाणी त्या मतदाराची मतदान प्रक्रिया पूर्ण होईल.

४. मात्र जर एखाद्या मतदाराने पसंतीच्या उमेदवाराला मत देण्यास अथवा वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटण दाबण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांनी त्याला शेवटच्या बॅलेट युनिटवरील "END" बटनावरील काळी कॅप उघडून "END" बटण दाबण्याची विनंती करावी.

५. जर मतदाराने "END" बटण दाबण्यासही नकार दिला, तर मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलेट युनिटवरील उमेदवारांचे नावासमोरील दिवे एखादा पुठ्ठा अथवा पुस्तक ठेवून झाकावेत जेणेकरुन मतदानाची गोपनीयता अबाधित राहील. त्यानंतर मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने शेवटच्या बॅलेट युनिटवरील काळी कॅप उघडून "END" बटण दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण करावी व या बाबीची नोंद मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीत (Presiding Officer Diary) घ्यावी.

६.	वरील परिच्छेद ४ ते ५ मधील परिस्थिती उद्‌भवल्यास नमुना व्हीएम-३ (भाग-एक) मधील त्या जागेकरिता त्या मतदान केंद्रात Total बटनानुसार झालेले मतदान व त्या जागेकरिता त्या मतदान केंद्रात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना (NOTA सह) मिळालेली एकूण मते यामधील तफावत ही END बटणाचा वापर किती वेळा करण्यात आला हे दाखवत असून त्याची नोंद सोबतच्या नमुना व्हीएम-६ (अ) मध्ये दर्शविण्यात यावी.

## प्रकरण - २१

# निवडणूक सेवेवर असलेल्या सरकारी सेवकांचे मतदान

## १. निवडणूक सेवेवर असलेल्या सरकारी सेवकांना मतदान सुविधा

१.१ निवडणूक सेवेवर असलेल्या व्यक्तिच्या मतदानाची तरतूद टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील तरतुदीनुसार करण्यात आलेली आहे.

१.२ मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी अथवा इतर सरकारी सेवक, त्यांचे मतदार म्हणून नाव ज्या मतदार संघात नोंद झालेले आहे आणि त्याच मतदार संघातील मतदान केंद्रावर ते सेवेत आहेत. त्यांना त्या मतदान केंद्रात इच्छा असल्यास मतदान करता येते. टपालमत पध्दतीने नव्हे. ज्यांना स्वत: मतदान करावयाचे आहे त्याने ही संधी घेण्यासाठी विहित नमुन्यात निर्वाचन अधिकाऱ्यास अर्ज करावा.

१.३ अशा व्यक्तिची ओळख पटविण्याची आवश्यकता नाही त्यांना मतनोंदणी करण्यास परवानगी देता येईल, जर

अ) निवडणूक सेवा दाखला सादर केल्यानंतर सादर करणाऱ्या व्यक्तिची त्यावर सही घ्यायला हवी.

ब) दाखल्यात दर्शविल्याप्रमाणे त्या व्यक्तिचे नाव आणि मतदार यादी क्रमांक घ्या, मतदार यादीच्या चिन्हांकीत प्रतीवर शेवटी त्याची नोंद करा.

क) त्याना मतदान यंत्रावर मतनोंदणी करायला द्या जसे मतदान केंद्रावर इतर मतदाराना देण्यात येते.

## २. निवडणूक सेवा दाखला

निवडणूक सेवा दाखला अशा मतदारांना देण्यात येतो जे निवडणूक सेवा / आरक्षित सेवा यात असतात आणि ज्याना व्यक्तिश: मतदान केंद्रावर, जिथे त्यांची नेमणूक झालेली आहे तिथे मतदान करायला मिळत नाही. जर कुठल्याही कारणामुळे एखाद्या व्यक्तिची नेमणूक, निवडणूक सेवा / आरक्षित सेवा म्हणून रद्द झाली /निवडणूक सेवा दाखल्यात नोंद केल्यानंतर झाली आणि त्या नावाची नोंद मतदान यादींच्या चिन्हांकीत प्रतीवर झाली तरी त्याला मतदानाच्या हक्कापासून परावृत्त करता येत नाही. अशा व्यक्तीस मग तो निवडणूक अधिकारी असो अथवा इतर सरकारी सेवक जो निवडणूक सेवेत आहे, ज्याला निवडणूक सेवा दाखला दिलेला आहे त्याला कुठल्याही मतदान केंद्रात मतदान करायला द्यायला हवे.

## प्रकरण - २२

## प्रदत्त (दुबार) मते

१. जर एखादी व्यक्ती स्वत:हून मतदान केंद्रावर जाऊन आपले मत नोंद करु इच्छिते आणि त्या ठिकाणी गेल्यावर कोणीतरी भलतीच व्यक्ती तिच्या नावे मतदान करुन गेल्याची तुमची खात्री झाली तर सदर मतदाराच्या ओळखीविषयी त्याला विचारण्यात आलेल्या प्रश्नांची उत्तरे तुम्हाला समाधानकारक मिळून त्याची ओळख पटली म्हणजे त्याला प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेवर मतदान करण्यास परवानगी द्यावी. पण मतदान यंत्रावर नव्हे.

### प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेचा आराखडा

२.१. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या नियम १८ खाली प्रदत्त (दुबार) मतपत्रिका अशा पध्दतीने तयार केलेली असेल आणि त्यावरील तपशील राज्य निवडणूक आयोगाकडील आदेशानुसार असेल.

२.२ त्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर २० मतपत्रिका पाठविण्यात येतील. ज्या मतपत्रिका मतदान यंत्रातील मतदान युनिटवर वापरण्यासाठी छापून घेतलेल्या आहेत, त्याचाच वापर त्यामागे "प्रदत्त मतपत्रिका" असा शिक्का मारुन प्रदत्त मतपत्रिका म्हणून केला जाईल. जर कुठल्याही मतदान केंद्रावर वरील कारणामुळे जर अधिक मतपत्रिकांची आवश्यकता भासली तर त्या मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षाकडे त्या मतदान केंद्राच्या विभागीय अधिकारी यांचेमार्फत पाठविण्याची व्यवस्था करण्यात येईल.

२.३ तुम्ही मतपत्रिकेच्या मागील बाजूवर तुमच्या स्वत:च्या हस्ताक्षराने प्रदत्त (दुबार) मतपत्रिका असे स्पष्ट अक्षरांनी लिहायला हवे. जर या अगोदर त्यांच्यावर सदर शब्दांचा शिक्का मारलेला नसेल तर आणि दुबार मतपत्रिकांची आवश्यकता भासली तरच वापर करायला हवा.

### ३. प्रदत्त (दुबार) मतपत्रिकांचा हिशोब

तुम्ही सर्व मतपत्रिकांचा अचूक हिशोब ठेवायला हवा.

(१) प्रदत्त (दुबार) मतपत्रिका वापरण्यासाठी आणल्या

(२) मतदाराना त्या देण्यात आल्या.

(३) न वापरता परत केल्या.

हा हिशोब नमुना व्हीएम-३ च्या मुद्दा क्रमांक ८ नुसार असेल.

४. प्रदत्त (दुबार) मतपत्रिका देण्यात आलेल्या मतदारांची नोंद

ज्यांना प्रदत्त (दुबार) मतपत्रिका देण्यात आलेल्या आहेत त्या मतदारांची संपूर्ण नोंद नमुना व्हीएम-२ मध्ये ठेवायला हवी. तुम्ही मतदाराना प्रदत्त (दुबार) मतपत्रिका देण्यासाठी त्या नमुन्याच्या कॉलम (५) वर मतदाराची सही अथवा अंगठ्याचा ठसा घ्यावा.

५. प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेवर मत नोंदणी

५.१ मतदारास प्रदत्त (दुबार) मतपत्रिका देत असताना त्याला त्यासमवेत शाई लावलेला बाणाकृती क्रॉस असलेला रबरी स्टॅम्प देण्यात येईल. सदर स्टॅम्प म्हणजे तोच असेल ज्याचा वापर पारंपारिक मतपत्रिका आणि मतपेट्यांची निवडणूक घेण्यात येत असताना करण्यात येत होता आणि ज्याचा पुरवठा मतदान केंद्रावर मतदान साहित्यांतील एक घटक म्हणून करण्यात येईल.

५.२. प्रदत्त (दुबार) मतपत्रिका मिळाल्यानंतर सदर मतदार मतदान खोलीत जाऊन, त्याला ज्या उमेदवारासाठी मतदान करावयाचे आहे त्याच्या निशाणीवर त्या रबरी स्टॅम्पने बाणाकृती क्रॉसची खूण करील.

५.३ मतदार त्यानंतर ही प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेची घडी करुन मतदान खोलीतून बाहेर येत असताना तुमच्या स्वाधीन करील.

५.४ तुम्ही सर्व प्रदत्त (दुबार) मतपत्रिका आणि व्हीएम-२ या नमुन्यातील यादी त्यासाठी देण्यात आलेल्या पाकीटात घालून मतदान बंद झाल्यावर पाकीट सीलबंद करायला हवे.

५.५ अंधपणामुळे अथवा शारिरीक अपंगत्वामुळे एखादा मतदार आपले मत कोणाच्या मदतीशिवाय नोंद करु शकत नसल्यास मतदान केंद्राध्यक्षांनी त्याला त्याच्या सोबतीला सहकारी नेण्याची परवानगी द्यायला हवी. ह्या विषयाची रीत प्रकरण -२० मध्ये स्पष्ट करण्यात आलेली आहे.

प्रकरण २३

## मतदान यंत्र खराब होणे, मतदान केंद्र ताब्यात घेणे अशा प्रसंगी मतदान स्थगित करणे

### १. मतदान केंद्र ताब्यात घेणे

१.१ मतदान केंद्राध्यक्षांच्या मते मतदान केंद्र ताब्यात घेण्याची घटना घडली आहे असे त्याला वाटल्यास तो "कंट्रोल युनिट ताबडतोब बंद करील" व त्यापुढे कोणतीही मते नोंदविली जाणार नाहीत याची दक्षता घेईल. तसेच कंट्रोल युनिट व बॅलेट युनिट यांना जोडणारे कनेक्शन बंद करील.

१.२ मतदान केंद्राध्यक्ष वरील कार्यवाही जेव्हा त्यास मतदान केंद्र ताब्यात घेण्याची घटना घडल्याची खात्री असेल तेव्हाच करील. केवळ संशयावरुन तो अशी कृती करणार नाही. कारण एकदा कंट्रोल युनिटचे "क्लोज" बटण बंद केल्यानंतर मतदान यंत्रामध्ये पुढे कोणत्याही मताची नोंद होवू शकणार नाही आणि मतदान स्थगित करुन ते पुन्हा घेण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

१.३ मतदान केंद्राध्यक्षास मतदान केंद्र ताब्यात घेण्याची घटना घडल्यास व त्याने कंट्रोल युनिटचे "क्लोज" बटण दाबून मतदान यंत्र बंद केल्यानंतर ताबडतोब सदरची बाब निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या निदर्शनास आणावी. निवडणूक निर्णय अधिकारी त्यानंतर संपूर्ण माहितीसह आपला अहवाल महानगरपालिका आयुक्त/ जिल्हाधिकारी तसेच राज्य निवडणूक आयोग यांना फॅक्सद्वारे/खास दूताद्वारे कळविल.

१.४. राज्य निवडणूक आयोगास असा प्रकार घडल्याबाबतची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तसेच जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्यानंतर राज्य निवडणूक आयोगाकडून या संदर्भात पुढील सूचना देण्यात येतील.

१.५. स्थगित करण्यात आलेले मतदान पुढे सुरु करताना ते ज्या टप्प्यावर थांबविण्यात आले होते त्या टप्प्यावर सुरु होईल. म्हणजेच ज्या मतदारांनी मतदान केले नाही त्यांनाच फक्त मतदान करता येईल.

१.६. मतदान केंद्राध्यक्षास मतदान स्थगित करतेवेळी जी पाकीटे सीलबंद करण्यात आली होती म्हणजेच चिन्हांकित मतदार यादी, व्हीएम-१ या नमुन्यातील मतदानाची नोंद व नवीन मतदान यंत्र इ. पुरविण्यात येईल. मतदार रजिस्टर सीलबंद लिफाफा तिथे उपस्थित असलेल्या उमेदवारासमोर अथवा त्यांच्या प्रतिनिधी समोर फिरुन उघडायला हवा आणि ह्या अगोदर चिन्हांकीत केलेली मतदार यादीची प्रत आणि मतदार रजिस्टर स्थगित करण्यात आलेले मतदान पूर्ण करण्यास वापर केला पाहिजे. मतदान सुरु होण्यापूर्वी स्थगित करण्यात आलेले

मतदान घेण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशामधील परिच्छेद २५ आणि परिच्छेद २१ ते २४ यात असलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१.७. जिथे मतदान कर्मचारी उपस्थित होऊ न शकल्यामुळे अथवा इतर कारणामुळे मतदानास आरंभ होऊ शकला नव्हता ते परत सुरु करण्यासाठी वर नमुद करण्यात आलेल्या नियमातील तरतूद स्विकारावी जशी ती मूळ मतदानात स्विकारली जाते.

१.८ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेश क्रमांक -रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५, दि. ०७ जानेवारी, २००५ मधील परिच्छेद २५ मध्ये मतदान स्थगित करण्याची कार्यपध्दती नमूद करण्यात आली आहे. यामधील तरतुदीनुसार ज्या मतदान केंद्रावरील मतदान टाळून नव्याने मतदान घ्यायचे ते जाहीर करता येते. जर त्या मतदान केंद्रावर-

i) एखाद्या अनधिकृत व्यक्तीने एखादे मतदान यंत्र बेकायदेशीरपणे नेल्यास, अथवा
ii) एखादे मतदान यंत्र अपघाती अथवा जाणून बुजून खराब झालेले असल्यास अथवा हरवले असल्यास अथवा त्यात हस्तक्षेप केल्यास अथवा ते नष्ट केल्यास आणि ज्यामुळे त्या मतदान केंद्रावरील मतदानाच्या निकालाची खात्री करता येत नसल्यास, अथवा
iii) मतनोंदणी चालू असताना मतदान यंत्रात तांत्रिक बिघाड झाल्यास, अथवा
iv) जर एखाद्या चुकीमुळे अथवा अनियमित पध्दतीमुळे मतदानात खराबी घडून येत असल्यास, अथवा
v) मतदान केंद्र ताब्यात घेण्याची घटना घडून आल्यास.

१.९ जर मतदान केंद्रावर अशा प्रकारची कुठलीही घटना घडली तर संपूर्ण प्रकार विनाविलंब निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास कळवायला हवा. ज्यामुळे ते सदर प्रकरण पुढील मार्गदर्शनासाठी राज्य निवडणूक आयोगापुढे ठेवतील.

१.१० जर एकंदर परिस्थितीचा आढावा घेऊन निर्वाचन आयोगाने एखाद्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्याची सूचना केल्यास सदर नवीन मतदान मूळ मतदान घेण्यात येणाऱ्या पध्दतीनेच घ्यावे.

१.११ ज्या सर्व पात्र मतदारांनी त्या मतदान केंद्रावर मतदान केले होते ते सर्व मतदार नव्या मतदानात मतदान करण्यास पात्र असतील. अशावेळी मूळ मतदानात त्यांच्या हाताच्या बोटावर मतदान शाईची असलेली खूण दुर्लक्षित करावी. ज्यांनी मूळ मतदानात मतदान करताना जी शाईची खूण करुन घेतलेली आहे, त्यांनी नव्या मतदानातही ती परत करुन घ्यायला हवी. अशा प्रसंगी सदर शाईची खूण मतदाराच्या डाव्या हातावरील मधल्या बोटावर लावावी असे सूचित करण्यात येत आहे.

८३

२. मतदान केंद्र ताब्यात घेण्याच्या प्रसंगी मतदान यंत्र बंद करणे

२.१ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेश क्रमांक -रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५, दि. ०७ जानेवारी, २००५ च्या परिच्छेद २५ मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीनुसार मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षास कळून आले की मतदान केंद्र ताब्यात घेण्याचा प्रकार घडत आहे, तेव्हा त्याने विनाविलंब मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट बंद करायला हवे आणि पुढील मते नोंद करता येतील याची खात्री करुन त्याने मतदान युनिट नियंत्रण युनीटपासून वेगळे करायला हवे.

२.२ मतदान केंद्र ताब्यात घेण्यात येते याची पूर्ण खात्री झाल्यास वर सांगितल्याप्रमाणे मतदान यंत्र बंद करायला हवे. फक्त मतदान केंद्र ताब्यात घेणार आहेत ह्या संशयाने अथवा कल्पनेने नव्हे. कारण एकदा नियंत्रण युनिटवरील बंद करण्याचे बटण दाबून नियंत्रण युनिट बंद केले म्हणजे मतदान युनिट पुढील मतनोंदणी करु शकणार नाही आणि विनाकारण मतदान एका दिवसासाठी अथवा त्या मतदान केंदावर पुढील मतदान पूर्ण करण्यासाठी नवीन मतदान यंत्र उपलब्ध करेपर्यंत मतदान स्थगित करावे लागेल.

२.३ इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेशाच्या परिच्छेद २५ नुसार तुम्ही मतदान यंत्र बंद केल्यावर विनाविलंब सदर प्रकरण संपूर्ण घटनेसह निर्वाचन अधिकाऱ्यास कळवायला हवे. निवडणूक निर्णय अधिकारी अशा प्रसंगी, संपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन संपूर्ण घटना शक्यतो लवकर संपर्क साधता येईल अशा उपलब्ध संपर्क माध्यमातून राज्य निवडणूक आयोगासमोर ठेवील.

२.४ निर्वाचन आयोग, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून आलेला रिपोर्ट मिळाल्यानंतर, एकंदर परिस्थितीची पडताळणी केल्यानंतर:-

i) स्थगित झालेले मतदान ते जिथून स्थगित झाले होते तिथून नवीन मतदान यंत्र आणून आणि त्या क्षणापर्यंत झालेले मतदान खराब झालेले नाही याची खात्री केल्यानंतरच घेऊ शकते.

ii) जर मतदानांत खराबी निर्माण झाल्याची खात्री झाल्यास त्या मतदान केंद्रावरील मतदान निष्फळ झाल्याचे जाहीर करावे आणि त्या मतदान केंद्रावर नव्याने मतदान घेण्याचा आदेश द्यावा.

२.५ वर कथन केलेल्या परिच्छेद २.१ प्रमाणे मतदान यंत्र बंद पडल्याने मतदान स्थगित झाल्यास मतदान यंत्र आणि सर्वप्रकारची मतदान कागदपत्रे सीलबंद करुन सुरक्षित करावी जशी मतदान संपुष्टात आल्यानंतर केली जातात.

२.६ स्थगित करण्यात आलेले मतदान पूर्ण करण्यासाठी वर नमूद केलेली कार्यपध्दती काटेकोरपणे अवलंबिण्यात यावी.

## प्रकरण - २४

## मतदान बंद

### मतदान केंद्रावर मतदान बंद करतेवेळी उपस्थित असलेल्या व्यक्तीचे मतदान

१.१ मतदानास प्रारंभ काही कारणाने निश्चित करण्यात आलेल्या वेळेनंतर झालेला असला तरी निश्चित करण्यात आलेल्या वेळीच मतदान बंद करायला हवे. तरीसुध्दा निश्चित करण्यात आलेल्या मतदान बंदच्या वेळी जे मतदार, मतदान केंद्रावर हजर आहेत त्यांना मतदानाची परवानगी द्यायला हवी.

१.२ मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेअगोदर काही मिनिटे, त्या मतदान केंद्रापुरत्या मर्यादेत जे मतदार हजर आहेत, त्याना मतदानाची संधी देण्यात येईल असे जाहीर करायला हवे. तुम्ही तुमची संपूर्ण सही केलेली स्लीप त्या सर्व मतदारांना जे कोणी रांगेत आहेत त्यांना द्यायला हव्यात. त्या स्लीपवर रांगेत जेवढे मतदार आहेत त्यानुसार १,२,३ असे अनुक्रमांक लिहायला हवेत. मतदान बंद करण्यास निश्चित केलेली वेळ संपुष्टात आल्याबरोबर सदर रांगेत नवीन मतदार उभा राहणार नाही याची काळजी घेण्यास पोलिस अथवा तुमच्या स्टाफमधील एखाद्याला नेमावे. जर ही बाब प्रभावी व्हायची असेल तर रांगेत उभे असलेल्या मतदारांना रांगेच्या शेवटाहून स्लीप देत सुरवातीपर्यन्त यायला हवे.

### २. मतदान बंद

त्या मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या सर्व मतदारांनी मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी वर दिलेल्या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे मतदान केल्यानंतर तुम्ही मतदान बंद झाल्याचे औपचारिकपणे जाहीर करायला हवे आणि त्यानंतर कुठल्याही परिस्थितीत मतदान बंद करायला हवे आणि त्यानंतर कुठल्याही परिस्थितीत मतदान करायला कुणालाही परवानगी देऊ नये.

### ३. मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट बंद करणे

३.१ मतदान बंद करण्यासाठी शेवटच्या मतदाराने आपले मत नोंद केल्यानंतर मतदान यंत्र बंद करायला हवे, ज्यामुळे यंत्रात आणखी मते नोंद होऊ शकणार नाहीत. त्यासाठी तुम्ही नियंत्रण युनिटवरील "क्लोज" बटण दाबता, तेव्हा मतदान संपेपर्यन्त त्या यंत्रात जेवढया मतांची नोंद झाली त्यांची एकूण संख्या प्रदर्शनी भागावर दिसेल. यंत्रात नोंद झालेल्या एकूण मतांची संख्या व्हीएम-३, भाग १ मुद्दा ५ यात विनाविलंब लिहायला हवी.

३.२ सदर "क्लोज" बटण निकाल विभागाच्या खणात बाहेरील आवरणावर असलेल्या सफेद रंगाच्या झाकण्याखाली असते. हे झाकण ओढल्याबरोबर ते सापडते. "क्लोज" बटण दाबून मतदान बंद केल्यानंतर झाकण बंद करायला हवे.

३.३ एकदा "क्लोज" बटण दाबले म्हणजे मतदान यंत्र आणखी पुढील मते स्विकारणार नाही. त्यासाठी तुम्ही पूर्णपणे सावध राहून खात्री करायला हवी की मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळी एक सुध्दा मतदार मतदान हक्क बजावल्याशिवाय राहिलेला नाही. तेव्हा खात्री झाल्यावरच सदर "क्लोज" बटण दाबायला हवे.

३.४ तुम्ही लक्षात ठेवायला हवे की "क्लोज" बटण तेव्हाच चालेल जेव्हा नियंत्रण युनिटवरील, बिझी दिवा चालू नसेल. तो शेवटच्या मतदाराने आपले मत नोंद करुन सुध्दा समजा "मतदान" बटण चुकून दाबले गेले अथवा अशा शेवटच्या मतदाराने त्याच्यासाठी "मतदान" बटण दाबल्यानंतर ही मतनोंदणी करण्यास नकार दिला आणि बिझी दिवा चालूच राहिला तेव्हा नियंत्रण युनिटच्या मागच्या कप्प्यात असलेला "पॉवर" बटण बंद करुन आणि मतदान युनिट, नियंत्रण युनिटपासून वेगळे करुन तो बिझी दिवा बंद करता येतो. मतदान युनिट नियंत्रण युनिटपासून वेगळे केल्यानंतर पॉवर बटण परत ऑन म्हणजे चालू करावे. बिझी दिवा आता बंद होईल आणि "क्लोज" बटण चालायला लागेल.

## प्रकरण - २५

## नोंद झालेल्या मतांचा हिशोब

### १. नोंद झालेल्या मतांचा हिशोब तयार करणे

१.१ मतदान बंद झाल्यानंतर तुम्हाला इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेश क्रमांक -रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५, दि. ०७ जानेवारी, २००५ च्या नियम २१ खाली मतदान यंत्रात नोंद झालेल्या मतांचा हिशोब तयार करावा लागेल. सदर हिशोब तुम्ही नमुना व्हीएम-३ च्या भाग १ मध्ये करायला हवा.

१.२ ह्या आधीच्या प्रकरणात स्पष्ट केल्याप्रमाणे मतदान बंद झालेल्या वेळी मतदान यंत्रात नोंद झालेल्या एकूण मतांची "क्लोज" बटण दाबून खात्री करुन घ्यायला हवी. जर आवश्यकता भासल्यास तेच बटण हवी असलेली माहिती मिळविण्यासाठी परत दाबता येते.

१.३ मतदान यंत्रात नोंद झालेली मतांची संख्या आणि मतदार नोंदवहीवर कॉलम (१) (नमुना व्हीएम-१ ) यात नोंद झालेल्या मतदारांची संख्या, वजा ज्यांनी मतदान करण्यास नकार दिला (त्यात नोंदवहीवर असलेल्या शेरा कॉलमप्रमाणे) त्यांची संख्या, तसेच तुम्ही मतदान गुप्तता न पाळल्या कारणाने ज्यांना मतदान करायला परवानगी दिली नाही (याच नोंदवही वरील शेरा कॉलम प्रमाणे ) त्यांची संख्या वजा करुन त्यांची तुलना होते का हे पहायला तुम्ही विसरु नये.

### २. नोंद झालेल्या मतांच्या हिशोबाची प्रमाणित प्रत मतदान प्रतिनिधींना देणे

२.१ उपरोक्त आदेशाच्या नियम २१ खाली, मतदान बंद होते वेळी जे मतदान प्रतिनिधी उपस्थित होते त्या प्रत्येकास त्यांच्याकडून पावती घेतल्यानंतर तुम्ही नमुना व्हीएम-३ वर तयार केलेल्या, नोंद झालेल्या मतांच्या हिशोबाची प्रमाणित प्रत द्यायला हवी. हिशोबाच्या प्रती प्रत्येक मतदान प्रतिनिधीस त्यानी मागणी केली नसली तरीसुध्दा त्याना द्यायला हवी.

२.२ आवश्यक त्या संख्येने तुम्हाला नोंद झालेल्या मतांच्या हिशोबाच्या प्रती तयार करणे शक्य व्हावे म्हणून तुम्हाला नमुना व्हीएम-३ च्या छापील प्रती, उमेदवारांच्या संख्येपेक्षा एक दोन अधिकच मूळ हिशोबासाठी देण्यात येतील. जर शक्य असल्यास तुम्ही मूळ हिशोब लिहिताना आवश्यक त्या प्रती तयार करण्यासाठी कार्बन पेपरची मदत घेतल्यास मतदान प्रतिनिधींना दिलेल्या प्रती आणि मूळ प्रत यात सर्व प्रकारचे साम्य राहिल.

### ३. मतदान बंद झाल्यानंतर करावयाचे घोषणापत्र

३.१ नोंद झालेल्या मतांच्या हिशोबाच्या प्रती नियम २१ प्रमाणे तुमच्याकडून सर्व मतदान प्रतिनिधींना मिळालेल्या आहेत याची खात्री करुन घेतल्यानंतर **जोडपत्र-७** मधील घोषणापत्र मतदान बंद झाल्यानंतर तुम्ही पूर्ण करणे आवश्यक आहे.

## प्रकरण - २६

## मतदान बंद झाल्यावर मतदान यंत्र सील बंद

१.१ मतदान समाप्त झाल्यानंतर आणि मतदान यंत्रात नोंद झालेल्या मतांचा हिशोब नमुना व्हीएम-३ मध्ये तयार करुन उपस्थित मतदान प्रतिनिधींना त्याच्या प्रती दिल्यानंतर मतदान यंत्र मतमोजणी /संग्रह केंद्रावर नेण्यासाठी सीलबंद करायला हवे.

१.२ मतदान यंत्र सीलबंद आणि सुरक्षित करण्यासाठी प्रथम मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट वेगळी करायला हवी आणि नियंत्रण युनिटमधील पॉवर बटण ऑफ करायला हवे. मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट त्यांच्या आपापल्या पेटीत परत ठेवायला हवे.

१.३ प्रत्येक पेटी दोनही टोकावर तिथे ठेवण्यात आलेल्या दोन छिद्रात दोरा घालून पुरविण्यात आलेले ॲड्रेस टॅग तेथे लावण्यात यावेत व मतदान केंद्राध्यक्षांनी तेथे सही करुन आपली मोहर लावावी. उमेदवार अथवा त्याच्या हजर असलेल्या मतदान प्रतिनिधीची इच्छा असेल तर त्यांचीही सही/मोहर लावण्यास परवानगी द्यावी.

१.४ मतदान युनिट व नियंत्रण युनिटवरील लेबलचा तपशिल प्रकरण १ च्या परिच्छेद ७ मध्ये सांगितल्याप्रमाणे असायला हवा. उमेदवार अथवा त्यांच्या हजर असलेल्या मतदान प्रतिनिधीची इच्छा असेल तर त्यांचीही मोहर लावण्यास परवानगी द्यावी.

१.५ उमेदवार/मतदान प्रतिनिधी ज्यानी आपली मोहर मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट यांच्या पेटीवर लावलेली आहे त्यांची नावे तुम्ही घोषणापत्रावर नोंद करायला हवी. हे घोषणापत्र तुम्ही (जोडपत्र-८ प्रमाणे) मतदान बंद होतेवेळी करायला हवे.

## प्रकरण - २७

## निवडणूक कागदपत्रे सीलबंद करणे

### १. निवडणूक कागदपत्रे लिफाफ्यात सीलबंद करणे

१.१ मतदान बंद झाल्यानंतर, मतदानाशी संबंधित सर्व निवडणूक कागदपत्रे महानगरपालिका निवडणूक नियम, १९४९ च्या नियम ३० अन्वये विहित केल्यानुसार निरनिराळया लिफाफ्यात आवश्यकते प्रमाणे घालून मोहरबंद करायला हवी. याव्यतिरिक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याबाबतचे आदेश क्रमांक -रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५, दि.०७ जानेवारी, २००५ च्या परिच्छेद २३ मध्ये विहित केल्यानुसार निरनिराळी पाकीटे सीलबंद करणे आवश्यक आहे.

१.२ मतदान यंत्रासोबत स्विकार केंद्रावर खालील बाबी स्वतंत्रपणे सुपूर्द कराव्यात :-

(i) मतदान यंत्र (कंट्रोल युनिट आणि बॅलेट युनिट)
(ii) नोंद झालेल्या मतांचा हिशोब आणि पेपर सील हिशोब (नमुना-व्हीम-३)
(iii) मतदान केंद्राध्यक्षांची घोषणापत्रे आणि
(iv) मतदान केंद्राध्यक्षाची डायरी

१.३ अशाप्रकारे सीलबंद केलेले सर्व लिफाफे, फक्त ज्यात (i) नोंद झालेल्या मतांचा हिशोब आणि कागदी मोहर (नमुना व्हीएम-३) (ii) मतदान केंद्राध्यक्षाने मतदानाच्या आरंभास, मतदान सुरु असताना आणि मतदान बंद झाल्यावर (जोडपत्र - ६ ते ८) केलेली घोषणापत्रे आणि (iii) मतदान केंद्राध्यक्षाची डायरी वगळून उर्वरित वस्तू परिच्छेद ३ ते ६ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे चार मोठया लिफाफ्यात घालून निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाठवावे.

२. **तुम्ही मतदान केंद्रावर उपस्थित असलेल्या प्रत्येक उमेदवारास अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस अथवा त्याच्या मतदान प्रतिनिधीस खालील कागदपत्रे अंतर्भूत असलेले लिफाफे आणि पाकिटे यावर आपापल्या मोहोरा लावण्यास अनुमती द्यावी.**

i) मतदान यादीची चिन्हांकीत प्रत
ii) मतदार नोंदवही
iii) मतदार चिठ्ठी
iv) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका आणि नमुना -व्हिएम-२ मधील प्रदत्त मतपत्रिकांची यादी
v) न वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका
vi) आक्षेपित मतांची यादी
vii) निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने मोहोरबंद पाकिटात ठेवण्याचा निदेश दिला आहे अशी अन्य कोणतीही कागदपत्रे.

३. पहिले पाकीट-सांविधानिक लिफाफे (Statutory Covers)

पहिला लिफाफा वैधानिक पाकीटे (Statutory Covers) हा असून, तुम्ही प्रत्येक उमेदवारास अथवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीस अथवा त्याच्या मतदान प्रतिनिधीस जे कोणी मतदान केंद्रावर उपस्थित असतात त्यांना खालील कागदपत्रे असलेले लिफाफे आणि पाकिटांवर त्यांची मोहोर लावण्यास अनुमती दयावी.

i) मतदान यादीची चिन्हांकित प्रत असलेला मोहोरबंद लिफाफा
ii) मतदार नोंदवही असलेला मोहोरबंद लिफाफा
iii) मतदार स्लीप असलेला मोहोरबंद लिफाफा
iv) वापरलेल्या प्रदत्त मतपत्रिका आणि नमुना-व्हीएम-२ मध्ये प्रदत्त मतांची यादी
v) वापर न करण्यात आलेल्या प्रदत्त मतपत्रिका असलेला मोहोरबंद लिफाफा

जर वर उल्लेख केलेले कुठलेही साहित्य पाकिटात घालण्यास उपलब्ध नसले तरीसुध्दा एका चिटोऱ्यावर निवेदन अथवा नोंद काही नाही असे लिहून पाकिटात घालावे आणि अशी पाच पाकिटे तयार करावीत, म्हणजे ती स्वीकारताना काहीच स्पष्टीकरणे करण्याची आवश्यकता भासणार नाही.

४. दुसरे पाकीट-असांविधानिक लिफाफे (Non-Statutory Covers)

दुसरा लिफाफा खाली दिलेले साहित्य असलेले आणि त्यावर "वैधानिक नसलेली पाकीटे" असे स्पष्ट लिहायला हवे.

i) मतदार यादी अथवा याद्या (चिन्हांकित सोडून) असलेले पाकीट
ii) मतदान प्रतिनिधीचे नेमणूक पत्र असलेले पाकीट
iii) टपाली मतपत्रिका आदेशानुसार नमुना पीबी-३ मधील निवडणूक कार्य प्रमाणपत्र असलेले पाकीट
iv) आव्हानित मतांची यादी असलेले सीलबंद पाकीट
v) नगर परिषद निवडणूक नियम ३४ नुसार नमुना ११ मधील आव्हानित मतांची यादी असलेले सीलबंद पाकीट
v) अंध आणि अपंग मतदारांची यादी आणि त्यांच्या सहकाऱ्याचे घोषणापत्र असलेले पाकीट
vi) जर आव्हान मते असतील तर पावती पुस्तक आणि रोकड असलेले पाकीट
vii) वापरात न आलेली आणि खराब झालेले कागदी मोहर असलेले पाकीट
viii) वापरात न आलेल्या मतदान स्लीप्स असलेले पाकीट
ix) वापरात न आलेली आणि खराब झालेले स्पेशल टॅग असलेले पाकीट, आणि
x) वापरात न आलेली आणि खराब झालेली A, B, C, D पट्टीसील असलेले पाकीट .

५. तिसरे पाकीट- निदेश/नियमपुस्तिका व इतर वस्तू असलेले पाकीट

i) मतदान केंद्राध्यक्षासाठी माहिती पुस्तिका
ii) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची नियमावली

iii) पक्क्या शाईचे मार्कर पेन

iv) शाईचे पॅड

v) मतदान केंद्राध्यक्षाचे धातुचे सील

vi) दुबार मतपत्रिकेवर लावण्यासाठी चक्राकार बाणाकृती रबरी स्टॅम्प

vi) मतदान शाईची शिसी उभी ठेवण्यासाठी कप

### ६. चौथे पाकीट- इतर उरलेले साहित्य असलेले पाकीट

जर आणखी कसले साहित्य असेल तर ते सर्व चौथ्या लिफाफ्यात बंद करावे.

६.१ सांविधानिक अथवा वैधानिक पाकीटे म्हणून चिन्हांकित केलेली प्रत्येक पाच लहान पाकिटे, पहिल्या लिफाफ्यात ज्यावर वैधानिक पाकीटे असे लिहिलेले आहे त्यात घालून मोहरबंद करायला हवे.

६.२ इतर लहान पाकिटे ज्यात निरनिराळी वैधानिक नसलेली कागदपत्रे निवडणुकीस आवश्यक असलेले इतर साहित्य दुसऱ्या लिफाफ्यात ज्यावर वैधानिक नसलेली पाकीटे लिहिलेले आहे ती वेगळी तयार करावी. परंतु मोहरबंद करायची आवश्यकता नाही. यामुळे वेळेचा अपव्यय होत नाही. ही सर्व मोहरबंद न केलेली आणि ज्यात आव्हानित मतांची यादी आहे ते सीलबंद पाकीट त्या त्या मोठया लिफाफ्यात ठेवावे आणि मतदान केंद्राध्यक्षाने निशाणी केलेला चेक मेमोसुध्दा त्यात ठेवावा. हे तीन लिफाफे मोहरबंद करण्याची आवश्यकता नाही. परंतु पीन अथवा दोरीने व्यवस्थित बांधावी, ज्यामुळे साहित्य स्विकार करण्यात येणाऱ्या केंद्रावर त्या वस्तू तपासता येतील.

६.३ पहिला लिफाफा ज्यावर वैधानिक पाकीट असे लिहिलेले आहे ते स्विकार केंद्रावर आतील बाबी तपासून झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षाने मोहरबंद करावे.

## प्रकरण - २८

## डायरी तयार करणे आणि संग्रह केंद्रात मतदान यंत्रे आणि निवडणूक कागदपत्रे पोहोचविणे

### १. डायरी तयार करणे

१.१ मतदान केंद्रात मतदान घेण्याचे काम चालू असताना त्या कामाची नोंद करण्यासाठी डायरीचा वापर करायला हवा. सदर डायरीचा नमुना **(जोडपत्र-११)** मध्ये छापलेला आहे. तरीसुध्दा आवश्यक त्या डायरीचा नमुना तुम्हाला दिला जाईल ज्याचा वापर तुम्ही एकट्यानेच करायला हवा.

१.२ जेव्हा जेव्हा घटना घडत असतात तेव्हा त्यासंबंधीच्या घटनांची नोंद तुम्ही करत जायला हवी. त्यात तुम्ही सर्व महत्वाच्या घटनांची नोंद करायला हवी.

१.३ बहुतेक प्रकरणात असे दिसून आलेले आहे की मतदान केंद्राध्यक्ष संबंधित कॉलममध्ये वेळोवेळी घडलेली घटना नोंद न करता ठेवतात आणि मतदान संपल्यांनतर सगळया नोंदी भरुन डायरी पूर्ण करतात सदर प्रकरण हरकत घेण्यासारखी घटना आहे. तुम्ही ध्यानात ठेवायला हवे की मतदानाचे काम चालत असताना प्रत्येक मुद्दयाची नोंद डायरीवर करत असताना तुम्ही थोडे जरी गाफील राहिलात तरी त्याची आयोग गंभीर दखल घेईल.

१.४ बॅलेट युनिटवरील END बटणाचा वापर कसा करावा याबाबत राज्य निवडणूक आयोगाने दिनांक २९ डिसेंबर, २०२२ च्या आदेशान्वये **(जोडपत्र-१९)** सुधारित सूचना जारी केल्या आहेत. मतदाराने आपले मतदान पूर्ण न केल्यास अथवा मतदान कक्षात गेल्यानंतर मतदान पूर्ण करण्याची त्याची इच्छा नसल्यास कोणती कार्यवाही करावी हे सविस्तर नमूद केले आहे. त्यानुसार जर मतदान केंद्राध्यक्षांनी END बटण दाबण्याची वेळ आली तर अशा घटना देखील त्यांनी मतदान केंद्राध्यक्षांच्या डायरीमध्ये नोंद करणे आवश्यक आहे.

### २. मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रांचे निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे वितरण

२.१ प्रकरण-२६ आणि २७ यात सांगितल्याप्रमाणे मतदान बंद झाल्यावर तुम्ही मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रे सीलबंद करुन सुरक्षित केल्यानंतर ते सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने सांगितलेल्या ठिकाणी आणि निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने केलेल्या व्यवस्थेनुसार वितरीत करायला हवे अथवा वितरणाची व्यवस्था करायला हवी.

२.२ मतदान यंत्र आणि निवडणूक कागदपत्रे विनाविलंब संग्रह केंद्रावर वितरित करायला हवे अथवा वितरणाची व्यवस्था करायला हवी. यात जर थोडासुध्दा उशिर झाला तर त्याची

पाहणी आयोगाकडून केली जाईल आणि जो कोणी त्याला जबाबदार आहे त्यावर शिस्तभंगाची कडक कारवाई होऊ शकते.

३. **संग्रह केंद्रावर ताबा असलेल्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन, तुम्हाला खालील निवडणूक नोंदी आणि साहित्य यांच्या संबंधी बारा बाबी करायला हव्यात आणि त्याची पावती घ्यायला हवी.**

i) मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट आणि मतदान युनिट त्यांच्या मोहरबंद पेटयांसह

ii) नोंद केलेल्या मतांचा हिशोब आणि कागदी मोहर यांचा हिशोब असलेला लिफाफा

iii) मतदान केंद्राध्यक्षाची घोषणापत्रे असलेले पाकीट

iii) मतदान केंद्राध्यक्षाची डायरी असलेले पाकीट

iv) ज्यावर वैधानिक पाकीटे (पाच पाकिटे असलेले) असे लिहिलेले आहे ते प्रथम पाकीट

v) ज्यावर वैधानिक नसलेली पाकीटे (दहा पाकिटे असलेले ) असे लिहिलेले आहे ते दुसरे पाकीट

vi) तिसरे पाकीट ज्यात निवडणूक साहित्याचे सात घटक आहेत

vii) मतदान खोलीसाठी आवश्यक बाबी

viii) कंदील, जर देण्यात आलेला असेल तर

xi) कचरा पेटी

xii) प्लास्टीक पिशवी/गोणपाट निवडणूक साहित्य नेण्यासाठी

xii) इतर सर्व बाबी असलेले चौथे पाकीट (असल्यास) वर सांगितल्याप्रमाणे सगळया गोष्टी संग्रह केंद्रावर तुमच्या उपस्थितीत वितरण/स्विकार करणारा अधिकारी स्विकार करील आणि तुम्हाला मुक्त करील.

## प्रकरण - २९

### मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी यांच्यासाठी थोडक्यात मार्गदर्शन

१.१ तुमच्या मतदान गटासोबत जवळचे नाते ठेवा.

१.२ जर सांघिक कार्य नसेल तर तुमचे काम कठीण होईल.

२.१ खात्री करुन घ्या की -

अ) तुम्हाला मतदान यंत्राचे नियंत्रण युनिट आणि आवश्यक त्या संख्येने मतदान यंत्रे दिलेली आहेत आणि ती तुमच्याच मतदान केंद्रात वापरण्याची आहेत.

ब) आवश्यक त्या मतपत्रिका प्रत्येक बॅलट युनिटवर व्यवस्थित बसविलेल्या आहेत.

क) मतदान युनिटवरील 'स्लाईड स्वीच' आवश्यक त्या पध्दतीने बसवण्यात आलेला आहे.

ड) नियंत्रण युनिट वरील 'उमेदवार ठरविणे विभाग' आणि प्रत्येक मतदान युनिट नीट मोहरबंद आहे आणि प्रत्येकावर पत्त्याचा टॅग नीट लावलेला आहे.

२.२ मतदानास लागणाऱ्या सर्व बाबी तुम्हाला दिलेल्या आहेत याची खात्री करा.

२.३ विशेषत: मतदार नोंदवही, मतदार स्लीप, दुबार मतांसाठी आवश्यक असलेल्या मतपत्रिका, दुबार मतांवर खूण करण्यासाठी आवश्यक असलेला बाणाकृती चक्राकार रबरी स्टॅम्प, कागदी मोहर, सीलबंद करण्यासाठी लाख, मतदान शाई या सारख्या बाबी बारकाईने तपासणी कराव्यात.

२.४ चिन्हांकित मतदार यादीची इतर यादीशी तुलना करुन पाहा आाणि सगळया तंतोतंत आहेत की नाही हे पहा. फक्त चिन्हांकित केलेल्या मतदार यादीवर 'पीबी' आणि 'इडीसी' ही खूण सोडून दुसरी कोणतीही खूण नरोल.

२.५ खात्री करा की-

१) मतदार यादीतील वगळलेली नावे आणि पुरवणीत केलेली सुधारणा नीट आहे.

२) मतदार यादीच्या चालू प्रतीवरील पानाचे अनुक्रमांक नीट आहेत.

३) मतदाराचे अनुक्रमांक सुधारलेले नाहीत आणि त्या ठिकाणी दुसरे काही अंतर्भूत केलेले नाही.

३.१ मतदान केंद्रावर मतदानास निश्चित केलेल्या वेळे अगोदर ७५ मिनिटे आधी पोहोचा.

३.२ मतदान केंद्राची आखणी व्यावहारिकदृष्टया करा.

३.३ मतदान केंद्रावर मतदारांना आत बाहेर जाण्यास वेगळया दारांची व्यवस्था असल्याची खात्री करा.

४. मतदानाच्या दिवशी तुमच्या मतदान केंद्राबाहेर मतदान क्षेत्र दाखविणारा आणि निवडणुकीस उभे राहिलेल्या उमेदवारांची नावे असलेली नोंद प्रदर्शित करा.

५. जर एखादा मतदान अधिकारी गैरहजर असेल तर स्थानिक मतदान अधिकारी नेमा.

६. मतदानास आरंभ करण्यास ठरविलेल्या वेळे अगोदर निदान एक तास अगोदर मतदान यंत्र तयारीत ठेवा.

७.१ मतदान युनिट आणि नियंत्रण युनिट एकमेकांना जोडा.

७.२ नियंत्रण युनिटच्या मागील कप्प्यातील पॉवर स्वीच 'ऑन' करा.

७.३ नियंत्रण युनिटामागील कप्पा एका तारेने बंदा करा आणि तारेला वेटोळे घाला.

७.४ मतदान यंत्र 'क्लिअर' आहे आणि त्यात या अगोदर मत नोंदणी झालेली नाही याची उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना खात्री करुन द्या.

७.५ प्रत्येक उमेदवारासाठी काही मतांची नोंदणी करायला प्रतिनिधींना सांगा आणि प्रतिरुप मतदान घ्या.

७.६ प्रतिरुप मतदान झाल्यानंतर सदर मतदानाचा निकाल उपस्थितांना दाखवा आणि नंतर यंत्र क्लिअर करा.

८.१ नियंत्रण युनिटच्या निकाल विभागाच्या आतील कप्प्यात असलेल्या चौकटीवर कागदी मोहर बसवा.

८.२ निकाल विभागाच्या आतील कप्प्याचे दार अशा रितीने बंद करा की कागदी मोहरेची दोन उघडी टोके आतील कप्प्याच्या बाजूने बाहेर दिसतील.

८.३ कागदी मोहरेच्या सफेद भागावर छापील अनुक्रमांकाखाली तुम्ही तुमची संपूर्ण सही करा.

८.४ उपस्थित असलेल्या इच्छुक मतदान प्रतिनिधींनाही त्यावर सही करायला सांगून त्यांना कागदी मोहरेचा अनुक्रमांक नोंद करण्यास सांगावे.

८.५ नियंत्रण युनिट मधील निकाल विभागाच्या आतील कप्पा स्पेशल टॅग वापरुन मोहोरबंद करावा. (असे करताना क्लोज बटनाला धक्का लागणार नाही, याची खबरदारी घ्यावी.)

९.१ नियंत्रण युनिटातील निकाल विभागाचे बाहेरील आवरण बंद करुन मोहोरबंद करावे. त्यावर तपशीलाचा कागद घट्टपणे चिकटवावा.

९.२ नियंत्रण युनिटमधील निकाल विभागाच्या आतील आवरणावर त्यांची मोहोर लावण्यास मतदान प्रतिनिधींना अनुमती द्यावी.

१०.१ मतदान यंत्र मतदान कक्षात ठेवा. नियंत्रण युनिट तुमच्या टेबलवर ठेवा.

१०.२ त्यांना एकमेकांना जोडण्यात येणारी केबल अशा रितीने जोडा की मतदार मतदान कक्षात आत बाहेर होत असताना त्यांच्या पायाखाली ती येणार नाही.

११.१ उपस्थित असलेल्या मतदान प्रतिनिधींना चिन्हांकित मतदार यादी दाखवून त्यावर पीबी आणि इडीसी या शिवाय इतर नोंद नसल्याची खात्री करु द्या.

११.२ मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१) यावरही कुठलीही नोंद नाही हे दाखवा.

१२. मतदानाच्या आरंभास घोषणापत्रावर सही करा व ते वाचून दाखवा.

१३. निश्चित केलेल्या वेळेवरच मतदानास प्रारंभ करा.

१४. उमेदवाराच्या एकाच मतदान प्रतिनिधीस कुठल्याही वेळी मतदान केंद्रात अनुमती द्या.

१५. मुक्त आणि सुरळीत मतदानाची खात्री करा.

१६. राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक निरीक्षक नियुक्त केले असल्यास त्यांचेशी आपलेपणा राखा आणि त्यांना आवश्यक माहिती देऊन सहकार्य करा.

१७. मतदान केंद्राच्या शंभर मीटरांच्या आत प्रचार करणे गुन्हा आहे.

१८. मतदान केंद्रात धुम्रपान वर्ज्य आहे.

१९.१ जिथे तीन मतदान अधिकारी आहेत त्या मतदान अधिकाऱ्यांचे कर्तव्य -

पहिल्या मतदान अधिकाऱ्याजवळ मतदार यादी असेल आणि तो मतदारांची ओळख छाननी करील. त्या यादीवरील छपाई आणि कारकुनी चुका दुर्लक्ष करील.

दुसरा मतदान अधिकारी मतदान शाई आणि मतदार नोंदवही घेऊन बसेल. तो मतदारांच्या डाव्या हाताच्या तर्जनीस मतदान शाईची खूण करील आणि मतदार नोंदवहीच्या कॉलम (२) मध्ये मतदाराचा अनुक्रमांक यांची नोंद करुन त्यापुढे मतदाराची सही अथवा अंगठ्याचा ठसा घेईल. तो मतदार स्लीप तयार करुन मतदारांना देईल.

तिसऱ्या अधिकाऱ्याच्या ताब्यात नियंत्रण युनिट असेल तो मतदाराकडून मतदार स्लीप घेईल. डाव्या हाताच्या तर्जनीवरील मतदान शाईची तपासणी करील आणि त्याला नियंत्रण युनिटवरील 'मतदान' बटण दाबून मत नोंदणी करण्यास अनुमती देईल.

१९.२ मतदाराने मतदार नोंदवहीत ज्या अनुक्रमांकाने नोंदणी केलेली आहे त्याच अनुक्रमाने मत नोंदणी करण्यास त्यांना अनुमती द्या. त्यांनी मतदार नोंदवहीवर सही/अंगठा नोंदविल्याशिवाय मत नोंदणी करण्यास अनुमती देऊ नये.

१९.३ राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का.१२, दिनांक २९ डिसेंबर, २०२२ च्या **(जोडपत्र-१९)** आदेशान्वये मतदान यंत्रावरील END बटणाचा वापर कशा प्रकारे करण्यात यावा याबाबत सविस्तर आदेश काढलेले आहेत. त्यानुसार जे मतदार NOTA बटणाचा वापर करण्यास नकार देतील अशा मतदारांना END बटणाचा वापर करून मतदान प्रक्रिया पूर्ण करता येईल. जर मतदारांनी NOTA व END या दोन्ही बटनांचा वापर करण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांना सदर आदेशात दिलेली कार्यपध्दती वापरून END बटण दाबून, मतदान प्रक्रिया पुढे नेता येईल.

२०.१ मतदाराच्या ओळखीसंबंधी आव्हान देऊ इच्छिणाऱ्यास त्यांच्याकडून प्रत्येक आव्हानामागे विस रुपये फी घेतल्याशिवाय प्रकरण हाती घेऊ नका. सदर आव्हान मतांची नोंद मतदान केंद्राध्यक्षांनी आव्हानित मतांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिका नियमातील नमुना-१४ (नियम क्रमांक-४३) नुसार

२१. अंध आणि अपंग मतदारांच्या सहकाऱ्यांकडून घोषणापत्र घ्या आणि अशा मतदारांची नोंद व्हीएम-५ मध्ये ठेवा.

२२. तुम्हाला एखादा मतदार वयापेक्षा खूपच लहान भासला म्हणजे १८ वर्षापेक्षा कमी वयाचा दिसला तरी त्याची ओळख समाधानकारक दिसून आली तर त्याच्या पात्रतेविषयी मुद्दा उपस्थित करु नका.

२३.१ मतदार नोंदवहीमध्ये तपशील लिहून घेतल्यानंतर जरी एखाद्या मतदारास मतदान करु नये असे वाटले तर त्याच्यावर सक्ती अथवा जबरदस्ती करु नये. त्याबाबत त्यांच्या नावासमोर असलेल्या रकान्यात शेरा लिहा.

२३.२ जर एखाद्याने मतदान करण्यास नकार दिल्यास मतदार नोंदवही (नमुना व्हीएम-१ च्या कॉलम १) मध्ये कुठल्याही अनुक्रमात बदल करु नये.

२४.१ जर एखाद्या मतदाराच्या नावाने त्याच्या अगोदर कोणी मतदान करुन गेल्यास आणि सदर मतदाराने आपल्या दिलेल्या ओळखीने तुमचे समाधान होत असल्यास त्याला प्रदत्त (दुबार) मतपत्रिकेवर मतदान करण्यास अनुमती द्यावी. मतदान यंत्रावर मतदान करण्याची परवानगी देऊ नये.

२४.२ ज्यांना दुबार मतपत्रिका दिलेली आहे त्यांची नोंद नमुना व्हीएम-२ मध्ये ठेवा. प्रदत्त मतपत्रिका आणि त्यांची यादी नमुना व्हीएम-२ मध्ये नोंद करुन वेगळया लिफाफ्यात ठेवा.

२५.१ तुम्ही ताकीद देऊनसुध्दा निश्चित केलेली मतदान गुप्तता पाळण्यास एखादा मतदार तयार झाला नाही तर त्याला मतदानाची अनुमती देऊ नये.

२५.२ अशा मतदारांची नोंद मतदार नोंदवहीमध्ये जिथे केलेली आहे त्या नोंदीसमोरील रकान्यात त्यासंबंधी शेरा लिहा. अशा मतदारासाठी त्या नोंदवहीमधील कॉलम १ मध्ये अनुक्रमांकात बदल करु नये.

२६. मतदान बंद करण्यासाठी निश्चित केलेला वेळ संपल्यानंतर स्लीप दिलेले मतदार रांगेत असले तर त्यांचे मतदान करुन संपेपर्यंत ते चालू ठेवावे.

२७. नियंत्रण युनिटवरील "क्लोज" बटण दाबून मतदान यंत्र बंद करा. ते दाबल्यानंतर "क्लोज" बटणवरील निळे आवरण बसवा.

२८.१ मतनोंदणीचा हिशोब नमुना व्हीएम-३ मध्ये तयार करा.

२८.२ नोंद झालेल्या मतांच्या हिशोबांच्या प्रमाणित प्रती मतदान प्रतिनिधींना द्या. त्यासंबंधी निश्चित केलेल्या घोषणापत्राच्या नमुन्यावर घोषणापत्र तयार करा.

२९.१ मतदान बंद झाल्यानंतर नियंत्रण युनिटच्या मागील बाजूस असलेले पॉवर बटण बंद करा व मतदान युनिट व नियंत्रण युनिट वेगवेगळी करा.

२९.२ नियंत्रण युनिट आणि मतदान युनिट त्यांच्या पेटीत ठेवा.

३०.१ पेट्या दोन्ही टोकावर मोहरबंद करा. प्रत्येक पेटीवर तपशीलाचा टॅग लावा.

३०.२ सर्व मतदान प्रतिनिधींनी आपली मोहर सदर पेट्यांवर लावायला हवी.

३१.१ वेगवेगळया पाकिटांतून सर्व निवडणूक कागदपत्रे आणि साहित्य मोहरबंद करा.

३१.२ तुमचा मोहर (१) चिन्हांकित मतदार यादी प्रत (२) मतदार नोंदवही (३) मतदार स्लीप (४) वापरलेल्या दुबार मतपत्रिका आणि नमुना व्हीएम-२ वरील यादी आणि (५) वापरण्यात न आलेल्या दुबार मतपत्रिका असलेल्या लिफाफ्यावर लावा.

३१.३ सदर लिफाफ्यावर सर्व मतदान प्रतिनिधींना त्यांची मोहर लावण्यास सांगा.

३२.१ निवडणुकीसंबंधीची सर्व कागदपत्रे आणि साहित्य चार मोठया लिफाफ्यात ठेवा.

३२.२ पहिल्या मोहरबंद पाकिटात ज्यावर 'वैधानीक पाकीटे' असे स्पष्ट लिहिलेले आहे त्यात पाच मोहरबंद पाकिटे असायला हवी. तसेच दुसऱ्या पाकिटात असांविधानिक पाकिटे ठेवणे आवश्यक आहे.

३२.३ तिसऱ्या लिफाफ्यात सात नमुने असायला हवेत.

३२.४ इतर सर्व नमुने चौथ्या लिफाफ्यात बंद करायला हवे.

३३. वेगळ्या लिफाफ्यात (१) नोंद झालेल्या मतांचा हिशोब (नमुना व्हीएम-३), (२) मतदानास आरंभ होण्या अगोदर आणि मतदान बंद झाल्यानंतर तुम्ही केलेली घोषणापत्रे, आणि (३) मतदान केंद्राध्यक्षाची डायरी ठेवायला हवी ती वर उल्लेख केलेल्या चार लिफाफ्यांपैकी कुठल्याच लिफाफ्यात ठेवू नका.

३४. मतदान झाल्यानंतर मतदान यंत्र विनाविलंब नियम २४ मध्ये विहित केल्यानुसार तसेच नियम २३ मध्ये विहित केल्यानुसार आवश्यक ते लिफाफे संग्रह केंद्रावर पोचवा.

३५. मतदान केंद्रावर दंगल अथवा हिंसाचार सुरु झाल्यास मतदान तहकूब करा. संपूर्ण अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास द्या.

३६. जर मतदान केंद्र ताब्यात घेणे अथवा मतदान यंत्र अथवा मतदान नोंदवही, मतदार यादीची चिन्हांकित प्रत ह्यासारखे निवडणूक साहित्य अनधिकृतपणे तुमच्या ताब्यातून नेण्यात आले, खराब झाले अथवा त्यात हस्तक्षेप करण्यात आला तर मतदान बंद करा. संपूर्ण अहवाल निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास कळवा.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, जानेवारी ७, २००५/पौष १७, शके १९२६**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग एक-अ—मध्य उप विभाग

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,

मुंबई ४०० ०३२, दिनांक ७ जानेवारी २००५

**महानगरपालिका क्षेत्रात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करणेबाबतचे आदेश, २००५**

**महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करून मतदान करण्यासंदर्भातील सविस्तर कार्यपद्धती ठरवून देण्याबाबतचे आदेश**

**भारताचे संविधान.**

क्रमांक रानिआ/मनपा-२००४/प्र.क्र.१३/का-५.—ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के आणि २४३ झेडए मधील तरतुदीनुसार पंचायती व नगरपालिका यांच्या सर्व निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन आणि नियंत्रण राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २८, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ८अ, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ चे कलम १३ब मध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे करता येईल अशी तरतूद करण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची तरतूद महानगरपालिका अधिनियमाद्वारे करण्यात आलेली आहे. तथापि, त्यासंदर्भातील सविस्तर कार्यपद्धती ठरवून देण्याबाबत नियम अद्याप तयार करण्यात आलेले नाहीत आणि अशी सविस्तर कार्यपद्धती ठरवून देणे अत्यावश्यक झाले आहे;

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए अन्वये तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १८अ, (४), नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २) चे कलम ९ब (४), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९) चे कलम १४ (४) अन्वये यासंदर्भात प्राप्त झालेल्या सर्व अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. **संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.**—(१) या आदेशास " महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांचा वापर करण्याबाबतची सविस्तर कार्यपद्धती ठरवून देणारे आदेश " असे नांव राहील.

(२) या आदेशाची व्याप्ती महाराष्ट्र राज्यभर राहील आणि सदर आदेश सर्व महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी लागू राहतील.

(३) सदर आदेश **शासकीय राजपत्रात** छापल्याच्या तारखेपासून अंमलात येतील.

२. **व्याख्या आणि अर्थाविष्कार :—** या आदेशात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र " म्हणजे महानगरपालिका यांच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी मतपेटी व मतपत्रिका याऐवजी मत नोंदविण्यासाठी वापरले जाईल असे कोणतेही मशिन किंवा यंत्र जे इलेक्ट्रॉनिक अथवा अन्य पद्धतीने चालविले जाईल.

(२) " मतदार संघ " म्हणजे महानगरपालिका निवडणुकीतील प्रभाग व त्याअंतर्गत जागा क्रमांक.

(३) " निवडणूक " म्हणजे हे आदेश लागू असलेली निवडणूक अथवा पोट-निवडणूक.

(४) " टपाली मतपत्रिका आदेश-२००१ " म्हणजे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील दिनांक १६ जानेवारी २००१ चे आदेश.

३. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची रचना :—** प्रत्येक इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रास (यापुढे मतदान यंत्र असा उल्लेख केलेले) एक कंट्रोल युनिट आणि एक किंवा अनेक बॅलटिंग युनिट असतील ज्याची रचना राज्य निवडणूक आयोगाने मान्यता दिल्याप्रमाणे असेल.

४. **निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी मतदान यंत्राची तयारी करणे :—** (१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या प्रत्येक बॅलटिंग युनिटमध्ये राज्य निवडणूक आयोग विहित करील तो तपशील अशा भाषेमध्ये अथवा अशा भाषांमध्ये असेल.

(२) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या यादीमध्ये ज्या क्रमाने उमेदवारांची नांवे नमूद करण्यात येतील त्याच क्रमाने सदर नांवे बॅलटिंग युनिटवर नमूद करण्यात येतील.

(३) जेंव्हा दोन किंवा अधिक उमेदवारांची नांवे समान असतील तेंव्हा त्यामधील फरक स्पष्ट करण्यासाठी सदर उमेदवारांचा व्यवसाय अथवा पत्ता किंवा अन्य एखादी बाब त्यांच्या नांवासमोर नमूद केली जाईल.

(४) खालील तरतुदींच्या अधीन राहून निवडणूक निर्णय अधिकारी :—

(अ) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे व चिन्हे नमूद केलेली खूणचिठ्ठी (मतपत्रिका) बॅलटिंग युनिटमध्ये योग्य जागी घट्ट बसवील आणि स्वतःची सही करून सीलबंद करील. त्याशिवाय, उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी जे सीलवर सही करू इच्छितात त्यांच्या स्वाक्षऱ्या घेईल.

(ब) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या कंट्रोल युनिटमध्ये सेट करील आणि अशी संख्या निश्चित करावयाचा मशिनचा विभाग बंद करून तो सीलबंद करील व त्यावर स्वतःची स्वाक्षरी करील. त्याशिवाय, उपस्थित असलेले उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी जे सीलवर सही करू इच्छितात त्यांच्या स्वाक्षऱ्या घेईल.

५. **मतदान केंद्रातील व्यवस्था :—**(१) प्रत्येक मतदान केंद्राबाहेर खालील गोष्टी ठळकपणे दिसतील अशा रितीने लावण्यात येतील :—

(अ) संबंधित मतदान केंद्रांवर जे मतदार मतदान करण्यास पात्र आहेत त्या मतदान केंद्राच्या अंतर्गत येणारे क्षेत्र तसेच संबंधित क्षेत्रामध्ये एकापेक्षा जास्त मतदान केंद्रे असतील तर त्या मतदान केंद्रांवर जे मतदार मतदान करण्यास पात्र आहेत त्या क्षेत्राचा तपशील दर्शविणारी सूचना.

(ब) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी.

(२) प्रत्येक मतदान केंद्रात एक किंवा अधिक मतदान कक्ष ठेवण्यात येतील जेणेकरून, मतदार आपली मते कोणीही अन्य व्यक्ती पाहणार नाही, अशा रितीने नोंदवू शकतील.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रावर मतदान यंत्र आणि मतदार यादीच्या संबंधित भागाची प्रत आणि मतदानासाठी आवश्यक ते अन्य निवडणूक साहित्य पुरवील.

(४) वरील उप परिच्छेद क्रमांक (३) ला बाधा येणार नाही, अशा रितीने निवडणूक निर्णय अधिकारी राज्य निवडणूक आयोगाच्या पूर्वसंमतीने एकाच इमारतीत असलेल्या दोन किंवा अधिक मतदान केंद्रांसाठी एक मतदान यंत्र पुरवू शकेल.

६. **मतदान केंद्रात प्रवेश :—** बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक नियम, १९९० च्या नियम १२ च्या उपनियम ३ ड, मुंबई प्रांतिक महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम, १५(१), नागपूर शहर महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम,९(१) मधील तरतुदीनुसार मतदान केंद्राध्यक्ष/मतदान अधिकारी मतदान केंद्रात एकावेळी प्रवेश देण्यासाठी मतदारांची संख्या विनियमित करील. तसेच सदर नियमात नमूद केलेल्या व्यक्तींव्यतिरिक्त अन्य कोणालाही मतदान केंद्रात प्रवेश देणार नाही.

**७. मतदानासाठी मतदान यंत्र तयार करणे :—** (१) मतदान केंद्रात वापरण्यासाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट व बॅलटिंग युनिट अथवा युनिट्सवर खालील तपशील नमूद केलेली खूणचिठ्ठी लावलेली असेल :—

(अ) अनुक्रमांक आणि मतदार संघाचे नाव, असल्यास ;

(ब) अनुक्रमांक आणि मतदान केंद्राचे अथवा केंद्रांची नांवे/क्रमांक ;

(क) मतदान यंत्राचा अनुक्रमांक ; आणि

(ड) मतदानाची तारीख.

(२) मतदानास सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष मतदान प्रतिनिधी आणि इतर उपस्थित व्यक्ती यांना मतदान यंत्रामध्ये कोणत्याही मतदाराने आपले मत नोंदविलेले नाही व उपरोक्त परिच्छेद ४(४) मध्ये नमूद केलेली खूणचिठ्ठी मतदान यंत्रावर लावलेली आहे हे दाखवील.

(३) मतदान यंत्राचे कंट्रोल युनिट सुरक्षित करण्यासाठी कागदी मोहोर (पेपर सील) वापरली जाईल, आणि मतदान केंद्राध्यक्ष आपली स्वतःची सही करील. तसेच उपस्थित मतदान प्रतिनिधी जे कागदी मोहरेवर सही करण्यास इच्छुक असतील त्यांच्याही सह्या घेईल.

(४) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये विहित केलेल्या जागी वरीलप्रमाणे सह्या केलेले कागदी मोहर घट्ट चिकटवील आणि ते सुरक्षित व मोहरबंद करील.

(५) कंट्रोल युनिट सुरक्षित करण्यासाठी वापरण्यात येणारे कागदी मोहर अशा रितीने घट्ट चिकटविण्यात येईल, जेणेकरून कागदी मोहर तोडल्याशिवाय ' रिझल्ट बटन ' दाबता येणार नाही.

(६) वरीलप्रमाणे बंद केलेले आणि सुरक्षित केलेले कंट्रोल युनिट मतदान केंद्राध्यक्ष तसेच मतदान प्रतिनिधी या सर्वांना दिसेल अशा रितीने ठेवण्यात येईल आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स मतदान कक्षात ठेवण्यात येतील.

**८. चिन्हांकित मतदार यादी :—** मतदान सुरुवात करण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष सर्व मतदान प्रतिनिधी व इतर उपस्थितांना चिन्हांकित मतदार यादीमध्ये पुढील बाबींव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खुणा केल्या नसल्याचे दाखवून देईल —

(अ) टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील नियम ३ पोट नियम २(बी) मधील तरतुदीनुसार केलेल्या खुणेव्यतिरिक्त अन्य कोणतीही खूण करण्यात आलेली नाही ; आणि

(ब) टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील नियम ५(२)(बी)मधील तरतुदीनुसार केलेल्या खुणेव्यतिरिक्त अन्य कोणतीही खूण करण्यात आलेली नाही.

**९. महिला मतदारांसाठी सुविधा :—**(१) जेव्हा एखाद्या मतदान केंद्रात महिला व पुरुष असे दोन्ही मतदार असतील तेव्हा आवश्यकता असल्यास मतदान केंद्राध्यक्ष पुरुष व महिला यांच्या वेगवेगळ्या रांगा करून काही पुरुष व त्यानंतर काही महिला अशा प्रकारे मतदानासाठी पाठवील.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी अथवा मतदान केंद्राध्यक्ष एखाद्या मतदान केंद्रावर महिला मतदारांना सहाय्य करण्यासाठी एखादी महिला सहायक नियुक्त करील. जेणेकरून, ती मतदान केंद्राध्यक्षास सर्वसाधारणपणे मतदान प्रक्रियेमध्ये मदत करू शकेल. विशेषतः आवश्यकता भासल्यास एखाद्या महिला मतदारास मदत करणे अथवा तिची झडती घेणे यामध्ये मदत करू शकेल.

**१०. मतदारांची ओळख पटविणे :—**बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक नियम, १९९० च्या नियम २६, मुंबई प्रांतिक महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम २४, नागपूर शहर महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम १० मधील तरतुदीनुसार विहित केलेली पद्धती यासंदर्भात अवलंबिली जाईल.

**११. मतदान कर्तव्यार्थ नेमलेल्या लोकसेवकांना द्यावयाची सुविधा :—**(१) जे मतदान केंद्रावर मतदान कर्तव्यार्थ नेमलेले लोकसेवक आहेत, ते टपाली मतपत्रिका आदेश, २००१ मधील नियम ११ अन्वये विहित केलेल्या नमुना पीबी-२ या नमुन्यांतील निवडणूक कार्य प्रमाणपत्र सादर करतील आणि संबंधित मतदान केंद्रात मतदान करण्याची अनुमती मागतील, जरी त्यांचे संबंधित मतदान केंद्र वेगळे असेल.

(२) मतदान केंद्राध्यक्ष वरील नमूद नमुना पीबी-२ मधील निवडणूक कार्य प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर,—

(अ) मतदान केंद्राध्यक्ष त्यावर सदर प्रमाणपत्र सादर करणाऱ्या संबंधित व्यक्तीची स्वाक्षरी घेईल ;

(ब) मतदान केंद्राध्यक्ष निवडणूक कार्य प्रमाणपत्रात नमूद केल्यानुसार संबंधित व्यक्तीचे नाव व त्याचा मतदार यादीतील अनुक्रमांक चिन्हांकित मतदार यादीच्या शेवटी नमूद करील; आणि

(क) संबंधित मतदान केंद्रावर मतदान करण्यास पात्र असलेल्या अन्य कोणत्याही मतदाराने ज्याप्रमाणे मतदान केले असते त्याप्रमाणे त्यास मतदान करू देईल.

**१२. मतदाराच्या ओळखीस आव्हान :—** यासंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिका निवडणूक नियम, १९९० च्या नियम २५, मुंबई प्रांतिक महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम २७, नागपूर शहर महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम, १२-ड मधील विहित केलेल्या तरतुदी यासंदर्भात लागू राहतील.

**१३. तोतयेगिरीस प्रतिबंध करणे :—** यासंदर्भात मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १८अ अ, मुंबई प्रांतिक महानगरपालिका निवडणूक अधिनियमाच्या कलम १४अ, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९क अंतर्गत विहित केलेले नियम व राज्य निवडणूक आयोगाने निर्गमित केलेले आदेश यासंदर्भात लागू राहतील.

**१४. मतदान यंत्राद्वारे मतदान करण्याची कार्यपद्धती :—**(१) एखादया मतदारास मतदान करण्याची अनुमती देण्यापूर्वी मतदान केंद्राध्यक्ष,—

(अ) चिन्हांकित मतदार यादीमध्ये नमूद केलेला मतदाराचा अनुक्रमांक व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत नमूद करील ;

(ब) मतदाराची स्वाक्षरी घेईल अथवा अंगठ्याचा ठसा उपरोक्त नमूद मतदार नोंदवहीत उमटवील ; आणि

(क) चिन्हांकित मतदार यादीमध्ये संबंधित मतदारांच्या नावासमोर खूण करील, जेणेकरून त्यास मतदान करण्याची अनुमती देण्यात आलेली आहे :

परंतु, कोणत्याही मतदारास त्याने व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवहीत स्वाक्षरी केल्याशिवाय अथवा अंगठ्याचा ठसा उमटविल्याशिवाय त्यास मतदान करण्याची अनुमती देणार नाही.

(२) एखादया व्यक्तीने उपरोक्त नमूद मतदार नोंदवहीत अंगठ्याचा ठसा उमटविल्यास मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी अथवा अन्य कोणताही अधिकारी यांनी अंगठ्याचा ठसा साक्षांकित करणे आवश्यक राहील.

**१५. मतदारांनी मतदान केंद्रात मतदानाबाबत तसेच मतदान पद्धतीबाबत गुप्तता बाळगणे :—**(१) प्रत्येक मतदाराने त्यास उपरोक्त परिच्छेद १४ मध्ये विहित केल्याप्रमाणे मतदान करण्यास अनुमती दिल्यानंतर मतदानाबाबत मतदान केंद्रात गुप्तता बाळगणे आवश्यक असून, आणि त्या दृष्टीने मतदान करताना खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यपद्धती अनुसरणे आवश्यक आहे.

(२) मतदान करण्यास अनुमती दिल्यानंतर मतदार तात्काळ ज्याच्या अखत्यारित कंट्रोल युनिट आहे अशा मतदान अधिकाऱ्याकडे अथवा मतदान केंद्राध्यक्षाकडे जाईल व संबंधित मतदान अधिकारी अथवा मतदान केंद्राध्यक्ष कंट्रोल युनिटचे योग्य ते बटण दाबून मतदारास मतदान करता यावे यासाठी बॅलेटिंग युनिट सुरू (Activate) करील.

(३) त्यानंतर तात्काळ मतदार,—

(अ) मतदान कक्षाकडे जाईल ;

(ब) बॅलेटिंग युनिटवर उमेदवारांची नावे व चिन्हे ज्या ठिकाणी दर्शविली आहेत, तेथे त्याला हव्या असलेल्या उमेदवारासमोरील बटण दाबून आपले मत नोंदवील ; आणि

(क) मतदान कक्षाच्या बाहेर येईल आणि मतदान केंद्राबाहेर पडेल.

(४) कोणताही मतदार मत नोंदविण्यासाठी अनावश्यक उशीर लावणार नाही.

(५) एखादा मतदार मतदान कक्षात असल्यास अन्य कोणत्याही मतदारास मतदान कक्षात जाण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(६) वरील नमूद परिच्छेद १४ आणि १८ मधील तरतुदीनुसार एखादया मतदारास मतदान करण्याची अनुमती देण्यात आल्यानंतर वरील उप परिच्छेद (३) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरण्यास एखादया मतदाराने मतदान केंद्राध्यक्षाने ताकीद दिल्यानंतरही सूचनांचे पालन करण्यास नकार दिल्यास मतदान केंद्राध्यक्ष अथवा मतदान अधिकारी मतदान केंद्राध्यक्षांच्या आदेशानुसार अशा मतदारास मतदान करू देणार नाही.

(७) वरील उप परिच्छेद (६) मध्ये नमूद केल्यानुसार एखादया मतदारास मतदान करण्याची अनुमती नाकारण्यात आल्यास " मतदान प्रक्रियेचा भंग " असा अभिप्राय नमुना व्हीएम-१ या मतदारांच्या नोंदवहीत मतदान केंद्राध्यक्षाच्या स्वाक्षरीसह नमूद करण्यात यावा.

**१६. अंध अथवा अपंग मतदारांनी मत नोंदविणे :—** (१) एखादा मतदार त्याच्या अंधत्वामुळे अथवा अन्य शारीरिक अपंगत्वामुळे त्याला सहाय्य मिळाल्याशिवाय बॅलेटिंग युनिटवरील चिन्हे ओळखून योग्य ते बटण दाबून मत नोंदविण्यास असमर्थ आहे, अशी मतदान केंद्राध्यक्षाची खात्री झाल्यास मतदारास २१ वर्षापेक्षा कमी वय नसलेला सहाय्यक त्याच्यासोबत मतदान कक्षात घेऊन जाण्यास व त्याच्या इच्छेनुसार मतदान करण्यास अनुमती देईल.

परंतु, मतदानाच्या दिवशी कोणतीही व्यक्ती अंध अथवा अपंग मतदारास मदत करण्यासाठी एकापेक्षा जास्त मतदाराची सहाय्यक म्हणून काम करण्यास अनुमती देण्यात येणार नाही.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीस या नियमाखाली वरीलप्रमाणे सहायक म्हणून काम करण्याची अनुमती देण्यापूर्वी संबंधित व्यक्ती असे जाहीर करील की, ती व्यक्ती मतदाराच्या वतीने नोंदविलेले मत गुप्त ठेवील, तसेच त्याने एकाच दिवशी एकापेक्षा जास्त मतदाराचा सहायक म्हणून काम केलेले नाही.

(२) मतदान केंद्राध्यक्ष अशा सर्व बाबींच्या नोंदी व्हीएम-५ या नमुन्यात ठेवील.

१७. **मतदान करण्याची इच्छा नसलेला मतदार.**—एखादया मतदाराने त्याचा मतदार यादीतील क्रमांक नमुना व्हीएम-१ मधील मतदार नोंदवहीत् नोंदविल्यानंतर तसेच या आदेशाच्या परिच्छेद १४(१) मधील तरतुदीनुसार त्यामध्ये स्वाक्षरी केल्यानंतर अथवा अंगठ्याचा ठसा उमटवल्यानंतर मतदान करावयाचे नाही असे ठरविल्यास, त्याच्या नावासमोर नमुना व्हीएम-१ मधील मतदार नोंदवहीत तसा अभिप्राय मतदान केंद्राध्यक्ष लिहील आणि अशा अभिप्रायासमोर संबंधित मतदाराची स्वाक्षरी घेईल अथवा त्याच्या अंगठ्याचा ठसा उमटवील.

१८. **प्रदत्त मते.**— (१) एखादा मतदार मतदान करण्यास आल्यानंतर त्याच्या वतीने अन्य एखादया व्यक्तीने मतदान केले आहे असे आढळून आल्यास अशा मतदारास त्याची ओळख पटविण्यासंदर्भातील प्रश्नांची उत्तरे त्याने समाधानकारकरित्या मतदान केंद्राध्यक्षास दिल्यास त्यास बॅलटिंग युनिटवर मतदान करण्यास अनुमती देण्याऐवजी, त्यास राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या नमुन्यानुसार व भाषेतील अथवा भाषातील तपशील समाविष्ट असलेली प्रदत्त मतपत्रिका देण्यात येईल.

(२) प्रत्येक मतदार त्यास प्रदत्त मतपत्रिका देण्यापूर्वी नमुना व्हीएम-२ मध्ये स्वतःचे नाव लिहील.

(३) प्रदत्त मतपत्रिका मिळाल्यानंतर असा मतदार त्वरित,—

(अ) मतदान कक्षाकडे जाईल ;

(ब) त्याला देण्यात आलेल्या मतपत्रिकेवर त्याला देण्यात आलेल्या उपकरणाच्या सहाय्याने त्याला ज्या उमेदवारास मतदान करावयाचे आहे त्याच्या नावासमोर " X " अशी खूण करील ;

(क) स्वतःचे मत उघड होणार नाही, अशारितीने मतपत्रिकेची घडी करील ;

(ड) मतदान केंद्राध्यक्षास आवश्यक वाटल्यास मतपत्रिकेवरील विभेदक चिन्हाची खूण दाखवील ;

(ई) मतदान केंद्राध्यक्षास मतपत्रिका देईल व ती मतपत्रिका त्यासाठी ठेवलेल्या विशिष्ट पाकिटात ठेवण्यात येईल ; आणि

(फ) मतदान केंद्राबाहेर पडेल.

(४) एखादा मतदार अंधत्व अथवा अन्य शारीरिक अपंगत्वामुळे मतदान करण्यास सहाय्य मिळाल्याशिवाय मत नोंदविण्यास असमर्थ असल्यास मतदान केंद्राध्यक्ष त्याला वरील पद्धती अनुसरून परिच्छेद १६ मध्ये विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार त्याच्या इच्छेनुसार सहाय्यक देऊन मतदान करण्याची अनुमती देईल.

१९. **मतदान सुरू असताना मतदान कक्षात मतदान केंद्राध्यक्षाने प्रवेश करण्याबाबत :**—(१) मतदान केंद्राध्यक्ष त्याला जेंव्हा जेंव्हा आवश्यकता वाटेल अशावेळी, मतदान सुरू असताना मतदान कक्षात प्रवेश करील आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स सुरक्षित असून, त्याला कोणत्याही प्रकारे बिघडविण्यात आलेले नाही याची खात्री करील.

(२) एखादा मतदार मतदान कक्षात प्रवेश केल्यानंतर तो बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स बिघडविण्याचा प्रयत्न करीत आहे अथवा मतदान कक्षात आवश्यकतेपेक्षा जास्त वेळ थांबलेला आहे, असे मतदान केंद्राध्यक्षास आढळून आल्यास तो मतदान कक्षात प्रवेश करील आणि मतदान प्रक्रिया सुरळीतपणे व विहित पद्धतीनुसार सुरू राहण्याच्या दृष्टीने योग्य ती पावले उचलील.

(३) मतदान केंद्राध्यक्ष ज्या ज्या वेळी मतदान कक्षात या नियमाखाली प्रवेश करील तेंव्हा तो आपल्या सोबत मतदान प्रतिनिधींना त्यांची इच्छा असल्यास सोबत येण्याची अनुमती देईल.

२०. **मतदान बंद करणे .**—(१) राज्य निवडणूक आयोगाने विहित केलेल्या वेळेस मतदान बंद करण्याची दक्षता मतदान केंद्राध्यक्ष घेईल आणि त्यानंतर कोणत्याही मतदारास मतदान केंद्रात प्रवेश करण्याची अनुमती देणार नाही :

परंतु, मतदान बंद होण्याच्या वेळेस जितके मतदार मतदान केंद्रात असतील त्या सर्वांना आपले मत नोंदविण्याची अनुमती देण्यात येईल.

(२) मतदान बंद होण्याच्यावेळी एखादा मतदार मतदान केंद्रात होता किंवा कसे, या विषयी कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास, त्याबाबतचा निर्णय मतदान केंद्राध्यक्ष घेईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

२१. **नोंदविलेल्या मतांचा हिशेब.**—(१) मतदान केंद्राध्यक्ष नमुना व्हीएम-३ मध्ये मतदान बंद झाल्यानंतर नोंदविल्या गेलेल्या मतांचा हिशेब तयार करील आणि " नोंदविलेल्या मतांचा हिशेब " असे लिहिलेल्या वेगळ्या पाकिटात तो ठेवील.

(२) मतदान केंद्राध्यक्ष प्रत्येक मतदान प्रतिनिधीस व्हीएम-३ या नमुन्यातील मतदान बंद झाल्यानंतर नोंदविल्या गेलेल्या मतांच्या हिशेबाच्या नमुन्याची स्वतः साक्षांकित केलेली सत्यप्रत देईल आणि ती दिल्याची पोहोच संबंधित मतदान प्रतिनिधींकडून घेईल.

२२. **मतदान बंद झाल्यानंतर मतदान यंत्र मोहोरबंद (Seal) करणे.**—(१) मतदान बंद झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर मतदान केंद्राध्यक्ष कंट्रोल युनिट बंद करील व ते बॅलटिंग युनिट अथवा युनिट्सपासून वेगळे करील, जेणेकरून बॅलटिंग युनिट अथवा युनिट्समध्ये आणखी कोणतीही मते नोंदविली जाणार नाहीत.

(२) राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या सुचनांनुसार कंट्रोल युनिट आणि बॅलटिंग युनिट अथवा युनिट्स त्यानंतर मोहोरबंद केली जातील आणि सुरक्षित ठेवली जातील, तसेच ती मोहोरबंद करण्यासाठी अशाप्रकारे सील चिकटविण्यात येतील, जेणेकरून सील तोडल्याशिवाय कोणतेही युनिट उघडता येणार नाही.

(३) मतदान केंद्रात उपस्थित असलेले जे मतदान प्रतिनिधी अशा सीलवर सही करण्यास इच्छुक असतील त्यांना सीलवर सही करण्याची अनुमती देण्यात येईल.

२३. **इतर पाकिटे मोहोरबंद करणे.**—(१) मतदान केंद्राध्यक्ष वेगवेगळ्या प्रकारच्या पाकिटात खालील बाबी ठेवील.—

(अ) चिन्हांकित मतदार यादी ;

(ब) नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही ;

(क) नमुना व्हीएम-२ मधील प्रदत्त मते व त्यांची यादी ठेवण्यात आलेले पाकीट ;

(ड) विहित नमुन्यांत आव्हानित मतांची यादी ; आणि

(ई) राज्य निवडणूक आयोगाने सूचना दिल्यानुसार सीलबंद करावयाचे अन्य कोणतेही कागदपत्र ठेवलेले पाकीट.

(२) मतदान केंद्राध्यक्ष शिक्का (सील) वापरून वरील सर्व पाकिटे मोहोरबंद करण्यात येतील आणि त्यावर उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतदान प्रतिनिधी यांपैकी जे उपस्थित असतील व त्यावर स्वाक्षरी करू इच्छित असतील त्यांना स्वाक्षरी करण्याची अनुमती देण्यात येईल.

२४. **निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे मतदान यंत्रे पाठविणे.**—(१) मतदान केंद्राध्यक्ष त्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे त्यांनी सूचना दिलेल्या स्थळी खालील बाबी पाठवील किंवा पाठविण्याची व्यवस्था करील :—

(अ) मतदान यंत्र ;

(ब) नमुना व्हीएम-३ मधील नोंदविलेल्या मतांचा हिशेब ;

(क) या आदेशाच्या परिच्छेद २३ मध्ये नमूद केलेली मोहोरबंद पाकिटे ; आणि

(ड) मतदान केंद्रावर वापरण्यात आलेली सर्व कागदपत्रे.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी मतमोजणीस सुरुवात होईपर्यंतच्या कालावधीत मतदान यंत्रे, पाकिटे व अन्य कागदपत्रे सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने त्यांच्या वाहतुकीची योग्य ती व्यवस्था करील.

२५. **मतदान स्थगित करण्याची कार्यपद्धती.**—(१) मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २८एच, मुंबई प्रांतिक महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम, ३२, नागपूर शहर महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम, ९अ मधील तरतुदीच्या अनुषंगाने एखाद्या मतदान केंद्रावरील मतदान स्थगित करावे लागल्यास वरील परिच्छेद २१ ते २४ मधील तरतुदी, शक्य असेल तोवर, वरील तरतुदीनुसार मतदान बंद झाले असे समजून लागू होतील.

(२) उपरोक्त तरतुदींमध्ये शिफारस केल्यानुसार मतदान सुरू झाल्यानंतर ज्या मतदाराने मतदान स्थगित होण्यापूर्वी मतदान केले आहे त्यांना उपरोक्त नियमांच्या तरतुदीनुसार पुन्हा मतदान करता येणार नाही.

(३) जेव्हा वरीलप्रमाणे स्थगित केलेले मतदान पुन्हा सुरू होईल त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी प्रत्येक मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षास चिन्हांकित मतदार यादी, नमुना व्हीएम-१ या नमुन्यातील मतदार नोंदवही इत्यादी सीलबंद केलेली कागदपत्रे व नवीन मतदान यंत्र पुरवील.

(४) मतदान केंद्राध्यक्ष उपरोक्त नमूद सीलबंद पाकिटे मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडील आणि चिन्हांकित मतदार यादीचा स्थगित केलेले मतदान पुन्हा सुरू करताना मतदारांच्या नावावर खुणा करण्यासाठी वापर करील.

(५) या आदेशाचे परिच्छेद ४ ते २४ मधील तरतुदी स्थगित केलेले मतदान पुन्हा घेण्यासाठी स्थगितीपूर्वी जशा लागू होत्या तशा लागू होतील.

२६. **मतदान यंत्राची तपासणी व निरीक्षण.**—(१) ज्या मतदान केंद्रावर एकापेक्षा जास्त मतदान यंत्रे वापरण्यात आलेली आहेत अशा मतदान केंद्रावरील कंट्रोल युनिट्सची निवडणूक निर्णय अधिकारी तपासणी व निरीक्षण करील आणि अशा यंत्रावरील मतमोजणी एकत्रितरित्या करण्यात येईल.

(२) वरील उप परिच्छेद (१) मधील तरतुदीनुसार एखाद्या कंट्रोल युनिटवरील नोंदविण्यात आलेल्या मतांची मतमोजणी करण्यापूर्वी उमेदवार त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतमोजणी प्रतिनिधी यांना मतमोजणी टेबलवर मतदान यंत्राचे पेपर सील तसेच अन्य महत्त्वपूर्ण सील यांची तपासणी करून ती समाधानकारकरित्या सुरक्षित आहेत, याबाबत त्यांची खात्री करून घेता येईल.

(३) निवडणूक निर्णय अधिकारी कोणतेही मतदान यंत्र बिघडविण्यात आलेले नाही, याची खात्री करून घेईल.

(४) एखादे मतदान यंत्र बिघडविण्यात आले आहे अशी निवडणूक निर्णय अधिकारी याची खात्री झाल्यास तो अशा बिघडविण्यात आलेल्या मतदान यंत्राच्या मतांची मतमोजणी करणार नाही, आणि मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २८ एच, मुंबई प्रांतिक महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम, ३२, नागपूर शहर महानगरपालिका निवडणूक नियमाच्या नियम, ९अ मधील तरतुदीनुसार नव्याने मतदान घेण्याची कार्यपद्धती अनुसरील.

२७. **मतमोजणी** :---(१) कोणतेही मतदान यंत्र बिघडविण्यात आलेले नाही, याची खात्री झाल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी संबंधित मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटवरील " रिझल्ट्स " हे योग्य ते बटण दाबून त्या यंत्रावर किती मते नोंदविण्यात आलेली आहेत, यांची संख्या पाहील आणि त्या मतदान यंत्रावर प्रत्येक उमेदवाराच्या संदर्भात नोंदविण्यात आलेली मते त्यासाठी योजना करण्यात आलेल्या मतदान यंत्राच्या डिस्प्ले पॅनेलवर दाखवील.

(२) प्रत्येक उमेदवारास मिळालेली मते वरीलप्रमाणे मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटवरील डिस्प्ले पॅनेलवर दाखविण्यात आल्यानंतर,—

(अ) व्हीएम-४ या नमुन्यांत प्रत्येक उमेदवाराच्या संदर्भात नोंदविण्यात आलेली मते वेगळ्याने नमूद करण्यात येतील;

(ब) व्हीएम-४ या नमुन्यातील प्रपत्र पूर्णपणे लिहून झाल्यानंतर आणि त्यावर मतमोजणी पर्यवेक्षक आणि उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी अथवा मतदान प्रतिनिधी यांच्या त्यावर स्वाक्षऱ्या घेण्यात येतील; आणि

(क) व्हीएम-४ या नमुन्यांत सर्व संबंधित बाबी भरून झाल्यानंतर रिझल्ट्स शीट मधील निर्णय जाहीर करण्यात येईल.

२८. **काढता येणारी मेमरी सीलबंद करणे** :---(१) मतदान यंत्राच्या कंट्रोल युनिटमध्ये नोंदविलेली उमेदवारनिहाय मते किती आहेत, याची खात्री करून ती व्हीएम-४ या विहित नमुन्यांत नमूद करण्यात आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी कंट्रोल युनिटमधील काढता येणारी मेमरी (Detachable Memory) सीलबंद करील व त्यावर स्वाक्षरी करून स्वतःचा शिक्का उमटवील. तसेच उपस्थित उमेदवार अथवा त्यांचे निवडणूक प्रतिनिधी ज्यांना त्यावर सही करावयाची इच्छा असेल अथवा अंगठ्याचा ठसा उमटविण्याची इच्छा असेल त्यांना तशी परवानगी देईल. परंतु, काढता येणाऱ्या मेमरीमधील मते पुसली जाणार नाहीत याची दक्षता घेईल.

(२) निवडणूक निर्णय अधिकारी वरीलप्रमाणे सीलबंद केलेल्या काढता येणाऱ्या मेमरीला त्यासाठी विशेषतः तयार केलेल्या खोक्यामध्ये ठेवील. तसेच खोक्यावर खालील तपशील नमूद करण्यात येईल :—

(क) महानगरपालिकेचे नाव व मतदार संघ (प्रभाग/जागा क्रमांक)

(ख) मतदान केंद्र क्रमांक अथवा नाव जेथे ती काढता येणारी मेमरी उपयोगात आणली गेली आहे ;

(ग) काढता येणाऱ्या मेमरीचा अनुक्रमांक ;

(घ) मतदानाची तारीख ; आणि

(ड) मतमोजणीची तारीख.

२९. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणुकीशी संबंधित कागदपत्रे यांचा ताबा** :---(१) निवडणुकीमध्ये वापरण्यात आलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी संबंधीत महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात राहतील.

(२) महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे त्यांच्या ताब्यात खालील बाबी सुरक्षितपणे ठेवतील :—

(अ) चिन्हांकित मतदार यादी असलेले पाकीट.

(ब) नमुना व्हीएम-१ मध्ये ठेवलेली मतदार नोंदवही असलेले पाकीट.

(क) नमुना व्हीएम-४ या नमुन्यात प्रत्येक मतदारासमोर नोंदविण्यात आलेल्या मतांचा हिशेब ठेवलेले पाकीट.

(ड) निवडणूक संदर्भातील अन्य कागदपत्र.

३०. **इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रातील काढता येणारी मेमरी व निवडणुकीसंबंधी अन्य कागदपत्रे सादर करणे अथवा त्यांचे निरीक्षण** :---(१) महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात असलेल्या खालील बाबी :---

(अ) चिन्हांकित मतदार यादी ठेवलेले पाकीट.

(ब) नमुना व्हीएम-१ या नमुन्यात ठेवलेल्या मतदार नोंदवही असलेले पाकीट.

या बाबी सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तिस उघडता येणार नाहीत अथवा त्यांचे निरीक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाहीत.

(२) उपरोक्त परिच्छेद २८ मधील तरतुदीनुसार सीलबंद केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राच्या काढता येणाऱ्या मेमरी महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या ताब्यात राहील व ती शासकीय कोषागार किंवा उपकोषागारामध्ये ठेवण्यात येईल व सक्षम न्यायालयाच्या आदेशाशिवाय अन्य कोणत्याही व्यक्तिस उघडता येणार नाही, त्याचे निरीक्षण करता येणार नाही अथवा कोणासमोर सादर करता येणार नाही.

(३) राज्य निवडणूक आयोग आदेश देईपर्यंत महानगरपालिका आयुक्त अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्या ताब्यात असलेली इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राची काढता येणारी मेमरी जशीच्या तशी ठेवली जातील व ती अन्य कोणत्याही निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या अनुमतीशिवाय वापरता येणार नाहीत. जरी सील केलेली मेमरी ज्या प्रभागाशी संबंधित असेल त्या प्रभागामध्ये कोणतीही निवडणूक याचिका दाखल न झाल्यास ही मेमरी तीन महिन्यांच्या अवधीनंतर राज्य निवडणूक आयोग निदेश देईल अशा ठिकाणी परत केल्यानंतर या मेमरीमधील माहिती नष्ट करण्यात येईल.

(४) ज्या मतदारसंघाच्या ( प्रभागाच्या / जागेच्या बाबत) कोणतीही निवडणूक याचिका अथवा अन्य कोणत्याही न्यायालयात रिट याचिका प्रलंबित नसल्यास अन्य निवडणूक कागदपत्र ठेवलेली पाकीटे संबंधित नियमांतील तरतुदीनुसार नष्ट करता येतील.

**३१. या आदेशानुसार विहित करण्यात आलेले सर्व नमुने खालील अनुसूचीमध्ये दिल्याप्रमाणे राहतील :—**

## अनुसूची

### नमुना व्हीएम-१

(पहा परिच्छेद १४)

**मतदार नोंदवही**

.............................................. महानगरपालिका निवडणूक/पोट-निवडणूक (जिल्हा ............................) प्रभाग / जागा क्रमांक ................ प्रभागाचे नाव, असल्यास ................................ मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ......................

| अ.क्र. | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठ्याचा ठसा | अभिप्राय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | | | |
| २. | | | |
| ३. | | | |
| ४. | | | |
| इत्यादी | | | |

मतदान केंद्राध्यक्षाची सही

१२५१५ ~~१०६~~

## नमुना व्हीएम-२

(पहा परिच्छेद १८)

**प्रदत्त मतांची यादी**

.............................................. महानगरपालिका निवडणूक/पोट-निवडणूक (जिल्हा ..........................) प्रभाग / जागा क्रमांक ................ प्रभागाचे नाव, असल्यास ............................... मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ...............................

| अ.क्र. | मतदाराचे नाव | मतदाराचा मतदार यादीतील अनुक्रमांक | मतदान नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) मधील संबंधित मतदाराच्या जागी ज्याने मतदान केले आहे तो अनुक्रमांक | मतदाराची स्वाक्षरी अथवा अंगठ्याचा ठसा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |
| ५. | | | | |
| ६. | | | | |
| ७. | | | | |
| ८. | | | | |
| ९. | | | | |
| १०. | | | | |

दिनांक ....................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

## नमुना व्हीएम-३

(पहा परिच्छेद २१)

### भाग एक— नोंदविलेल्या मतांचा हिशेब

........................................... महानगरपालिका निवडणूक/पोट-निवडणूक (जिल्हा.............................), प्रभाग / जागा क्रमांक ..............प्रभागाचे नाव, असल्यास ............................... मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ...............................

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ...................................................

कंट्रोल युनिटचा क्रमांक ...................................................

मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलटिंग युनिटची संख्या ..........................

१. मतदान केंद्रावर नेमून दिलेल्या मतदारांची संख्या

२. मतदार नोंदवहीत (नमुना व्हीएम-१) नोंद झालेल्या एकूण मतदारांची संख्या

३. परिच्छेद १७ नुसार ज्या मतदारांनी मतदान न करण्याचे ठरविले त्यांची संख्या

४. परिच्छेद १५ नुसार मतदानास अनुमती न दिलेल्या मतदारांची संख्या

५. मतदान यंत्रामध्ये नोंदविल्या गेलेल्या एकूण मतदारांची संख्या

६. वरील अनुक्रमांक-५ मध्ये दाखविलेल्या एकूण मतांची संख्या = (अनुक्रमांक-२ वजा अनुक्रमांक-३ वजा अनुक्रमांक-४) ही आकडेवारी जुळते किंवा कसे अथवा काही फरक पडतो किंवा कसे,

७. परिच्छेद १८ नुसार प्रदत्त मतपत्रिका दिलेल्या मतदारांची संख्या

८. प्रदत्त मतपत्रिकांची संख्या

| | अनुक्रमांक | |
|---|---|---|
| | पासून | पर्यंत |
| (अ) उपयोगासाठी मिळालेल्या | ............... | ............ |
| (ब) मतदारांना दिलेल्या | ............... | ............ |
| (क) उपयोगात न आणलेल्या व परत केलेल्या | ............... | ............ |

९. कागदी मोहोरांचा (पेपर सील) हिशेब

अनुक्रमांक

पासून पर्यंत

१. पुरविल्या गेलेल्या कागदी मोहोरांचे अनुक्रमांक पासून..............पर्यंत..................

२. एकूण पुरविलेल्या कागदी मोहोरांची संख्या

३. उपयोगात आणलेल्या कागदी मोहोरांची संख्या

४. न वापरलेल्या कागदी मोहोरांचा क्रमांक जे निर्वाचन अधिकाऱ्यास परत केले. (क्रमांक - ३ वजा २)

५. खराब झालेल्या कागदी मोहोरांची संख्या, असल्यास

मतदान प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या

१..............................

२..............................

३..........................

४............................

५............................

ठिकाण ......................

दिनांक ......................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

मतदान केंद्र क्रमांक..........

96

९२८/५ ९०८

## नमुना व्हीएम-४

(पहा परिच्छेद २८)

### भाग दोन—मतमोजणीचा निकाल

.................................................... महानगरपालिका निवडणूक/पोट-निवडणूक (जिल्हा .............................) प्रभाग / जागा क्रमांक ................. प्रभागाचे नाव, असल्यास ................................. मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ..................................

मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ....................................

कंट्रोल युनिटचा क्रमांक ............................................

काढता येणाऱ्या मेमरीचा क्रमांक ..............................................................

मतदान केंद्रावर वापरलेल्या बॅलटिंग युनिटची संख्या ............................

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | नोंदविलेल्या मतांची संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |
| ६. | | |
| | एकूण .. | |

वर नमूद केलेल्या एकूण मतांची संख्या भाग-१ मधील अनुक्रमांक-५ येथे नमूद केलेल्या एकूण मतांच्या संख्येशी जुळते किंवा कसे अथवा काही फरक येतो किंवा कसे,

ठिकाण ......................

दिनांक .......................

मतमोजणी पर्यवेक्षकाची सही ................

उमेदवाराचे/मतदान प्रतिनिधींचे/................

मतमोजणी प्रतिनिधीचे नाव व ................

पूर्ण सही ................

१.

२.

३.

४.

५.

६.

ठिकाण .....................

दिनांक .....................

निवडणूक निर्णय अधिकाऱ्याची सही

## नमुना व्हीएम-५

(पहा नियम १६)

### अंध व अपंग मतदारांची यादी

................................................ महानगरपालिका निवडणूक/पोट-निवडणूक (जिल्हा ............................) प्रभाग / जागा क्रमांक .................. प्रभागाचे नाव, असल्यास .................................. मतदान केंद्राचा क्रमांक व नाव ...................................

| मतदाराचा अनुक्रमांक व मतदान केंद्र क्रमांक | मतदाराचे पूर्ण नाव | साथीदाराचे पूर्ण नाव | साथीदाराचा पत्ता | साथीदाराची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

दिनांक ......................

मतदान केंद्राध्यक्षाची सही

**नन्द लाल,**
राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र.

## STATE ELECTION COMMISSION, MAHARASHTRA

New Administrative Building, Opp. Mantralaya, Madam Cama Road, Mumbai 400 032, dated the 7th January 2005.

### Voting by Electronic Voting Machines Order, 2005

*An Order to provide for detailed procedure for use of electronic voting machine in the elections to the Municipal Corporations.*

CONSTITUTION OF INDIA.

No. SEC/MC/2004/CR-13/D-5.—Whereas, the superintendence direction and control of all elections to the Panchayats and Municipalities in the State are vested in the State Election Commission by virtue of Article 243-K and 243-ZA of the Constitution of India ;

And Whereas, section 28 of the Mumbai Municipal Corporation Act (Bom. III of 1888), section 8A of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949) and section 13B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C.P. & Berar II of 1950) provide for voting by electronic voting machines in Municipal Corporations ;

And Whereas, as per the above sections, the voting at an election by electronic voting machine has been provided ;

And Whereas, the voting at an election to the Municipal Corporations by electronic voting machine has been provided for in the Municipal Act but detailed rules have not been framed as yet and it has become expedient to prescribe the detailed procedure for voting by electronic voting machine ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by Article 243-ZA of the Constitution of India, read with sub-section *(4)* of section 18A of the Bombay Municipal Corporations Act (Bom. III of 1888), sub-section *(4)* of section 9B of the City of Nagpur Corporation Act, 1948 (C.P. & Berar II of 1950), sub-section *(4)* of section 14 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (Bom. LIX of 1949), and of all other powers enabling it in this behalf, the State Election Commission, Maharashtra, hereby makes the following order :—

1. *Short title, extent, application and commencement.*—(1) This Order may be called as the Procedure for use of Electronic Voting Machine at the Elections to the Municipal Corporations.

(2) It extends to whole of the State of Maharashtra and applies in relation to elections Municipal Corporations.

(3) It shall come into force on the date of its publication in the *Official Gazette.*

2. *Definitions and Interpretation.*—(1) In this Order, unless the context, otherwise requires,—

(1) "Electronic Voting Machine" means any machine or apparatus whether operated electronically or otherwise used for giving or recording of votes instead of ballot box or ballot paper wherever such electronic voting machine is used at any election of the Municipal Corporations ;

(2) "Constituency" means ward number / seat number of the Municipal Corporation, as the case may be ;

(3) "Election" means an Election or Bye-Election to which this order applies ;

(4) "Postal Ballot Order" means the Postal Ballot Order, 2001 issued by the State Election Commission, Maharashtra dated the 16th January 2001.

3. *Design of Electronic Voting Machines.*—Every electronic machine (hereinafter referred to as the voting machine) shall have a control unit and a balloting unit or units and shall be of such designs as may be approved by the State Election Commission, Maharashtra.

4. *Preparation of voting machine by the Returning Officer.*—(1) The balloting unit of the voting machine shall contain such particulars and in such language or languages as the State Election Commission may specify.

(2) The names of the candidates shall be arranged on the balloting unit in the same order in which they appear in the list of the contesting candidates.

(3) If two or more candidates bear the same name, they shall be distinguished by the addition of their occupation or residence or in some other manner.

(4) Subject to the foregoing provisions of this Order, the returning officer shall,—

(a) fix the label containing the names and symbols of the contesting candidates in the balloting unit and secure that unit with his seal and the seals of such of the contesting candidates or their election agents present as are desirous of affixing the same ;

(b) set the number of contesting candidates and close the candidate set section in the control unit and secure it with his seal and the seals of such of the contesting candidates or their election agents present as are desirous of affixing the same.

5. *Arrangements at the Polling Stations.*—(1) Outside each polling station there shall be displayed prominently—

(a) a notice specifying the polling area, the electors of which are entitled to vote at the polling station and, when the polling area has more than one polling station, the particulars of the electors so entitled ; and

(b) a copy of the list of contesting candidates.

(2) At each polling station there shall be set up one or more voting compartments in which the electors can record their votes free from observation.

(3) The returning officer shall provide at each polling station one voting machine and copies of relevant part of the electoral roll and such other election material as may be necessary for taking the poll.

(4) Without prejudice to the provisions of sub-paragraph (3), the returning officer may, with the previous approval of the State Election Commission, provide one common voting machine for two or more polling stations located in the same premises.

6. *Admission to polling stations.*—As per the provision of rule 12 (3)(d) of the Greater Mumbai Municipal Corporation Election Rules, 1990, rule 15(1) of Bombay Provincial Municipal Corporations Election rules and rule 9(1) of the Election Rules for Nagpur Municipal Corporation, the presiding officer shall regulate the number of voters to be admitted at any one time inside the polling station and shall exclude therefrom all persons other than mentioned in the said rules.

7. *Preparation of voting machine for poll.*—(1) The control unit and balloting unit or units, as the case may be, of every voting machine used at polling station shall bear a label marked with—

(a) the serial number, if any, and the name of the constituency ;

(b) the serial number and name of the polling station or stations as the case may be ;

(c) the serial number of the unit ; and

(d) the date of poll.

(2) Immediately before the commencement of the poll, the presiding officer shall demonstrate to the polling agents and other persons present that no voter has been already recorded in the voting machine and it bears the label referred to in sub-paragraph (4) of Paragraph 4.

(3) A paper seal shall be used for securing the control unit of the voting machine, and the presiding officer shall affix his own signature on the paper seal and obtain thereon the signature of such of the polling agents present as the desirous of affixing the same.

(4) The presiding officer shall thereafter fix the paper seal so signed in the space meant therefor in the control unit of the voting machine and shall secure and seal the same.

(5) The seal used for securing the control unit shall be fixed in such manner that after in unit has been sealed, it is not possible to press the " result button " without breaking the seal.

(6) The control unit shall be closed and secured and placed in full view of the presiding officer and the polling agents and the balloting unit or units placed in the voting compartment.

8. *Marked copy of electoral roll.*—Immediately before the commencement of the poll, the presiding officer shall also demonstrate to the polling agents and other present that the marked copy of the electoral roll to be used during the poll does not contain,—

(a) any entry other than that made in pursuance of sub-rule 2 (b) of rule 3 of the Postal Ballot Order, 2001;

(b) any mark other than the mark made in pursuance of sub-rule 2 (b) of rule 5 of the Postal Ballot Order, 2001.

9. *Facilities for women electors.*—(1) Where a polling station is for both men and women electors, the presiding officer may, if situation so demands, direct that they shall be admitted into the polling station alternately in separate batches.

(2) The returning officer or the presiding officer may appoint a woman to serve as an attendant at any polling station to assist women electors and also to assist the presiding officer generally in taking the poll in respect of women electors, and in particular, to help / frisking any woman elector in case it becomes necessary.

10. *Identification of electors.*—The procedure should be adopted as prescribed under the provisions of rule 26 of Greater Mumbai Municipal Corporation Election Rules, 1990, rule 24 of Bombay Provincial Municipal Corporation Election Rules, rule 10 of Election Rules of Nagpur Municipal Corporation.

11. *Facilities for public servants on election duty.*—(1) The public servants who are appointed for duty on polling stations and who produce an election duty certificate in Form PB-2 prescribed under rule 11 of the Postal Ballot Order and seeks permission to cast his vote at that polling station although it is different from the one where he is entitled to vote.

(2) On production of such certificate, the Presiding Officer shall—

(*i*) on production of election duty certificate, the Presiding Officer shall obtain thereon the signature of the person producing the same.

(*ii*) The Presiding Officer shall have the person's name and electoral roll number as mentioned in the certificate entered at the end of the marked copy of the electoral roll ; and

(*iii*) permit him to vote in the same manner as any voter register in that polling station would be entitled to vote.

12. *Challenging of Identity.*—The procedure prescribed under rule 25 of Greater Mumbai Municipal Corporation Election Rules, 1990, rule 27 of Bombay Provincial Municipal Corporations Election Rules, rule 12(d) of Election Rules of Nagpur Municipal Corporation shall apply.

13. *Safeguards against personation.*—In this connection, the rules prescribed under and orders of the State Election Commission under section 18AA of the Mumbai Municipal Corporation Act, section 14A of the Bombay Provincial Municipal Corporations Act and section 9C of the City of Nagpur Corporation Act.

14. *Procedure for voting by voting machines.*—(1) Before permitting an elector to vote, the polling officer shall—

(a) record the electoral roll number of the elector as entered in the marked copy of the electoral roll in a register of voters in Form VM-I.

(b) obtain the signature or the thumb impression of the elector on the said register of votes ; and

(c) mark the name of the elector in the marked copy of the electoral roll to indicate that he has been allowed to vote :

Provided that no elector shall be allowed to vote unless he has his signature or thumb impression on the register of voters in Form VM-I.

(2) It shall be necessary for any presiding officer or polling officer or any other officer to attest the thumb impression of the elector on the register of voters.

15. *Maintenance of secrecy of voting by electors within the polling station and voting procedure.*—(1) Every elector who has been permitted to vote under Paragraph 14 of this Order shall maintain secrecy of voting within the polling station and for that purpose observe the voting procedure hereinafter laid down.

(2) Immediately on being permitted to vote the elector shall proceed to the presiding officer or the polling officer in charge of the control unit of the voting machine who shall, by pressing the appropriate button on the control unit, activate the balloting unit or units for recording of elector's vote.

(3) The elector shall thereafter forthwith—

(a) proceed to the voting compartment ;

(b) record his vote by pressing the button on the balloting unit against the name and symbol of the candidate for whom he intends to vote ; and

(c) come out of the voting compartment and leave the polling station.

(4) Every elector shall vote without undue delay.

(5) No elector shall be allowed to enter the voting compartment when another elector is inside it.

(6) If an elector who has been permitted to vote under Paragraph 14 or 18 of this Order refuses after warning given by the presiding officer to observe the procedure laid down in sub-paragraph (3) above, the presiding officer or a polling officer under the direction of the presiding officer shall not allow such elector to vote.

(7) Where an elector is not allowed to vote under sub-paragraph (6) above, a remark to the effect that voting procedure has been violated shall be made against the elector's name in the register of voters in Form VM-I by the presiding officer under his signature.

101

16. *Recording of votes of blind or infirm electors.*—(1) If the presiding officer is satisfied that owing to blindness or other physical infirmity, a voter is unable to recognise the symbols on the balloting unit or units of the voting machine or unable to record his vote by pressing the appropriate button thereon without assistance the presiding officer shall permit the elector to take with him a companion of not less than twenty-one years of age to the voting compartment for recording the vote on his behalf and in accordance with his wishes :

Provided that no person shall be permitted to act as the companion of more than one voter at any polling station on the same day :

Provided further that before any person is permitted to act as the companion of a voter on any day under this rule, he shall be required to give declaration that he will keep secret the vote recorded by him on behalf of the voter and that he has not already acted as the companion of any other voter at any other polling station on that day ;

(2) The presiding officer shall keep a record in Form VM-V of all cases under this rule.

17. *Elector deciding not to vote.*—If an elector, after his electoral roll number has been duly entered in the register of voters in Form VM-I and has put his signature or thumb impression thereon as required under sub-paragraph (1) of paragraph 14 of this Order, decided not to record his vote, a remark to this effect shall be made against the said entry in Form VM-I by the presiding officer and the signature or thumb impression of the elector shall be obtained against such remark.

18. *Tendered votes.*—(1) If a person representing himself to be a particular elector seeks to vote after another person has already voted as such elector, he shall, on satisfactorily answering such questions relating to his identity as the presiding officer may ask, be, instead of being allowed to vote through the balloting unit, supplied with a tendered ballot paper which shall be of such design, and the particulars of which shall be in such language or languages as the State Election Commission may specify.

(2) Every such elector shall before being supplied with tendered ballot paper write his name against the entry relating to him in Form VM-II.

(3) On receiving the ballot paper he shall forthwith—

(*a*) proceed to the voting compartment;

(*b*) record their / his vote on the ballot paper by placing a cross mark 'X' with the instrument or article supplied for the purpose on or near the symbol of the candidate for whom he intends to vote.

(*c*) fold the ballot paper so as to conceal his vote.

(*d*) show to the presiding officer, if required, the distinguishing mark on the ballot paper.

(*e*) give it to the presiding officer who shall place it in a cover specially kept for the purpose; and

(*f*) leave the polling station.

(4) If owing blindness or physical infirmities, such elector is unable to record his vote without assistance; the presiding officer shall permit him to take with him a companion, subject to the same conditions and after following the same procedure as laid down in Paragraph 16 of this Order for recording the vote in accordance with his wishes.

19. *Presiding Officer's entry in the voting compartment during poll.*—(1) The presiding officer may whenever he considers it necessary to do so, enter the voting compartment during poll and take such steps as may be necessary to ensure that the balloting unit or units is not tampered or interfered with in any way.

(2) If the presiding officer has reason to suspect that an elector who has entered the voting compartment is tampering or otherwise interfering with the balloting unit or units or has remained inside the voting compartment for unduly long period, he shall enter the voting compartment and take such steps as may be necessary to ensure the smooth and orderly progress of the poll.

(3) Whenever the presiding officer enters the voting compartment under this Order, he shall permit the polling agents present to accompany him if they so desire.

20. *Closing of Poll.*—(1) The presiding officer shall close a polling station at the hour fixed in that behalf by the State Election Commission and shall not thereafter admit any elector into the polling station :

Provided that all electors present at the polling station before it is closed shall be allowed to cast their votes.

(2) If any question arises whether an elector was present at the polling station before it was closed, it shall be decided by the presiding officer and his decision shall be final.

21. *Account of votes recorded.*—(1) The presiding officer shall at the close of the poll prepare an account of votes recorded in Form VM-III and enclose it in a separate cover with the words 'Account of Votes Recorded' superscribed thereon.

(2) The presiding officer shall furnish to every polling agent present at the close of the poll a true copy of the entries made in Form VM-III after obtaining a receipt from the said polling agent therefor and shall attest it as a true copy.

22. *Sealing of voting machine after poll.*—(1) As soon as practicable after the closing of the poll, the presiding officer shall close the control unit to ensure that no further votes can be recorded and shall detach the balloting unit from control unit.

(2) The control unit and the balloting unit shall thereafter be sealed, and secured separately in such manner as the State Election Commission may direct and the seal used for securing them shall be so affixed that it will not be possible to open the units without breaking the seals.

(3) The polling agents present at the polling station, who desire to affix their seals, shall also be permitted to do so.

23. *Sealing of other packets.*—(1) The presiding officer shall then make into separate packets,—

(a) The marked copy of the electoral roll;

(b) the register of voters in Form VM-I;

(c) the cover containing the tendered ballot papers and the list in Form VM-II;

(d) the list of challenged votes in prescribed Form ; and

(e) any other papers directed by the State Election Commission to be kept in a sealed packet.

(2) Each packet shall be sealed by the presiding officer with the signature or thumb impression either of the candidate or of his election agent or of his polling agent who may be present at the polling station and may desire to sign or make thumb impression thereon.

24. *Transmission of voting machines, etc., to the returning officer.*—(1) The presiding officer shall than deliver or cause to be delivered to the returning officer at such place as the returning officer may direct,—

(a) the voting machine;

(b) the account of votes recorded in Form VM-III;

(c) the sealed packets referred to in Paragraph 23 of this Order; and

(d) all other papers used at the poll.

(2) The returning officer shall make adequate arrangements for the safe transport of the voting machine, packets and other papers for their safe custody until the commencement of the counting of votes.

25. *Procedure on adjournment of poll.*—(1) If the poll at any polling station is adjourned as per the provisions of section 28H of the Mumbai Municipal Corporation Act, rule 32 of Bombay Provincial Municipal Corporations Election Rules, rule 9A of Election Rules of Nagpur Municipal Corporation, the provision of Paragraph 21 to 24 of this Order shall, as far as practicable, apply as if the poll was closed at the hour fixed in that behalf.

(2) When an adjourned poll is recommenced under the above said provisions, the electors who have already voted at the poll so adjourned shall not be allowed to vote again.

(3) The returning officer shall provide the presiding officer of the polling station at which such adjourned poll is held, with the sealed packet containing the marked copy of the electoral roll, register of voters in Form VM-I and a new voting machine.

(4) The presiding officer shall open the sealed packet in the presence of the polling agents present and use the marked copy of the electoral roll for marking the names of the electors who are allowed to vote at the adjourned poll.

(5) The provisions of Paragraph 4 to 24 of this Order shall apply in relation to the conduct of an adjourned poll before it was so adjourned.

26. *Scrutiny and inspection of voting machines.*—(1) The returning officer may have the control units of the voting machines used at more than one polling station taken up for scrutiny and inspection and votes recorded in such units counted simultaneously.

(2) Before the votes recorded in any control unit of a voting machine are counted under sub-paragraph (1), the candidate or his election agent or his counting agent present at the counting table shall be allowed to inspect the paper seal and such other vital seals as might have been affixed on the unit and to satisfy themselves that the seals are intact.

(3) The returning officer shall satisfy himself that none of the voting machines has in fact been tampered with.

(4) If the returning officer is satisfied that any voting machine has in fact been tampered with, he shall not count the votes recorded in that machine and shall follow the procedure for fresh poll laid down in the provisions of section 28H of the Mumbai Municipal Corporation Act, rule 32 of Bombay Provincial Municipal Corporation Election Rules, rule 9A of Election rules of Nagpur Municipal Corporation.

27. *Counting of votes.*—(1) After the returning officer is satisfied that a voting machine has in fact not been tampered with, he shall have the votes recorded therein counted by pressing the appropriate button marked "Result" provided in the control unit whereby the total votes polled and votes polled by each candidate shall be displayed in respect of each such candidate on the display panel provided for the purpose in the unit.

(2) As the votes polled by each candidate are displayed on the control unit, the returning officer shall have,—

(a) the number of such votes recorded separately in respect of each candidate in Form VM-IV,

(b) Form VM-IV completed in other respects and signed by the counting supervisor and also by the candidates or their election agents or their counting agents present; and

(c) corresponding entries made in a result sheet in Form VM-IV and the particulars so entered in the result sheet announced.

28. *Sealing of Detachable Additional Memory.*—(1) After the result of voting recorded in control unit has been ascertained candidate-wise and entered in Form VM-IV and in the form prescribed for this purpose, the returning officer shall seal the detachable additional memory with his seal and the seals of such of the candidates or their election agents present who may desire to affix their seals thereon so however that the result of voting recorded in the detachable additional memory is not obliterated and the detachable additional memory retains the memory of such result.

(2) The detachable additional memory so sealed shall be kept in specially prepared boxes on which the returning officer shall record the following particulars, namely :—

(a) the name of the constituency, Municipal Corporation (Ward/Seat number) ;

(b) the particulars of the polling station or stations where the control unit has been used;

(c) serial number of the control unit;

(d) date of poll; and

(e) date of counting;

29. *Custody of Detachable Additional Memory and papers relating to election.*—(1) All detachable additional memories used at an election shall be kept in the custody of the concerned Municipal Commissioner, or the Officer authorised by him.

(2) The Municipal Commissioner or the Officer authorised by him shall keep in the safe custody—

(a) the packets of marked copy of the electoral roll;

(b) the packets containing register of voters in Form VM-I;

(c) the packets containing the number of votes recorded in respect of each candidate in Form VM-IV;

(d) all other papers relating to election;

आपला विश्वासू,

स्वाक्षरी-------------------

ठिकाण --------------

दिनांक ---------------

------------- महानगरपालिका मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी व * यांना प्रत रवाना.

सही ---------------

( मतदान केंद्राध्यक्ष )

### पावती

मतदान केंद्राध्यक्षाने पाठविलेले पत्र व त्यात जिचा उल्लेख केला आहे ती व्यक्ती------- ------------ (दिनांक) रोजी ------------------- (वाजता) माझ्या हवाली करण्यात आला.

सही -------------------

* येथे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याचे पदसिध्द पदनाम घालावे.

जोडपत्र - १६

मतदान संपल्यानंतर बॅटरी सुरु राहून मतमोजणीच्यावेळी
बॅटरी संपून निकाल दिसत नसल्यास करावयाची कार्यवाही

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र. १८/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- १३ जून, २००५.**

## आ दे श

राज्य निवडणूक आयोगाने अशा सूचना दिल्या आहेत की, मतदान संपल्यानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राचा पॉवर सप्लाय (बॅटरी) बंद करण्यात यावा तरीही काही वेळा मतदान केंद्राध्यक्ष पॉवर सप्लाय बंद न करता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र निवडणूक निर्णय अधिका-यांकडे जमा करतात. अशा परिस्थितीत मतमोजणीच्यावेळी बॅटरी संपून गेल्याने निवडणुकीचा निकाल दिसू शकत नाही. हा निकाल पाहण्यासाठी बॅटरी कप्प्याचे सील तोडून नवी बॅटरी त्या मतदान यंत्रात घालण्यात यावी. असे करण्यापूर्वी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सोबत जोडल्याप्रमाणे घोषणापत्र (Declaration) लिहून त्यावर सर्व उपस्थित उमेदवार/मतमोजणी प्रतिनिधी यांच्या सहया घ्याव्यात.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

**प्रति-**
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

C:\DOCUME~१\PATIL\MYDOCU~१\aab७१.doc

दिनांक ...१५/६/२००५...

# परिशिष्ट

## घोषणापत्र

------------------------- महानगरपालिका/नगर परिषद/नगर पंचायत/जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक/पोट निवडणूक-

प्रभाग क्रमांक/मतदार गट क्रमांक/मतदार गण क्रमांक----------------------------
मतदान केंद्र क्रमांक -------------------------
कंट्रोल युनिट क्रमांक- -----------------------

वर नमूद केलेल्या कंट्रोल युनिटमधील बॅटरी संपलेली असल्याने ती बॅटरी बदलण्यात येत आहे. संपलेल्या बॅटरीचा क्रमांक- --------------- होता व नवीन बॅटरी जी घालण्यात आली आहे तिचा क्रमांक ----------------- असा आहे.

निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक-
ठिकाण-
वेळ-

उमेदवार/मतमोजणी प्रतिनिधी यांच्या सहया

C:\DOCUME~१\PATIL\MYDOCU~१\aab७१.doc

जोडपत्र -१७

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदान केंद्र निश्चिती व पुरवावयाच्या सोयी सुविधा

१५e

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in
दिनांक - २६ जून, २०२५

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.३४/का-५,दि. २४ डिसेंबर, २००५.
२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०११/प्र.क्र.२०/का-५, दि. ५ डिसेंबर, २०११.
३) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ-२०१५/प्र.क्र.०९/ प्रकल्प कक्ष,दि. २७ मे, २०१५.
४) राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/मनपा-२०१६/ प्र.क्र.०४ /का-५, दि. ९ मार्च, २०१६ व दि. २७ जून, २०२२.

## आदेश

भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २४३ के, २४३ झेडए नुसार राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुदतीत, निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडणे तसेच या निवडणुकांचे नियंत्रण, संचालन व अधिक्षण करण्याची सांविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखालील निवडणूक नियम १४, मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २९ व त्याखालील नियमातील नियम, १८, महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ च्या नियम ८, महाराष्ट्र जिल्हा परिषदा (मतदार विभाग आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम ७, महाराष्ट्र पंचायत समित्या (निर्वाचक गण आणि निवडणूक घेणे) नियम, १९६२ च्या नियम ९ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाखालील संबंधित निवडणूक नियमातील तरतुदीनुसार प्रत्येक निवडणुकीपूर्वी मतदान केंद्रांची निश्चिती करुन त्याची यादी प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता लागू असलेल्या प्रभाग पध्दतीनुसार ( म्हणजेच एक सदस्यीय, द्विसदस्यीय, तीन सदस्यीय, चार सदस्यीय, थेट नगराध्यक्ष / सरपंच इत्यादीनुसार ) प्रत्येक प्रभागासाठी आवश्यक असलेली मतदान केंद्रे निश्चित करणे, अशा केंद्रांना जोडावयाच्या मतदारांची संख्या ठरविणे, सदर प्रक्रियेत राजकीय पक्षांना विश्वासात घेणे तसेच मतदारांना मतदानाचा हक्क बजावणे सुकर होण्याकरीता त्या ठिकाणी योग्य त्या सोयी सुविधा पुरविणे इत्यादी मुद्यांचा समावेश असलेले एकत्रित आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे.

आणि त्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ च्या कलम ९-ए(४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन तसेच यासंदर्भात यापूर्वी दिलेल्या संदर्भाधिन आदेश इत्यादीचे अधिक्रमण करुन राज्य निवडणूक आयोग खालील प्रमाणे सुधारीत आदेश देत आहे. :-

१) <u>मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या</u> -

i) स्थानिक स्वराज्य संस्थांचा मतदार संघ हा प्रभागात / जिल्हा परिषद निवडणूक विभाग (गट ) / पंचायत समिती निर्वाचक गणामध्ये (गण) विभागलेला असतो व प्रत्येक प्रभाग हा भौगोलिकदृष्टया सलग भाग असतो. सबब, प्रत्येक ग्रामपंचायत, नगर परिषद, नगर पंचायत महानगरपालिकेसाठी प्रत्येक प्रभागात व जिल्हा परिषद / पंचायत समितीसाठी प्रत्येक गावाकरीता किमान १ मतदान केंद्र असणे आवश्यक आहे.

ii) स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक सदस्यीय / बहुसदस्यीय प्रभाग पध्दती यथास्थिती लागू असते. मतदारास द्यावयाच्या मतांच्या संख्येमध्ये वाढ झाल्यास त्याच्या मतदानाच्या कालावधीमध्ये वाढ होते. त्यामुळे मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची संख्या मर्यादित ठेवणे आवश्यक आहे.

iii) विविध स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये त्यांना त्या-त्या वेळी लागू असलेल्या एक सदस्यीय / बहुसदस्यीय प्रभाग पध्दती अथवा अध्यक्ष / सरपंच थेट निवडणूक यानुसार मतदान केंद्रावर

खालीलप्रमाणे कमाल मतदार जोडण्यात यावेत.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | प्रभाग पध्दती | मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | एक सदस्यीय | १००० ते १२०० |
| २ | इतर महानगरपालिका | एक सदस्यीय | १००० ते १२०० |
| | | द्विसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | त्रिसदस्यीय | ८०० ते ९०० |
| | | चार सदस्यीय | ७०० ते ८०० |
| | | पाच सदस्यीय | ६०० ते ७०० |
| ३ | नगरपरिषद | एक सदस्यीय | १००० ते १२०० |
| | | एक सदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ९०० ते १००० |
| | | द्विसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | द्विसदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ८०० ते ९०० |
| | | त्रिसदस्यीय | ७०० ते ८०० |
| | | त्रिसदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ६०० ते ७०० |
| ४ | नगरपंचायत | एक सदस्यीय | १००० ते १२०० |
| | | एक सदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ९०० ते १००० |
| ५ | जिल्हापरिषद / पंचायत समिती | एकत्र निवडणूक | ८०० ते ९०० |
| | | स्वतंत्र निवडणूक* | ९०० ते १००० |
| ६ | ग्रामपंचायत | बहुसदस्यीय | ८०० ते ९०० |
| | | बहुसदस्यीय (थेट सरपंचासह) | ७०० ते ८०० |

* जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती यापैकी एकाच पदाची निवडणूक असल्यास वर स्वतंत्र निवडणूक असे नमूद आहे त्यानुसार मतदार संख्या ठेवावी.

टीप १ - पोटनिवडणूक असल्यास किती पदांची निवडणूक आहे त्यानुसार मतदार संख्या ठेवावी.

टीप २ - दुर्गम भाग/विरळ लोकवस्ती अथवा विखुरलेल्या वाड्या, वस्त्या व तांडे यामध्ये कमी लोकसंख्येकरीता देखील मतदान केंद्र ठेवता येईल.

टीप ३ - मतदान केंद्रास जोडावयाच्या कमाल आणि किमान संख्येमध्ये स्थानिक परिस्थिती व मागील निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार १० % कमी अथवा अधिक मतदार जोडता येतील.

iv) मागील निवडणुकांतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन अशा केंद्रांवर आवश्यकता असल्यास अतिरिक्त मतदान अधिकारी नेमावा.

२) <u>मतदान केंद्राचे ठिकाण निवडणे</u> -

i. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका साधारणत: प्रभागनिहाय किंवा गट / गणनिहाय होत असतात. त्यामुळे मतदान केंद्राचे ठिकाण निवडताना एका प्रभागातील किंवा गावातील मतदाराला २ कि.मी. पेक्षा जास्त प्रवास करावा लागू नये अशा रितीने मतदान केंद्राचे ठिकाण शक्यतो त्याच प्रभागात किंवा गावात असावे. मतदान केंद्राचे ठिकाण हे साधारणत: मतदारास सहजरित्या मिळू शकेल अशा मध्यवर्ती ठिकाणी असावे. परंतु दुर्गम भागात / विरळ लोकसंख्या / भौगोलिक कारणास्तव विखुरलेल्या वाड्या, वस्त्या व तांडे यामध्ये कमी मतदारांसाठी देखील मतदान केंद्र उभारण्याची गरज भासल्यास मतदान केंद्र उभारावे.

ii. नागरी / ग्रामीण क्षेत्रातील एखाद्या प्रभागात मतदान केंद्रासाठी योग्य जागा उपलब्ध नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत लगतच्या प्रभागात मतदान केंद्र ठेवता येईल, मात्र त्याकरीता यथास्थिती संबंधित महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

iii. साधारणत: लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांकरीता मतदान करताना ज्या मतदान केंद्राच्या ठिकाणी मतदार मतदान करतात त्याच इमारतीमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी देखील मतदान केंद्र असावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सर्वसाधारणपणे तसेच गत निवडणुकीत झालेले मतदान विचारात घेऊन तसेच कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेऊन एकाच इमारतीमध्ये शक्यतो १० पेक्षा जास्त मतदान केंद्र ठेवण्यात येऊ नयेत.

iv. मतदान केंद्राचे ठिकाण निश्चित करताना शक्यतो मतदान केंद्राच्या बाहेर लोकांना रांगेत उभे राहण्यासाठी मोकळी जागा असावी. आवश्यकता भासल्यास मंडप टाकण्याची सोय असावी. तसेच मुख्य प्रवेशद्वार मोठे असावे.

v. मतदान केंद्र शक्यतो पक्क्या इमारतीत असावे व सदर इमारत शक्यतो शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था किंवा धर्मादाय संस्था यांच्या मालकीची असावी. जेणेकरुन, टेबल-खुर्च्या व इतर सुविधा पुरविणे सुलभ होऊ शकेल तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीनेदेखील सदर ठिकाण योग्य ठरेल. तसेच आवश्यकता भासल्यास खाजगी इमारतीत मतदान केंद्र स्थापन करण्याची स्थिती निर्माण झाल्यास संबंधित महानगरपालिका आयुक्त किंवा जिल्हाधिकारी यांनी सर्व कारणमिमांसा जाणून घेऊन अशा मतदान केंद्रांना परवानगी द्यावी. मात्र सदर ठिकाण हे कोणत्याही राजकीय पक्ष किंवा उमेदवारांशी संबंधित नाही याची दक्षता घेण्यात यावी.

vi. मतदान केंद्राची जागा किमान २० चौ. मीटर असावी. तिथे मतदान केंद्राध्यक्ष, ४ मतदान अधिकारी, उमेदवारांचे मतदान प्रतिनिधी आणि बॅलेट युनिट व कंट्रोल युनिटच्या संख्येनुसार पुरेशी जागा व आडोसा असलेला मतदान कक्ष स्थापन करता येईल याची खात्री करावी.

vii. खाजगी इमारतीतील मतदान केंद्राबाबत, अंतिम उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर त्या इमारतीत कोणत्याही पक्षाचे कार्यालय / उमेदवार राहत नसल्याची अथवा त्यांची मालकी नसल्याची खात्री करण्यात यावी. असल्यास मतदान केंद्र अन्य ठिकाणी हलविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

viii. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास मतदान प्रक्रिया सुरु होण्याच्या किमान २४ तास अगोदर असे मतदान केंद्र संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी ताब्यात घ्यावे.

ix. मतदान केंद्र शक्यतो तळमजल्यावर असावे. शहरी भागात ते अपवादात्मक परिस्थितीत पहिल्या मजल्यावर असल्यास तेथे उद्वाहनाची (लिफ्टची) सोय असावी. लिफ्टची व्यवस्था नसल्यास मतदारांना वरच्या मजल्यावरील मतदान केंद्रात जाण्याकरीता योग्य ती व्यवस्था करावी.

x. मतदान केंद्राचा १०० मीटर त्रिज्येचा परिघ हा मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यात राहील. मतदान केंद्र खाजगी इमारतीत असल्यास सदर मतदान केंद्राच्या १०० मिटर त्रिज्येच्या परिघात खाजगी इमारतीचा मालक व त्याचे सुरक्षा रक्षक प्रवेश करणार नाहीत.

xi. कोणतेही मतदान केंद्र कोणत्याही परिस्थितीत पोलीस स्टेशन, रुग्णालय अथवा धार्मिक स्थळाच्या इमारतीत ठेवता येणार नाही.

३) <u>मतदान केंद्राच्या ठिकाणात अपवादात्मक परिस्थितीमध्ये बदल करणे</u> -

मतदान केंद्र निश्चित केल्यानंतर व त्याची यादी प्रसिध्द झाल्यानंतर जर काही कारणास्तव अपवादात्मक परिस्थितीत मतदान केंद्राचे स्थान किंवा इमारतीमध्ये बदल करावयाचा असल्यास संबंधित उमेदवारांशी विचार विनिमय करुन महानगरपालिकांच्या निवडणुकांबाबत संबंधित महानगरपालिका आयुक्त व इतर निवडणुकांच्याबाबतीत संबंधित जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य राहील व तसा बदल केल्यानंतर त्याबाबत राज्य निवडणूक आयोगास अवगत करणे आवश्यक राहील.

४) <u>निवडणुकांकरीता कर्मचारी, जागा आणि वाहने अधिग्रहीत करणे</u> -

राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक-एसईसी.१०९५/३०६/डेस्क-३, दि.०२ मार्च, १९९५ अन्वये, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता कर्मचारी, जागा आणि वाहने अधिग्रहीत करण्याबाबत

सविस्तर आदेश काढले आहेत. या आदेशाचा अवलंब करुन निवडणुकांकरीता आवश्यक असलेल्या मतदान केंद्रांसाठी जागा उपलब्ध करुन घेता येतील.

५) <u>मतदान केंद्रावर पुरवावयाच्या सोयी सुविधा</u> –

i. **वीज पुरवठा** – मतदान केंद्र स्थित असलेल्या इमारतीमध्ये अखंडीत वीज पुरवठा व्यवस्था असावी. यासोबतच केंद्रावर पुरेसा उजेड व खेळती हवा, पंखे इ. सोयी सुविधा असतील याची खातरजमा करावी. मतदान केंद्र निश्चितीच्या तपासणीवेळी तेथील दिवे, पंखे, बटण, वायरिंग इ. ची तपासणी करून घ्यावी. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या क्षेत्रात लोड शेडिंग असणार नाही यासाठी संबंधित वीजपुरवठा यंत्रणेला ( उदा. MSEDCL / ADANI / RELIANCE / BEST इ.) आवश्यक आदेश देण्यात यावेत. तसेच आवश्यकतेनुसार जनरेटरचीही सोय ठेवावी.

ii. **पिण्याच्या पाण्याची व्यवस्था** – मतदान केंद्रावर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय आहे याची खात्री करावी. यासोबतच पाणी पिण्याकरीता आवश्यकतेनुसार ग्लास, पाणी साठवण्याकरीता भांडे / मडके इ. सोय करण्यात यावी. नेमलेल्या सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्यासाठी विशेषत: उन्हाळयात २० लिटर पिण्याच्या पाण्याचे पॅकबंद कॅन शक्यतो उपलब्ध करुन द्यावेत.

iii. **शौचालयाची व्यवस्था** – मतदान केंद्र परिसरात स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र शौचालये आहेत याची खात्री करावी. मतदानाच्या दिवशी प्रसाधनगृहाच्या स्वच्छतेबाबतही काळजी घ्यावी. तसेच तेथे पुरेशी पाण्याची व्यवस्था असावी.

iv. **मतदान केंद्रावर किमान आवश्यक फर्निचर** – मतदान केंद्रावर टेबल, खुर्च्या, पंखे, बेंच, मतदारांना रांगेत उभे राहण्याच्या जागेवर सावलीसाठी शेडस् इत्यादीची उपाययोजना करावी. मतदान केंद्रात जाणे-येणे कामी स्वतंत्र Entry-Exit असावे. जेथे अशी सोय नसेल तेथे बांबूची किंवा दोरीची बॅरीकेटिंग करून घ्यावी.

v. **रॅम्पची सुविधा** – वृध्द / दिव्यांग व्यक्तींना मतदान केंद्रावर जाणे सुकर व्हावे म्हणून रॅम्पची सोय असावी. कायमस्वरुपी रॅम्प नसल्यास तात्पुरती व्यवस्था करावी. तसेच व्हीलचेअरची देखील सुविधा असावी.

vi. **अपंग मतदारांकरीता तळ मजल्यावर केंद्र** – निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेली प्रारुप मतदार यादी हरकती व सूचना मागविणेसाठी प्रसिध्द करण्यात येते. याच कालावधीमध्ये संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अपंग मतदारांना आपली नावे देण्याचे आवाहन करण्यात यावे.

त्यांनी नाव देताना आपला मतदार यादी क्रमांक व मतदार क्रमांक नमूद करावा, अशी विनंती करावी जेणेकरुन मतदान केंद्र निश्चित करताना त्यांची गैरसोय होणार नाही.

जे अपंग मतदार आपली नावे देतील त्याबाबत संबंधित मतदार यादी तयार करणारे अधिकारी यांची जबाबदारी राहील की, त्या मतदारांची नावे तळमजल्यावरील मतदान केंद्रात येतील. जर एका इमारतीमध्ये तळमजल्यावर व वरच्या मजल्यावर मतदान केंद्रे असतील आणि जर अपंग मतदाराचे नाव वरच्या मजल्यावरील मतदान केंद्राच्या मतदार यादीत असेल तर ते तेथून कमी करुन तळमजल्यावरील मतदान केंद्राशी जोडून संबंधित मतदार यादीमध्ये पुरवणी म्हणून जोडण्यात यावे.

vii. **मा. उच्च न्यायालयाचे आदेश** – मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल झालेली जनहित याचिका क्र. ७८/२०१७ इंद्रधनु विरुध्द भारत सरकार व इतर मध्ये दि. १३ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या आदेशाची प्रत राज्य निवडणूक आयोगाने दि. २८ नोव्हेंबर, २०१७ च्या पत्रान्वये सर्व जिल्हाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना पाठविली आहे. त्यानुसार वरील (v) व (vi) मध्ये नमूद केलेल्या सुविधा सर्व मतदान केंद्रांवर परिणामकारकरित्या पुरविल्या जातील याची संबंधित महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी खात्री करुन घ्यावी. जर अशा सुविधा पुरविल्या गेल्या नाहीत अथवा त्यामध्ये त्रुटी राहिल्यास संबंधित निवडणूक अधिकारी यांना त्याबाबत व्यक्तीशः जबाबदार धरण्यात येईल असे निर्देश मा. न्यायालयाने दिले आहेत.

viii. **ऋतुनिहाय करावयाच्या उपयायोजना** –

अ) **उन्हाळ्यातील उपाययोजना** – उन्हाळ्यात होणाऱ्या निवडणुका लक्षात घेता उष्माघाताचा त्रास होऊ नये म्हणून मतदान पथकासोबत आवश्यक ती औषधे, पिण्याचे पाणी, साखर-मीठाच्या पुड्या इ. वस्तू मतदान साहित्यासोबत द्याव्यात.

ब) **पावसाळ्यातील उपाययोजना** – पावसाळ्यात मतदान केंद्राबाबत तितकीच काळजी घेणे आवश्यक असून मतदान केंद्रात छपरातून पाणी गळणे वा चिखलसदृश्य परिस्थिती निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी. त्यासाठी मतदान केंद्राच्या छपरावर आवश्यक असल्यास ताडपत्रीची व्यवस्था करण्यात यावी. मतदारांना रांगेत उभे राहण्याकरीता पावसापासून संरक्षण मिळेल अशी योग्य ती व्यवस्था करावी. याशिवाय दुषित पाण्यामुळे होणारे आजार इत्यादीबाबत घ्यावयाच्या काळजीबाबतच्या सूचनांना व्यापक प्रसिध्दी द्यावी. आवश्यकतेप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सेवा अधिग्रहित करून घ्याव्यात व त्यांना क्षेत्रीय अधिकाऱ्यांसोबत आवश्यक त्या

औषधांसह फिरतीवर ठेवावे. आवश्यकतेनुसार प्राथमिक आरोग्य केंद्र, १०८ क्रमांकाच्या फिरत्या रुग्णवाहिका यांनाही आवश्यक ते निर्देश देण्यात यावेत.

ix. **कुष्ठरोग्यांसाठी स्वतंत्र मतदान केंद्र** - मतदार संघात कुष्ठरोग्यांसाठी वेगळे वसतिगृह /आश्रम असल्यास त्यांच्यासाठी स्वतंत्र मतदान केंद्र असण्यास हरकत नाही. उपलब्ध असल्यास त्यामध्ये काम करणारे अधिकारी/डॉक्टर्स/इतर कर्मचारी यांना मतदान केंद्राध्यक्ष/अधिकारी म्हणून नेमावे.

x. **असुरक्षित घटक** - असुरक्षित घटकांना मतदान प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेण्याकामी आवश्यकतेनुसार स्वतंत्र मतदान केंद्र निर्माण करण्यास हरकत नाही. अशा मतदान केंद्रांवर ५०० मतदारांपेक्षाही कमी मतदार असले तरी त्यास हरकत राहणार नाही. यासोबतच अशा मतदारांना जाणुन बुजून दूरवरच्या वा जिथे त्यांना मतदानास प्रतिबंध केला जाईल अशा विभागातील मतदान केंद्रास जोडले जाणार नाही याची काळजी घ्यावी.

मतदार संघात असणाऱ्या असुरक्षित / कमजोर मतदारांचा समूह / विभाग असल्यास ते शोधून काढणे, त्यांना जोडलेल्या मतदान केंद्रावर विशेष दक्षता घेणेबाबत भारत निवडणूक आयोगाकडून महत्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत, त्या सूचनांचे तंतोतंत पालन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही करण्यात यावे.

xi. **६० वर्षावरील नागरिक, अपंग, दिव्यांग, गरोदर स्त्रिया इ.करीता प्राधान्याने प्रवेश** - ६० वर्षावरील नागरिक / अपंग / दिव्यांग / गरोदर स्त्रिया / तान्ह्यामुलासह असणाऱ्या स्त्रिया यांना प्राधान्याने मतदान करू द्यावे. असे करीत असताना इतर मतदारांकडून सर्व प्रकारचे सहकार्य मिळविणेकामी राज्य निवडणूक आयोगाच्या सदरच्या सूचनांना योग्य प्रसिध्दी द्यावी. अशा मतदारांना मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी स्वत:चे किंवा कुटुंबियांचे वाहन वापरण्याची परवानगी असेल.

xii. **स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र** रांगा - शक्य असेल तेथे स्त्री-पुरुषांसाठी स्वतंत्र रांगा ठेवाव्यात, जिथे शक्य नसेल तिथे रांगेतील एका पुरुषामागे २ स्त्रिया याप्रमाणे मतदान करू द्यावे. आवश्यकतेनुसार स्वतंत्र रांगांकरीता कमी खर्चाचे पार्टिशन तयार करून घ्यावे.

xiii. **परदानशीन स्त्रियांची ओळख पटवणे** - परदानशीन स्त्रिया किंवा ज्या मतदार संघात स्त्री मतदारांची संख्या सरासरी जास्त असूनही केवळ संकोचामुळे स्त्रिया मतदानास येत नाहीत असे आढळत असल्याने प्रत्येक मतदान अधिकाऱ्यांच्या टीममध्ये एकतरी महिला अधिकारी/कर्मचारी असावी. परदानशीन स्त्रियांची ओळख पटविणेकामी अशा महिला कर्मचाऱ्यांचा उपयोग होईल.

xiv. **मतदार सहाय्य केंद्र** - मतदान केंद्राच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ "मतदार सहाय्य केंद्र" स्थापित करावे. त्यावरील कर्मचाऱ्यांकडे चिन्हांकित मतदार यादीची एक प्रत, मतदान केंद्राचा (मतदार अनुक्रमांक .... ते .... , मतदान केंद्र क्रमांक) तपशील असावा. जेणेकरून मतदारांना त्यांची नावे शोधण्यासाठी व संबंधित मतदान केंद्रात पाठविण्यासाठी सहाय्य करणे सुलभ होईल.

xv. **माहितीचे फलक** - मतदान केंद्रावर मतदारांना माहिती देणारे फलक योग्य ठिकाणी लावावेत. उदा. मतदान केंद्राचा मार्ग दर्शविणारा दिशादर्शक नकाशा, मतदान केंद्रावरील सोयींबद्दलची ( मतदार सहाय्य केंद्र शौचालय व पाणी व्यवस्था इ. ) माहिती दर्शविणारे फलक.

६) <u>आदर्श मतदान केंद्राची निर्मिती</u> -

संबंधित महानगरपालिका आयुक्त / जिल्हाधिकारी यांनी शक्यतोवर सर्व मतदान केंद्रांवर उपरोक्त किमान सोयी सुविधा राहतील याची दक्षता घ्यावी. आदर्श मतदान केंद्राची निर्मिती करण्याच्या दृष्टीने स्थानिक संस्कृती आणि गरजेनुसार मतदान केंद्रामध्ये अतिरिक्त आकर्षण, वैशिष्ट्ये जोडली जाऊ शकतात. पर्यावरण पूरक / पुनर्वापर योग्य व जीवाणुच्या सहाय्याने कुजविता येण्यासारख्या ( बायोडिग्रेडेबल ) साहित्याचा वापर करुन मतदान केंद्रे उभारावीत व शक्य तो, ती प्लास्टीकमुक्त ठेवावीत. पर्यावरणपूरक कचरा व्यवस्थापनाची तरतूद करावी. जास्तीत जास्त मतदान केंद्रे आदर्श मतदान केंद्रे ठेवण्याचा प्रयत्न करावा.

७) <u>महिला मतदान केंद्र</u> -

एखादे मतदान केंद्र ज्यावर महिला मतदारांची संख्या अधिक आहे अशा ठिकाणी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि सुरक्षा व्यवस्थेकरीता नियुक्त पोलीस इत्यादी सर्व अधिकारी / कर्मचारी म्हणून महिलांची नियुक्ती करता येईल.

८) <u>मतदान केंद्राच्या बाहेर पक्षाचे मतदार सहाय्य केंद्र उभारणे</u> -

i. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राच्या १०० मीटर त्रिज्येच्या परिघात कोणत्याही पक्षाचे/प्रतिनिधीचे कार्यालय राहणार नाही. १०० मीटर त्रिज्येच्या परिघाच्या बाहेर प्रत्येक उमेदवारास केवळ १ मतदार सहाय्य केंद्र उभारता येईल. सदर केंद्रावर केवळ १ टेबल, २ खुर्च्या, सावलीसाठी मोठी छत्री/ताडपत्री/कापड टाकण्याची परवानगी असेल.

ii. अशा केंद्रावर ३ x ४.५ फुटापेक्षा जास्त लांबी-रुंदी नसणारा फलक लावू शकतील. त्यावर उमेदवाराचे नाव, चिन्ह, पक्षाची माहिती असेल. त्याव्यतिरिक्त कोणताही अनधिकृत फलक लावल्यास तो फलक काढून टाकण्यात यावा.

iii. मतदानाच्या दिवशी या केंद्रावर उमेदवाराचे नाव / चिन्ह / फोटो नसलेल्या केवळ मतदाराचा मतदान क्रमांक, मतदान केंद्राचा तपशील दर्शविणाऱ्या चिठ्ठया दिल्या जाऊ शकतील. परंतु त्यावर इतर कोणताही तपशील असणार नाही. उमेदवाराचे नाव / चिन्ह / फोटो असलेल्या मतदार चिठ्ठया मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आत आणता येणार नाहीत.

iv. अशा सहाय्य केंद्रावर अनावश्यक गर्दी होणार नाही वा मतदारांना एखाद्या विशिष्ट उमेदवारास मत द्यावे म्हणून भरीस पाडले जाणार नाही याची दक्षता स्थानिक पोलिसांनी घ्यावी. प्राप्त तक्रारीवर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी तात्काळ कारवाई करावी.

९) <u>मतदान केंद्रात मोबाईल / कॉर्डलेस फोन / वायरलेस फोन वापरण्यास प्रतिबंध</u> -

i. मतदान केंद्राच्या आत मतदारांना मोबाईल फोन नेण्यास बंदी आहे.

ii. मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात व मतदान केंद्रावर कर्मचारीवृंद / पोलीसांव्यतिरिक्त कोणीही मोबाईल / कॉर्डलेस फोन / वायरलेस फोन वापरणार नाही.

iii. जर विविक्षित मतदारांनी जसे की वृध्द / अपंग / दिव्यांग इत्यादी मतदार यांनी मतदान केंद्राच्या १०० मीटर परिघात मोबाईल फोन आणल्यास त्यांना असे मोबाईल फोन बंद (Switched Off) ठेवावे लागतील व मतदान केंद्राच्या आत जाण्याअगोदर बाहेर असलेल्या त्यांच्या सोबत असलेल्या व्यक्तीकडे सुपूर्द करावे लागतील.

iv. संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये प्रामुख्याने मतदान केंद्राबाहेर मतदारांकरीता मोबाईल फोन जमा करण्यासाठी कक्ष स्थापन करावा.

v. अशा कक्षावर ठळक अक्षरात "मोबाईल फोन जमा कक्ष" असा फलक लावून तो कक्ष चालविण्याकरीता विश्वासू स्वयंसेवकांची नियुक्ती करावी.

vi. अशा कक्षामध्ये मोबाईल जमा करण्याकरीता किमान १० कप्पे असलेला पीजन होल बॉक्स उपलब्ध ठेवावा.

vii. सदर कक्षामध्ये सुरक्षिततेच्या कारणास्तव सीसीटिव्ही बसविण्यात यावा जेणेकरुन मतदार मोबाईल जमा करताना व परत नेताना दिसू शकेल. तसेच मोबाईल फोन ज्या ठिकाणी ठेवण्यात येत आहे त्याचेही चित्रिकरण होईल.

viii. सदर कक्षामध्ये प्राधिकृत अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेले व मतदान केंद्राचा शिक्का असलेले क्रमांकाचे टोकन ठेवावेत.

ix. मतदाराने मोबाईल फोन बंद (स्वीच ऑफ) करुन जमा केल्यानंतर त्याचा मोबाईल फोन संबंधित पीजन होलमध्ये ठेवून त्या क्रमांकाचे टोकन त्या मतदाराला देण्यात यावे.

x. मतदाराने मतदान करुन आल्यानंतर त्याच्याकडे असलेले टोकन सदर कक्षात जमा करावे.

xi. मतदाराने टोकन जमा केल्यानंतर त्या टोकन नंबरवर असलेला मोबाईल फोन मतदारास परत करण्यात यावा व ते टोकन पुन्हा त्याच क्रमांकाच्या पीजन होल मध्ये ठेवण्यात यावे.

xii. संबंधित महानगरपालिका आयुक्त, जिल्हाधिकारी अथवा निवडणूक निर्णय अधिकारी यांना स्थानिक परिस्थिती, कायदा व सुव्यवस्था व स्वयंसेवकांची उपलब्धता इत्यादी बाबी विचारात घेऊन मतदान केंद्राच्या इमारतीमध्ये प्रामुख्याने मतदान केंद्राबाहेर मतदारांकरीता मोबाईल फोन जमा करण्यासाठी कक्ष स्थापन करणे योग्य होईल किंवा कसे याबाबत निर्णय घेता येईल.

xiii. यासंदर्भात भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. 464/INST/EPS/2025/L&O दि. २३ मे, २०२५ चे निर्देश विचारात घ्यावेत.

१०) <u>मतदान केंद्राच्या ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजना व सुरक्षा व्यवस्था इत्यादी</u> -

i. तहसिलदार / गट विकास अधिकारी / पोलीस यंत्रणा, महानगरपालिका क्षेत्रात विभाग अधिकारी (Ward Officer) यांनी कमकुवत गट शोधून काढण्यात मदत करावी. अशा विभागात असुरक्षितता निर्माण करणाऱ्या गुंड प्रवृत्तींच्या व्यक्तींविरुध्द पोलीस यंत्रणेने प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करावी.

ii. अशा विभागात संबंधित मतदारांमध्ये विश्वास निर्माण होण्याकामी क्षेत्रीय अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधिकारी यासारखे अधिकारी यांनी वारंवार भेटी द्याव्यात व तेथील प्रतिष्ठित व्यक्तींशी संपर्क साधून होणाऱ्या घडामोडींचा आढावा घ्यावा.

iii. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्राध्यक्षांना अशा विभागातून होणाऱ्या मतदानाच्या आकडेवारीवर विशेष लक्ष देण्याचे सूचित करावे.

iv. उपरोक्त सूचनांचे पालन काटेकोरपणे केले जाईल याची जबाबदारी महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिका आयुक्त यांची राहील. तसेच महानगरपालिका वगळता इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबतीत सदर जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

११) <u>मतदान केंद्रांची यादी अंतिम करणे</u> -

मतदान केंद्रांची यादी राज्य निवडणूक आयोगाने नेमून दिलेल्या दिनांकापूर्वी अंतिम होणे आवश्यक राहील. अंतिम मतदान केंद्राची यादी तयार करण्यापूर्वी सर्व संबंधित जिल्हाधिकारी,

महानगरपालिका आयुक्त यांनी मतदान केंद्राची प्रत्यक्ष पाहणी करावी. उपरोक्त सूचनांप्रमाणे सोयी सुविधा उपलब्ध आहेत वा कसे? याची तपासणी करून आवश्यक त्या सोयी सुविधा निर्माण करून घ्याव्यात.

प्रारुप मतदान केंद्रांच्या यादीस संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात तात्काळ ( संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार ) प्रसिध्दी द्यावी. त्याची एक प्रत राष्ट्रीय व राज्यस्तरावरील मान्यताप्राप्त पक्षांना द्यावी. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील राजकीय पक्ष यांची बैठक आयोजित करून त्यांना ती यादी मोफत द्यावी. त्यांचे आक्षेप लेखी नोंदवून आवश्यक ते बदल (आवश्यक तेथे प्रत्यक्ष पाहणी करून) समाविष्ट करून अंतिम यादी तयार करावी.

अंतिम मतदान केंद्रांच्या यादीनुसार मतदान केंद्र दर्शविणारा नकाशा तसेच त्यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा नकाशा, वाहतूकविषयक आराखडा (Transport Plan) तसेच मतदान केंद्राच्या जवळचे पोलीस स्टेशन, मतदान केंद्रावरील दूरध्वनी, संपर्क अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी यांचा एक संपर्क आराखडा (Communication Plan) तयार करावा. त्यात सर्व संबंधितांचे दूरध्वनी क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नं.), ई-मेल ॲड्रेस यांचा समावेश असावा. यामुळे त्यांचेकडील वॉटस् ॲप, एसएमएस, ई-मेल याद्वारे सर्व संबंधितांशी जलदरित्या संपर्क साधता येईल.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकामी राज्य निवडणूक आयोगाकडून नेमण्यात येणाऱ्या निवडणूक निरीक्षकांना मतदान केंद्रांच्या यादीसह संपर्क आराखडा टिप्पणीसह पुरवावेत.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

26.06.2024

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत.

जोडपत्र - १८

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदान केंद्र निश्चितीच्या निकषांमधील सुधारणा

१७१

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
ई-मेल - sec.corp@mah.gov.in
दिनांक - २९ ऑगस्ट, २०२५

संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे आदेश क्रमांक-रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.३/का-५,दि. २६ जून, २०२५.

## आदेश

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधिन आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरीता मतदान केंद्रांबाबतच्या निश्चितीबाबतचे निकष ठरवून दिलेले आहेत.

आणि ज्याअर्थी राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने राज्यात विभागवार आढावा बैठका घेतल्या असता प्रत्येक मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांच्या संख्येमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता बऱ्याच जिल्हाधिकारी / महानगरपालिका आयुक्त यांनी व्यक्त केली.

आणि ज्याअर्थी उपलब्ध असलेले मनुष्यबळ, मतदान यंत्रे इत्यादी सर्व बाबींचा विचार करता आगामी निवडणुकांकरीता मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांच्या संख्येमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे अशी राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाली आहे.

त्याअर्थी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-के व २४३-झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए(४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६२ च्या कलम ९-ए(४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम १०-ए(४) अन्वये तसेच राज्य निवडणूक आयोगास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकाराचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग खालील प्रमाणे सुधारीत आदेश देत आहे. :-

राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन आदेशातील मुद्दा क्र. १ ( iii ) मध्ये नमूद केलेली मतदान केंद्रास जोडावयाच्या मतदारांची संख्या खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे. :-

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | प्रभाग पध्दती | मतदान केंद्रावर जोडावयाच्या मतदारांची कमाल संख्या |
|---|---|---|---|
| १ | बृहन्मुंबई महानगरपालिका | एक सदस्यीय | ११०० ते १२०० |
| २ | इतर महानगरपालिका | एक सदस्यीय | ११०० ते १२०० |
| | | द्विसदस्यीय | १००० ते ११०० |
| | | त्रिसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | चार सदस्यीय | ८०० ते ९०० |
| | | पाच सदस्यीय | ७०० ते ८०० |
| ३ | नगरपरिषद | एक सदस्यीय | ११०० ते १२०० |
| | | एक सदस्यीय (थेट अध्यक्षासह) | १००० ते ११०० |
| | | द्विसदस्यीय | १००० ते ११०० |
| | | द्विसदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ९०० ते १००० |
| | | त्रिसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | त्रिसदस्यीय (थेट अध्यक्षासह) | ८०० ते ९०० |
| ४ | नगरपंचायत | एक सदस्यीय | ११०० ते १२०० |
| | | एक सदस्यीय (थेट अध्यक्षासह) | १००० ते ११०० |
| ५ | जिल्हा परिषद / पंचायत समिती | एकत्र निवडणूक | १००० ते ११०० |
| | | स्वतंत्र निवडणूक* | ११०० ते १२०० |
| ६ | ग्रामपंचायत | बहुसदस्यीय | ९०० ते १००० |
| | | बहुसदस्यीय (थेट सरपंचासह) | ८०० ते ९०० |

* जिल्हा परिषद अथवा पंचायत समिती यापैकी एकाच पदाची निवडणूक असल्यास वर स्वतंत्र निवडणूक असे नमूद आहे त्यानुसार मतदार संख्या ठेवावी.

टीप १ - पोटनिवडणूक असल्यास किती पदांची निवडणूक आहे त्यानुसार मतदार संख्या ठेवावी.

| |
|---|
| टीप २ - दुर्गम भाग/विरळ लोकवस्ती अथवा विखुरलेल्या वाड्या, वस्त्या व तांडे यामध्ये कमी लोकसंख्येकरीता देखील मतदान केंद्र ठेवता येईल. |
| टीप ३ - मतदान केंद्रास जोडावयाच्या कमाल आणि किमान संख्येमध्ये स्थानिक परिस्थिती व मागील निवडणुकीतील मतदानाची टक्केवारी लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार १० % कमी अथवा अधिक मतदार जोडता येतील. |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

२८.०८.२०२५

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत.

९७५

जोडपत्र - १२

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावरील END बटनाच्या वापराबाबत..

सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का.१२
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९ डिसेंबर, २०२२.

## आदेश

वाचा :- राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.१२ नोव्हेंबर, २०१३ व दि.२६ नोव्हेंबर, २०१३ चे आदेश.

ज्याअर्थी संदर्भाधीन आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदाराला निवडणूक लढविणाऱ्या कोणत्याही उमेदवाराला मतदान करण्याची इच्छा नसेल आणि त्याला आपला मतदानाचा हक्क गोपनीयरित्या बजावता यावा याकरिता "वरीलपैकी एकही नाही" (NOTA) या बटनाचा वापर कसा करावा याबाबत सविस्तर आदेश दिले आहेत.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये एकाच प्रभागातून बहुसदस्य निवडावयाचे असतात, त्या संस्थेच्या निवडणूक प्रक्रियेत काही प्रकरणी जेथे मतदार मतदान प्रक्रिया पूर्ण करत नाहीत म्हणजेच जेवढी मते देण्याचा अधिकार आहे तेवढी मते देत नाहीत, तसेच NOTA बटनाचा वापर करण्यासही नकार देतात, त्या प्रसंगी मतदान केंद्राध्यक्षाने उपस्थित मतदान प्रतिनिधींच्या उपस्थितीत NOTA बटनाचा वापर करण्याचे आयोगाचे दि.२६/११/२०१३ चे आदेशातील परिच्छेद ४ मध्ये दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे,

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्राचा वापर ज्या ठिकाणी होत असेल, त्या मतदान यंत्रावर पूर्वीपासूनच END बटन उपलब्ध आहे, आणि ज्या मतदारांना NOTA बटनाचा वापर करावयाचा नसेल व आपली मतदान प्रक्रिया पूर्ण करण्याची इच्छा

असेल, त्या प्रसंगी मतदाराने NOTA किंवा END बटन दाबण्याची इच्छा दाखविली नसल्यास, मतदान यंत्रावर पुढील मतदार मतदान करु शकतील यासाठी मतदान केंद्राध्यक्ष END बटनाचा वापर करुन मतदान प्रक्रिया पूर्ण करु शकतात असे आयोगाचे मत झाले आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने संदर्भाधीन दि. १२ नोव्हेंबर, २०१३ च्या आदेशान्वये सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकरिता "END" बटन बंद राहील असे आदेश दिले आहेत त्यामध्ये सुधारणा करणे तसेच दि. २६/११/२०१३ चे आदेश रद्द करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम ९ए (४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए (४) अनुसार पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेतः-

१. संदर्भाधीन दि. २६ नोव्हेंबर, २०१३ चे आदेश याद्वारे रद्द करण्यात येत असून दि.१२ नोव्हेंबर, २०१३ च्या आदेशामध्ये "END" बटनाच्या अनुषंगाने अंशतः सुधारणा करण्यात येत आहे. त्यानुसार आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पुढील निवडणुकांमध्ये जेथे राज्य निवडणूक आयोगाच्या मतदान यंत्राचा वापर होत असेल, तेथे शेवटच्या बॅलेटींग युनिटवरील (एकापेक्षा अधिक बॅलेटींग युनीट वापरले जात असल्यास) "END" **बटन सुरु राहील** मात्र त्यावर **काळी मास्कींग कॅप** लावून ठेवण्यात यावी. सदरचे **"END" बटन** दाबण्यासाठी काळी मास्कींग कॅप काढून बटन दाबता येईल. ज्या ठिकाणी कंट्रोल युनिटला एकापेक्षा जास्त बॅलेटींग युनिट जोडल्या जातील, त्या ठिकाणी शेवटचे बॅलेटींग युनिट वगळता अगोदरच्या बॅलेटींग युनिटवरील "END"

बटन बंद राहील व पांढऱ्या मास्कींग टॅबने बंद राहील जेणेकरुन "END" बटन दाबता येणार नाही, याची दक्षता घ्यावी.

२. मतदार आपले मतदान पूर्ण न करता मतदान कक्षामधून बाहेर निघाला तर मतदान अधिकारी / मतदान केंद्राध्यक्ष यांना कंट्रोल युनिटवरील लाल दिवा न विझल्यामुळे तसेच बिप साऊंड न आल्यामुळे मतदाराने, मतदान पूर्ण केलेले नाही ही गोष्ट लक्षात येईल.

३. अशा परिस्थितीत मतदान केंद्राध्यक्षांनी संबंधित मतदाराला त्याचे मतदान पूर्ण न झाल्याबाबतची कल्पना देऊन पसंतीच्या उमेदवाराला मत देऊन अथवा 'वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दाबून मतदान पूर्ण करण्याबाबत विनंती करावी. जर मतदाराने पुन्हा मतदान कक्षात जाऊन त्यानुसार मतदान केल्यास, त्याठिकाणी त्या मतदाराची मतदान प्रक्रिया पूर्ण होईल.

४. मात्र जर एखाद्या मतदाराने पसंतीच्या उमेदवाराला मत देण्यास अथवा वरीलपैकी एकही नाही' (NOTA) या पर्यायासमोरील बटन दावण्यास नकार दिला तर मतदान केंद्राध्यक्षांनी त्याला शेवटच्या बॅलेटींग युनिटवरील "END" बटनावरील काळी कॅप उघडून "END" बटन दाबण्याची विनंती करावी.

५. जर मतदाराने "END" बटन दाबण्यासही नकार दिला, तर मतदान केंद्राध्यक्षांनी बॅलट युनिटवरील उमेदवारांचे नावासमोरील दिवे एखादा पुठ्ठा अथवा पुस्तक ठेवून झाकावेत जेणेकरुन मतदानाची गोपनीयता अबाधित राहील. त्यानंतर मतदान केंद्रात उपस्थित असलेल्या सर्व मतदान प्रतिनिधींना बरोबर घेऊन त्यांच्या साक्षीने शेवटच्या बॅलेटींग युनिटवरील काळी कॅप उघडून "END" बटन दाबून मतदान प्रक्रिया पूर्ण करावी व या बाबीची नोंद मतदान केंद्राध्यक्षाच्या दैनंदिनीत (Presiding Officer Diary) घ्यावी.

६. जर एखाद्या मतदाराने मतदान कक्षात जाण्यापूर्वीच मतदानास नकार दिला तर अशा मतदाराच्या मतदार नोंदवहीतील (व्हीएम-१) नोंदीसमोर अभिप्राय या

रकान्यात मतदानास नकार दिल्याची नोंद घ्यावी. याठिकाणी नोंदविलेल्या मतांच्या हिशोबामध्ये (व्हीएम-३) अनुक्रमांक ३ येथे अशा मतदारांची संख्या नमूद करण्यात येईल.

७. वरील परिच्छेद ४ ते ६ मधील परिस्थिती उद्भवल्यास नमुना व्हीएम-३ (भाग-एक) मधील त्या जागेकरिता त्या मतदान केंद्रात Total बटनानुसार झालेले मतदान व त्या जागेकरिता त्या मतदान केंद्रात निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना (NOTA सह) मिळालेली एकूण मते यामधील तफावत ही END बटनाचा वापर किती वेळा करण्यात आला हे दाखवत असून त्याची नोंद सोबतच्या नमुना व्हीएम-६ (अ) मध्ये दर्शविण्यात यावी.

एखाद्या प्रभागात एकापेक्षा जास्त मतदान केंद्र असतील त्यावेळेस प्रत्येक मतदान केंद्रासाठी आवश्यकता असल्यास नमुना व्हीएम ६(अ) भरुन घेऊन, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने एकत्रित माहिती नमुना व्हीएम-६(ब) मध्ये भरुन आयोगास सादर करावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( के. सूर्यकृष्णमूर्ती )
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी
२) आयुक्त, सर्व महानगरपालिका
३) मुख्याधिकारी, सर्व

नमुना व्हीएम - ६ (अ)

END बटनाच्या वापरामुळे नोंदविलेल्या मतांमध्ये येणारी तफावत दर्शविणारा नमुना

............. (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) सार्वत्रिक / पोट निवडणूक- ......... (वर्ष)

मतदान केंद्र क्रमांक व नाव- ------------ कंट्रोल युनिट क्रमांक ----------

| अ. क्र. | प्रभाग / निवडणूक विभाग/ निर्वाचक गण क्रमांक व नाव | जागा क्रमांक | कंट्रोल युनिटमध्ये Total बटनानुसार नोंद झालेली एकूण मते | त्या जागेवरील उमेदवारांना (नोटासह) मिळालेल्या एकूण मतांची बेरीज | END बटनाच्या वापरामुळे येणारी तफावत (४-५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |
| | | | | | |

मतमोजणी पर्यवेक्षक

नमुना व्हीएम-६ (उदाहरण)

END बटनाच्या वापरामुळे नोंदविलेल्या मतांमध्ये येणारी तफावत दर्शविणारा नमुना

अबकड ग्रामपंचायत (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) सार्वत्रिक निवडणूक- मार्च, २०२२ (वर्ष)

मतदान केंद्र क्रमांक व नाव- ------------ कंट्रोल युनिट क्रमांक ----------

| अ. क्र. | प्रभाग / निवडणूक विभाग/ निर्वाचक गण क्रमांक व नाव | जागा क्रमांक | कंट्रोल युनिटमध्ये Total बटनानुसार नोंद झालेली एकूण मते | त्या जागेवरील उमेदवारांना (नोटासह) मिळालेल्या एकूण मतांची बेरीज | END बटनाच्या वापरामुळे येणारी तफावत (४-५) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | प्रभाग क्र. १ | १अ | ५०० | ४९० | १० |
| २ | प्रभाग क्र. १ | १ब | ५०० | ४८५ | १५ |
| ३ | प्रभाग क्र. १ | १क | ५०० | ४९५ | ५ |

मतमोजणी पर्यवेक्षक

नमुना व्हीएम - ६ (ब)

END बटनाच्या वापरामुळे नोंदविलेल्या मतांमध्ये येणारी तफावत दर्शविणारा नमुना

............. (स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव) सार्वत्रिक / पोट निवडणूक- ......... (वर्ष)

| अ. क्र. | प्रभाग / निवडणूक विभाग/ निर्वाचक गण क्रमांक व नाव | मतदान केंद्र क्रमांक | जागा क्रमांक | कंट्रोल युनिटमध्ये Total बटनानुसार नोंद झालेली एकूण मते | त्या जागेवरील उमेदवारांना (नोटासह) मिळालेल्या एकूण मतांची बेरीज | END बटनाच्या वापरामुळे येणारी तफावत (४-५) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |
| | | | | | | |

निवडणूक निर्णय अधिकारी

जोडपत्र - २०

९६९

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान यंत्रावरील CLOSE बटनाच्या वापराबाबत..

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ-२०१३/प्र.क्र.११/का.१२
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २९ डिसेंबर, २०२२.

## आदेश

ज्याअर्थी, मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांकडून अनावधानाने CLOSE बटन दाबण्याचे राहून जाते, मतमोजणीच्यावेळी RESULT - I बटन दाबल्यास "Invalid Operation" असा मेसेज मशीन दाखवते. याचाच अर्थ कंट्रोल युनिटवरील CLOSE बटन दावण्यात आलेले नाही. यास्तव निकाल दर्शविताना प्रथम CLOSE बटन दाबून त्यानंतर निकाल दर्शविण्याच्या अनुषंगाने आदेश देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ मुंबई ३) च्या कलम १८ए(४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६१ चा महा. ५) च्या कलम ९ए (४), महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०ए (४) अनुसार पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मतदान केंद्राध्यक्षांकडून CLOSE बटन दाबणे राहून गेल्यास, मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी पर्यवेक्षकाने प्रथम TOTAL बटन दाबून

उपस्थित उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांची कंट्रोल युनिटमध्ये नोंद झालेल्या एकूण मतदानाचा आकडा व्हीएम-३ मधील अ.क्र. ५ मध्ये नोंद असलेल्या एकूण मतदानाच्या आकडेवारीशी जुळत असल्याबावत खात्री करुन देण्यात यावी व त्यानंतर CLOSE बटन दाबून मतमोजणीची प्रक्रिया पूर्ण करुन निकाल जाहीर करावा. सदर बाबीची नोंद व्हीएम-४ मध्ये स्वतंत्र टिप लिहून घेण्यात यावी. याबाबत मतदान यंत्राच्या प्रशिक्षणादरम्यान मतमोजणी पर्यवेक्षकांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(के. सूर्यकृष्णमूर्ती)
उप सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१) सर्व जिल्हाधिकारी
२) आयुक्त, सर्व महानगरपालिका
३) मुख्याधिकारी, सर्व

जोडपत्र - २१

९८३

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ /मनपा-२०१०/प्र.क्र.१०/का.०५,
नवीन प्रशासन भवन, पहिला मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९.११.२०११.

निवडणूक तात्काळ
फॅक्स/ई-मेल

प्रति,

१. जिल्हाधिकारी,(सर्व),
(मुंबई व मुंबई उपनगर वगळून)

२. आयुक्त, महानगरपालिका (सर्व)

विषय :- मतदाराच्या बोटाला लावावयाच्या न मिटणा-या शाईच्या बाटलीऐवजी मार्करपेनच्या वापराबाबत.

महोदय,

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांमध्ये मतदाराच्या हाताच्या बोटाला लावण्यात येणा-या शाईऐवजी आता मार्करपेनचा वापर करावयाचा असून सदरहू मार्करपेन वापरताना कोणती दक्षता घेणे आवश्यक आहे याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. मतदाराच्या हाताच्या बोटाला (पृ.क्र.२/प.वि.वरील छायाचित्रात दर्शविल्याप्रमाणे) मार्करपेनने निशाणी करण्यात यावी. मतदाराच्या बोटाला मार्करपेनने निशाणी केल्यानंतर, मतदाराने मतदान केल्यानंतर त्याच्या बोटास केलेली निशाणी तशीच आहे याची खात्री मतदान अधिका-याने, मतदार मतदान केंद्र सोडण्यापूर्वी करावी.

२. मार्करपेन दाबून वापरावा.

३. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा त्यास घट्ट टोपण लावून ठेवावे.

४. मार्करपेन वापरात नसेल तेव्हा आडवा (**Horizontal**) ठेवण्यात यावा.

२/-

निवडणूक निर्णय अधिका-यांनी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना निवडणुकीचे प्रशिक्षण देताना मार्कर पेनचा वापर कसा करावा याबाबत पूर्वपृष्ठावर नमूद केल्यानुसार स्पष्ट सूचना द्याव्यात. (सूचना मार्कर पेनवरही दर्शविण्यात आल्या आहेत.)

आदेशानुसार,

आपला

(ध.मा.कानेड)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग




172

# इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरताना घ्यावयाची दक्षता

## काय करावे

१) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र वापरण्यापूर्वी प्रथम निदेशपुस्तिका लक्षपूर्वक वाचा.
२) त्यात दाखविल्याप्रमाणे पध्दतशीर व हळू बटणे दाबावीत.
३) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रास धूळ, उष्णता, पाऊस, आग तसेच अन्य नैसर्गिक आपत्तीपासून सुरक्षित ठेवा.
४) निवडणूक आयोगामार्फत पुरविण्यात आलेल्या विशिष्ट प्रकारच्या बॅटरीचा वापर करा.
५) जर काही अडचण निर्माण झाल्यास निवडणूक आयोग किंवा ई.सी.आय.एल.यांच्याशी संपर्क साधावा.
६) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र अनिश्चित काळासाठी वापरावयाचे नसल्यास कंट्रोल युनिटपासून बॅटरी वेगळी करा.
७) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र उघडताना बॅलटींग युनिट आणि कंट्रोल युनिटचे भाग समान पातळीवर राहतील याची खातरजमा करावी.
८) बटणे दाबण्यापूर्वी एकमेकांस जोडणारे बॅलटींग युनिटचे केबल कलेक्शन व्यवस्थितपणे कंट्रोल युनिटच्या कनेक्शनशी जोडले आहे, याची खातरजमा करावी. हे केवळ एकाच दिशेला जोडले जाईल.

## काय करु नये

१) बटणे, खटके इत्यादींवर अतिरिक्त जोर देऊ नये.
२) इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रास हीटर किंवा अन्य कुठल्याही गरम वस्तुजवळ ठेवू नये.
३) सील करतेवेळी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रावर वितळलेले मेण पडू देऊ नये/पडता कामा नये.
४) निरनिराळया युनिटची झाकणे व दरवाजे जोर लावून उघडू नये.
५) कंट्रोल युनिटच्या वरील झाकण उघडू नये. (पेच/स्क्रू सैल करून)
६) जोपर्यंत बॅटरीचा वापर करण्याची आवश्यकता नाही तोपर्यंत त्या बॅटरीचे सील उघडू नये.
७) एकमेकांस जोडणाऱ्या केबलच्या टोकास जोडलेल्या कनेक्शनला कोणत्याही कठीण वस्तूचा घाव/धक्का लागता कामा नये.

**मतदान केंद्राध्यक्ष यांचेसाठी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रासंबंधी महत्त्वाच्या सूचना**

१. मतदानाच्या दिवशी सकाळी ६.३० वाजता मतदान युनिट व नियंत्रण युनिट जोडून पॉवर स्वीच ऑन करा. (मतदान प्रतिनिधी उपस्थित नसल्यास त्यांची वाट पाहू नका.)

२. प्रतिरुप मतदान (MOCK POLL) करा. त्यासाठी खालील क्रम अनुसरावा.

[Ballot हे] बटण वेळोवेळी दाबून प्रत्येक उमेदवारास मतदान करा

(बॅलट बटण दाबल्यावर दर्शक पट्टीवर "In valid Operation" दिसल्यास प्रथम खालील क्रमाने बटने दाबावीत (CRC करावे) व त्यानंतर बॅलट बटण दाबावे)

[Close Result I] [Clear]

३. प्रतिरुप मतदानाकरीता बॅलट केल्यानंतर खालील क्रमाने बटने दाबावीत.

[Close हे] बटण दाबून प्रतिरुप मतदान बंद करा.

[Result I] हे बटण दाबून प्रतिरुप मतदानाचा निकाल दाखवा

[Clear] हे बटण दाबून प्रतिरुप मतदानाव्दारे नोंदविलेली मते पुसून टाका

**टीप:- प्रत्येक बटण दाबल्यानंतर त्याचा डिस्प्ले पूर्ण पाहिल्यानंतरच पुढील बटण दाबावे.**

४. वरीलप्रमाणे कृती झाल्यानंतर नियंत्रण युनिट मोहोरबंद करण्यापूर्वी यंत्राचा पॉवर स्वीच "Off" करणे अत्यावश्यक आहे.

५. नियंत्रण युनिट खालीलप्रमाणे मोहोरबंद करावे.

(अ) निकाल विभागाच्या आतील कप्पा पेपरसील लावून अशाप्रकारे बंद करावा की, त्याचा क्रमांक वरच्या बाजूला येईल व दुमडल्यावर दिसेल.

(ब) क्लोज बटणाचा कप्पा स्पेशल टॅग लावून बंद करावा.

(क) नियंत्रण युनिटच्या बाहय झाकणाच्या डाव्या बाजूस पुरविलेल्या दोन छिद्रातून धागा ओवून त्यात खूणचिठ्ठीच्या (Address Tag) सहाय्याने सील करावे.

(ड) नियंत्रण युनिट ABCD पट्टी सील (स्ट्रीप सील) व बाहेर आलेल्या पेपर सील यांच्या सहाय्याने बंद करावे. मात्र पट्टी सीलने Close बटण झाकले जाणार नाही याची काळजी घ्यावी.

६. मतदान संपल्यावर Close बटण दाबून एकूण मतांची नोंद घेऊन नियंत्रण युनिटचा पॉवर स्वीच "Off" करावा.

७. नोंदविलेल्या मतांचा हिशोब मतदान प्रतिनिधींना द्यावा.

८. मतदान युनिट व नियंत्रण युनिटच्या पेटीच्या दोन्ही बाजूला खूणचिठ्ठीच्या (Address Tag) सहाय्याने सील करावे.

| | |
|---|---|
| महत्वाचे :- | प्रत्येक सीलवर केंद्राध्यक्ष, उपस्थित व इच्छूक मतदान प्रतिनिधी यांची स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. |

**(याव्यतिरिक्त मतदान केंद्राध्यक्षांसाठी निदेश पुस्तिकेचा मार्गदर्शनासाठी वापर करावा.)**